श्रीरमणप्रस्थानत्रयी

१. सद्दर्शन
(रमणसूत्रें)
२. उपदेशसार
(रमणोपनिषत्)
३. रमणगीता.

SRI RAMANASRAMAM

ॐ

रमणप्रस्थानत्रयी

(सद्दर्शन, उपदेशसार व रमणगीता)

महाराष्ट्र-अनुवाद

अनुवादक :—
नागेश वासुदेव गुणाजी, बी. ए., एल्एल्. बी.,
वासुदेवाश्रम, ठळकवाडी—बेळगांव.

SRI RAMANASRAMAM

२७-१२-१९३९
श्रीरमणषष्ट्यब्दिपूर्तिमहोत्सवदिन ।

किंमत १-४-०

प्रकाशक :

श्री. निरंजनानंद स्वामी,
सर्वाधिकारी, श्रीरमणाश्रम,
तिरुवन्नामलै, दक्षिण भारत.

पहिली आवृत्ति एक हजार प्रति.

सोल एजंट:
महाराष्ट्र ग्रंथभांडार,
महाद्वाररोड, कोल्हापूर.

मुद्रक:
वासुदेव नारायण ठकार,
श्रीसिद्धेश्वर प्रेस, कोल्हापूर.

ॐ

नमो भगवते श्रीरमणाय ।

तमेवैकं जानथ आत्मानम् ।
अन्या वाचो विमुंचथामृतस्यैष सेतुः ॥

—मुंडकोपनिषत्. २.२.५

त्या एका आत्म्यालाच जाणा, इतर गोष्टी सोडा; हाच अमरत्वाचा–मोक्षाचा सेतु आहे.

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥

—श्रीमद्भगवद्गीता. ४.३४

तत्त्ववेत्ते ज्ञानी, त्यांना प्रणिपात केल्यानें, पुनः पुनः सविनय प्रश्न केल्यानें आणि त्यांची सेवा केल्यानें ज्ञान–आत्मज्ञान तुला उपदेशितील हें लक्षांत ठेव.

सदैव राम राम म्हणा । रे बापांनो, सदैव राम राम म्हणा ॥
नरतनु हे दुर्लभ गणा । रे बापांनो, सदैव राम राम म्हणा ॥ ध्रु० ॥

देह पडेल कधिं न भरंवसा । निज आत्मा आपुला कसा ।
हें जाणत एकांतीं बसा । न कळे तरि गुरुला पुसा ॥ रे बापांनो ।
सदैव राम राम म्हणा ॥ ३ ॥

मोठेपणिंचा अभिमान सोडा । छी ! छी ! देह मीपण खोडा ॥
दृढ असंगशस्त्रें तोडा । आहे अखंड सुख तें जोडा ॥ रे बापांनो ।
सदैव राम राम म्हणा ॥ ४ ॥

—श्रीकृष्णभट्ट बांदकरमहाराज.

एतदर्थ—

जाऊं चला जाऊं चला । जाऊं शोणाचला ॥
प्रगटूं चला प्रगटूं चला । प्रगटूं अरुणाचला ॥
नमूं चला नमूं चला । रमणा नमूं चला ॥
पुसूं चला पुसूं चला । रमणा पुसूं चला ॥
सेवूं चला सेवूं चला । रमणा सेवूं चला ॥
मिळवूं चला मिळवूं चला । ज्ञाना मिळवूं चला ॥
लागूं चला लागूं चला । ध्याना लागूं चला ॥
जाणूं चला जाणूं चला । आत्मा जाणूं चला ॥

अनुक्रमणिका.

प्रस्तावना.

ऋजुमार्गप्रदर्शकाय नमः।

इ. स. १९१० सालीं स्वामी रामतीर्थ यांचा व इ. स. १९१२।१३ सालीं रामकृष्ण परमहंस आणि डॉक्टर बुकर टी. वाशिंगटन् यांचा परिचय महाराष्ट्र वाचकांना करून देण्याचा योग आम्हांस लाभला होता. आतां सुदैवानें आणखी एका महान् विभूतीचा—भगवान श्रीरमण-महर्षींचा परिचय करून देण्याचा योग श्रीकृपेनें प्राप्त झाला आहे. त्यांतल्या त्यांत विशेष समाधानाची गोष्ट ही कीं, भगवान् श्रीरमण महर्षींच्या वयाला साठ वर्षें पुरीं होऊन ता. २७।१२।१९३९ रोजीं त्यांचा षष्ठ्यब्दिपूर्ति (डायमंड जुबिली) महोत्सव साजरा होणार आहे आणि याच सुमुहूर्तावर हा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे.

वर नमूद केलेल्या तीन विभूतींची प्रत्यक्ष ओळख आम्हांला नव्हती किंवा त्यांना आम्हीं पाहिलेलें नव्हतें. फक्त डॉ० वाशिंगटन् यांच्याशीं आमचा कांहीं पत्रव्यवहार झालेला होता. पण आतां ज्या विभूतीचा परिचय आम्ही करून देणार आहों, त्यांचें प्रत्यक्ष दर्शन घेऊन त्यांना शरण जाऊन त्यांचा अनुग्रह मिळविणेचें भाग्य आम्हांस प्राप्त झालें आहे. हें नमूद करणेस आम्हांस आनंद वाटतो; आणि आम्ही येथें असें जाहीर करितों कीं, मिस्टर ग्रांट डफ (डगलस एन्सली) यांनीं इंग्रजी रमण-गीतेच्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें सत्याचा—मोक्षाचा किंवा आत्म-ज्ञानाचा मार्ग पूर्वींसारखा आतां कठीण राहिलेला नाहीं. पूर्वीं घटपटादि खटपट फार करावी लागे. आतां जिज्ञासूंनीं व मुमुक्षूंनीं फक्त अरुणा-चलाचें टिकीट काढून रमणाश्रमांत जावें म्हणजे झालें. तेथें भगवान श्रीरमणमहर्षींचें दर्शन घेऊन त्यांना शरण जाऊन कृतार्थ होतां येतें,

त्यांच्या संभाषणानें व मौनयुक्त कृपाकटाक्षानेंहि असे किती तरी भाग्यवान भक्त छिन्नसंशय होऊन कृतार्थ झाले आहेत व होत आहेत.

भगवान रमणमहर्षींचा परिचय आम्हांस कसा झाला हें येथें सांगणें आवश्यक वाटतें. इ. स. १९३४ च्या प्रारंभीं आमचे बेळगांवचे मित्र श्री. केशवस्वामी यांचेकडून भगवान रमणहर्षींचीं 'सद्दर्शन' व 'कोऽहं' अशीं दोन इंग्रजी पुस्तकें वाचावयास मिळालीं. आम्हांस तीं फार आवडलीं. त्यानंतर त्याच सालीं त्यांचे मार्फत मिस्टर पॉल ब्रंटन यांचा "Search in Secret India" (भारतांतील गुप्त विद्येचा–अध्यात्मविद्येचा शोध) हा मोठा सुंदर ग्रंथ वाचावयास मिळाला.

मि० पॉल ब्रंटन

मि. पॉल ब्रंटन (राफेल हर्स्ट हें त्यांचें खरें नांव) हे 'लंडन फोरम' नांवाच्या एका प्रमुख वर्तमानपत्राचे नाणावलेले लेखक होत. पारशी संत श्रीमेहरबाबा यांच्या एका शिष्यानें त्यांना हिंदुस्थानांत बोलाविलें आणि ते अध्यात्मविद्येच्या शोधार्थ ४।५ वर्षें सर्व देशभर हिंडले. प्रथम त्यांना इजिप्तचे प्रसिद्ध जादूगार महम्मद बे हे हॉटेल मॅजेस्टिकमध्यें भेटले आणि त्यांचे जादूचे तीन अद्भुत प्रयोग त्यांनीं पाहिले. नंतर अहमदनगरजवळ अरणगांव येथें जाऊन त्यांनीं श्री. मेहरबाबांची भेट घेतली. पुण्याची 'बाबाजान' यांचेंहि दर्शन त्यांनीं घेतलें. अड्यारचे परिव्राजक ब्रम्ह यांना भेटून त्यांचे तीन प्रयोग– (१) हृदयाची क्रिया कांहीं सेकंद बंद करणें, (२) कांहीं मिनिटें नाडी बंद ठेविणें व (३) दोन तास श्वास बंद करणें हे पाहिले. मद्रासहून मैल दीड मैल बाहेर राहत असलेल्या एका मौनी साधूचें दर्शन त्यांनीं घेतलें. त्यानंतर कुंभकोणचे–कामकोटिपीठाचे जगद्गुरु शंकराचार्य यांची भेट घेऊन त्यांचा आशीर्वाद व "नम्र हो म्हणजे तुझी कामना सफल होईल" असा दृष्टांतहि मिळविला. त्यानंतर अरुणाचलीं येऊन त्यांनीं भगवान रमणमहर्षींचें दर्शन घेतलें. पहिल्याच भेटींत नुसत्या दर्शनानेंच त्यांचें मन स्थिर झालें आणि त्यांना शांतीचा लाभ झाला. त्यानंतर आंध्र देशांत जाऊन त्यांनीं राजमहेंद्री व बऱ्हामपूर येथें फकीरांचे प्रयोग—आंब्याचें झाड

उत्पन्न करणें, विंचवाची गति संकुचित व बंद करणें, तोंडांत लांब सळया घालून त्या गालांतून बाहेर काढणें, उजवा डोळा स्वस्थानांतून बाहेर काढणें इत्यादि प्रयोग पाहिले. तसेंच पुरीस फकीरानें करविलेला बाहुल्यांचा नाच, रुपया, आंगठी व लोखंडी गज यांचा नाच पाहिला. तदनंतर कलकत्त्यास जाऊन श्री रामकृष्ण परमहंसाचे गृहस्थाश्रमी शिष्य मास्तर महाशय उर्फ महेंद्र यांची भेट घेऊन त्यांच्याशीं सुखसंवाद केला. काशीस जाऊन त्यांनीं विशुद्धानंदस्वामींची भेट घेऊन त्यांचे (१) हातरुमालावर तऱ्हेतऱ्हेचे सुवास उत्पन्न करणें, (२) मेलेली चिमणी जिवंत करणें हे प्रयोग पाहिले. तेथें सुप्रसिद्ध ज्योतिषी सुधैबाबू यांची त्यांनीं भेट घेतली. पुढें ते आग्रा व दयाळबाग येथें गेले आणि तेथें '**राधास्वामी**' संप्रदायाची वसाहत, तेथील यच्चयावत् आधुनिक सुधारणा, व प्राचीन आर्य संस्कृति (ध्यान) यांचा म्हणजे संसार व योग यांचा त्यांनीं केलेला सुंदर मिलाफ इत्यादि प्रकार पाहिले. नंतर ते नाशिकास येऊन पुनः मेहरबाबाबरोबर एक महिना राहिले. नाशिकाहून मुंबईस येतांना वाटेंत चंडीदास नामक एका वृद्ध योग्याची त्यांना अकस्मात भेट झाली, व त्यांचा योगसामर्थ्याचा एक प्रयोगहि त्यांना पहावयास मिळाला. तेथून ते मुंबईस येऊन परत विलायतेस जाण्याच्या विचारांत होते. आपलें तिकिटहि त्यांनीं काढलें होतें. पण एका मित्राच्या आग्रहामुळें आपला बेत फिरवून ते पुनः अरुणाचलीं गेले आणि रमणाश्रमांत ध्यानाचा अभ्यास करीत बरेच दिवस राहिले. या खेपेस त्यांना पूर्ण शांतीचा लाभ होऊन ते कृतार्थ होत्साते स्वदेशीं परत गेले. रमणाश्रमांत जसा त्यांना अनुभव आला तसा इतर ठिकाणीं कुठेंहि आला नाहीं. ही सर्व हकीकत त्यांनीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध केली. त्यांचा 'भारतांतील गुप्त (अध्यात्म) विद्येचा शोध' हा इंग्रजी ग्रंथ इतका हृदयंगम व सुंदर वठला कीं, त्याची पहिली आवृत्ति अवघ्या तीन चार दिवसांत खलास झाली. त्यानंतर त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. त्यामुळें भगवान रमण महर्षींची कीर्ति दिगंतरीं पसरून या देशांतील, तसेंच पश्चिम खंडांतील दूरदूरचे

लोकहि रमणाश्रमांत त्यांच्या दर्शनार्थ एकसारखे येत आहेत व कृतार्थ होऊन जात आहेत. नमुन्या दाखल येथें कांहीं उदाहरणें देतों.

अलीकडे कांहीं महिन्यांपूर्वी एक अमेरिकन ग्रंथकर्त्री व नाट्य-लेखिका रमणाश्रमांत येऊन एक दोन तास राहून गेली आणि जातांना तिनें असे उद्गार काढिले कीं, मी थोडा वेळ रमणमहर्षींच्या सहवासांत राहिलें तरी मला पूर्ण शांति व आनंद यांची प्राप्ति झाली. तसेंच " Turn Eastwards (पूर्वाभिमुख व्हा) " या छोट्या निबंधांत पास्क-लाईन मॅलेट नांवाची फ्रेंच लेखिका आपला अनुभव सांगते कीं, "आम्ही हळूंच ध्यानमंदिरांत घुसलों, आणि हिंदु पद्धतीप्रमाणें नमस्कार करून इतर मंडळीमध्यें जमिनीवर बसलों. चिरस्मरणीय असा तो देखावा होता. माझें सर्व लक्ष्य त्या मध्यवर्ति मूर्तीकडे लागलें. त्या मूर्तीची, ज्ञान, तेज, भारदस्तपणा, सेवा, शक्ति व शांति इत्यादि गुणांनीं मंडित अशी ठेवण (बैठक) पाहून तेथील सर्व वातावरण अवर्णनीय व पूर्ण शांतीनें भरलेलें आहे असें वाटलें. त्या मूर्तीच्या नक्षत्राप्रमाणें चमकत असलेल्या नेत्रयुगलांत पाहूं जाणें म्हणजे अनंतत्वाचा ठाव घेणें आणि अनिर्वचनीय शांतीचा अनुभव घेणें होय." गेल्या जयंतीच्या (तारीख ६।१।१९३९ च्या) उत्सवाला हिंदुस्थानच्या सर्व प्रांतांतून, तसेंच युरोप अमेरिका येथूनहि किती तरी सज्जन भक्त आले होते. त्यांत विशेष उल्लेखनीय म्हणजे युरोपांतील नॉर्वेच्या उत्तर भागा (उत्तर ध्रुवा) कडील एक रहिवासी आले होते. त्यांचा त्याग आणि वैराग्य पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें.

भारतांतील सर्व भागांतून लोक रमणमहर्षींच्या दर्शनास येत अस-तात हें वर सांगितलें आहे. त्यांचीं नांवें विस्तारभयास्तव येथें सांगतां येत नाहींत. फक्त एक दोन प्रमुख उदाहरणें देत आहों. १९३८ च्या आगष्टमध्यें राष्ट्रपति डॉ. बाबू राजेंप्रसाद व शेट जमनालाल बजाज हे सहकुटुंब येऊन एक आठवडाभर रमणाश्रमांत राहून गेले. त्यांच्या निवासाची आणि प्रश्नोत्तरांची सविस्तर हकीकत मद्रासच्या ' संडे टाईम्स ' च्या ता. २८ आगष्ट १९३८ च्या अंकांत आलेली सर्वविश्रुत असल्यानें ती येथें

देण्याचें कारण नाहीं. बेळगांवचे आमचे मित्र डॉ० पां. गो. रानडे हे कांहीं वर्षांपूर्वी अरुणाचलीं जाऊन भगवान रमणमहर्षींचें दर्शन घेऊन आले. त्यांनीं आपला अनुभव असा सांगितला कीं, " ज्याचे योगें सर्व विश्व मोहून जात असे त्या भगवान श्रीकृष्णाच्या मधुर हास्याचें वर्णन भागवतादि पुराणांत केलेलें आहे. तें हास्य* कसें असेल हें येथें रमणाश्रमांत पहावयास मिळतें. त्यांचें सर्व शरीर तेजःपुंज आहे." आमचा स्वतःचा एक छोटासा अनुभव येथें देतों. कांहीं वर्षांपूर्वी ब्राह्ममूहूर्तीं आम्हीं ध्यानमंदिरांत भगवान रमणमहर्षींपासून कांहीं अंतरावर बसलेलों होतों. भगवान आपल्या मंचकावरील आसनावर बसलेले होते. जवळ थोडी मंडळीहि होती. इतक्यांत आंत येणाऱ्या एका माणसाची चाहूल ऐकूं आली, लगेंच चक्क असा प्रकाश दिसला आणि ' ज्योती ज्योती ' असा ध्वनि ऐकूं आला. नीट डोळे उघडून पहातों तों एक तरुण मनुष्य भगवानाच्या अंगावर चाल करून जात होता, तो मागें वळतांना दिसला. त्या दिवशीं दुपारीं त्या मनुष्यानें अशीच भगवानाच्या अंगावर चढाई करण्याचा प्रयत्न केला होता. पण तेथें हजर असलेल्या मंडळींनीं त्याला धरून बाहेर नेलें आणि पोलीसाच्या ताब्यांत दिलें. हा मनुष्य पदवीधर असून भगवानांनीं सरटिफिकेट देऊन नोकरी लावून दिली नाहीं म्हणून नाखूष व नाराज होऊन भगवानांच्या अंगावर चढाई करण्याचा प्रयत्न करीत होता असें समजलें. या दोन्ही प्रसंगीं भगवानांच्या मनाची समता यत्किंचितहि ढळली नाहीं, ते नेहमीं-प्रमाणें शांत व स्वस्थ होते. असो.

---

* " प्रहसितं प्रिय प्रेमवीक्षणं, विहरणं च ते ध्यानमंगलम्."

—भागवत स्कंध १०–३१–१०.

(**अर्थ**) हे प्रियकरा तुझें मधुर हास्य, प्रेमळ पहाणें व मंदगतीचें चालणें हीं सर्व ध्यान करण्यास मंगल आहेत." यावर श्रीवामनपंडितानीं गोपीगीतांत म्हटलें आहे—" सरस हास्य, सप्रेम पाहणें, विहरणें चिदानंदलक्षणें." हें भगवान रमण-महर्षींना उत्तम लागू पडेल असें वाटतें.

अरुणाचलाचा प्रवास

वरील सर्व हकीकत ऐकून किंवा हा ग्रंथ वाचून आपणहि अरुणाचळीं जाऊन भगवान रमणमहर्षींचें दर्शन घ्यावें अशी पुष्कळ वाचकांना इच्छा होण्याचा संभव आहे. तशा जिज्ञासू वाचकांसाठीं खालील माहिती मुद्दाम देत आहों.

अरुणाचळ (तामिल नांव तिरुवन्नामलै) हा गांव मद्रास इलाख्यांत उत्तर अर्काट जिल्ह्यांत आहे. उत्तर व मध्य हिंदुस्थानच्या लोकांनीं प्रथम बंगळूर अगर मद्रास या स्टेशनाला जावें. तेथून बंगळूर ते मद्रास या एम्. एस्. एम्. रेल्वेच्या मोठ्या लाईनवर असलेल्या काटपाडी-जंक्शन स्टेशनवर उतरावें. तेथील स्टेशनवर असलेल्या खानावळींत स्नान-भोजनादि उरकून एस्. आय. रेल्वेच्या गाडींत बसून तेथून सुमारें ५८ मैल असलेल्या तिरुवन्नामलै स्टेशनवर उतरावें. या स्टेशनहून रमणाश्रम सुमारें दोन मैल आहे. कुली, झटके (गाड्या) स्टेशनवर मिळतात. अर्ध्या तासाच्या आंत आश्रमांत पोचतां येतें. तेथें जाऊन सर्वाधिकाऱ्यांना भेटावें म्हणजे ते पुढील सर्व व्यवथा करितात. आधीं त्यांना पत्र लिहून कळविल्यास कसलीच गैरसोय होत नाहीं. रात्रौ बायकांना आश्रमांत राहण्याची मनाई आहे. तेव्हां बरोबर बायकामंडळी असल्यास आधीं पत्र लिहून कळविल्यास गांवांत स्वतंत्र बिऱ्हाडाची व्यवथा केली जाते. दक्षिण भागांतून येणाऱ्या लोकांना एस्. आय. रेल्वेच्या व्हिल्लुपुरम् जंक्शन स्टेशनवरून तिरुवन्नामलैला यावें लागतें.

रमणाश्रमाचा दैनिक कार्यक्रम

रमणाश्रमामध्यें तीन मोठे उत्सव होत असतात. (१) कार्तिक महिन्यांतील जत्रा. (२) भगवान रमण महर्षींची जयंती (मार्गशीर्ष –दिसेंबर) आणि (३) त्यांच्या मातोश्रींची पुण्यतिथि (वैशाख–मे). या तिनी उत्सवांच्या प्रसंगीं तेथें अतिशय गर्दी असते. हजारों लोकांच्या झुंडीच्या झुंडी भगवानाच्या दर्शनाला येत असतात आणि

हजारों लोकांनां अन्नसंतर्पण होत असतें. हे तीन उत्सवाचे प्रसंग सोडून एरवीं आश्रमाचा दैनिक कार्यक्रम बहुतेक ठरल्यासारखाच असतो; तो असा:—

भगवान पहांटे ब्राह्ममूहूर्तावर उठतात आणि ध्यानमंदिरांत आपल्या आसनावर बसतात. भक्तमंडळीहि उठून हजर असलेल्या पाहुण्यांच्या सकाळच्या उपाहाराच्या तयारीस लागतात. भगवानहि त्यांना या कामीं पुष्कळदां मदत करितात. कांहीं शेलकी मंडळी ध्यान-मंदिरांत येऊन भगवानासमोर ध्यानस्थ बसतात. इतक्यांत कांहीं वैदिक मंडळी येऊन उपनिषदांचा—तैत्तिरीय व नारायणोपनिषदाचा पाठ म्हणतात. त्यानंतर उजाडल्यावर सर्व मंडळी शौचमुखमार्जनादि कामें उरकून घेतात न घेतात तोंच उपाहाराची घंटा होते. हजर असलेली सर्व मंडळी भोजनगृहांत जाते. भगवान इतर सर्व लोकांबरोबर बाहेर बसतात. 'इडली उप्पमा, काफी वगैरे' उपहाराचा प्रकार असतो. त्यानंतर कांहीं वेळानें भगवान ध्यानमंदिरांत आपल्या मंचकासनावर जाऊन बसले म्हणजे इतर सर्व लोक आपापल्या सवडीनुसार तेथें जाऊन बसतात. भगवान टपाल पाहतात, प्रुफें तपासतात, पुस्तकें पाहतात, तरी त्यांचें लक्ष्य—कृपा-दृष्टि मंदिरांतील सर्व लोकांवर असते. ध्यानमंदिर हें सर्वांना खुलें म्हणजे मुक्तद्वार आहे. सर्वांना समत्वानें यत्किंचितही भेदभाव न करितां वाग-विण्यांत येतें. वाटेल त्यानें यावें, जागा मिळेल तेथें बसावें, मनास वाटेल तर प्रश्न करावे, नाहीं तर ध्यानस्थ बसावें. येणारा इसम कांहीं नैवेद्य म्हणून फळफळावळ किंवा खाद्य पदार्थ भगवानासमोर ठेवून नमस्कार करून बसतो अधिक असेल तर तो सर्व मंडळींना वांटण्यांत येतो. नाहीं तर तो ज्याचा त्याला परत करण्यांत येतो. अकरा वाजल्यावर भोजनाची घंटा होते. त्या-वेळीं सकाळच्यासारख्या दोन पंगति होतात. सोंवळे ब्राह्मण आंत बसतात आणि भगवान इतर सर्वांबरोबर बाहेर बसतात. भात, दोन भाज्या, आंमटी, सार, ताक, दहीं असा भोजनाचा प्रकार असतो. भोजनानंतर दोन तीन तास सर्व जण विश्रांति घेतात. तीन वाजतां पुनः चहाकॉफीची घंटा होते. चहाकॉफीचा कार्यक्रम आटपल्यावर पुनः ध्यानमंदिरांत सकाळच्यासारखी

सर्वांची बैठक होते. ती सायंकाळी सात साडेसातपर्यंत चालते. त्यावेळीं वैदिक मंडळींचा संकृतभाषेंत, कांहीं तामिलभाषेंत पाठ होतो. मध्यंतरीं कांहीं स्त्रीपुरुष गाणीं म्हणत असतात. साडेसातानंतर भोजनाची घंटा होते. दुपारच्याप्रमाणें दोन पंगति होऊन भोजन आटपल्यावर सर्व लोक आपापल्या ठिकाणीं विश्रांति घेण्यास जातात. वाटल्यास कांहीं जण पुनः ध्यानमंदिरांत भगवानासमोर येऊन बसतात. रात्रौ साडेनवाचे सुमारास दिवे कमी करण्यांत येतात तेव्हां सर्वजण झोंपण्यास जातात.

ध्यानमंदिरांत येणाऱ्या मंडळींत तीन प्रकारचे लोक दिसून येतात. (१) ऐहिक किंवा प्रापंचिक दुःखांचीं गाऱ्हाणीं सांगून तीं निवारण करून घेऊन शांति मिळवूं इच्छिणारे. पुष्कळ लोक आपलीं दुःखें भगवानापाशीं निवेदन करितात आणि त्यांनीं कृपादृष्टीनें त्यांचेकडे अवलोकन केलें म्हणजे त्यांचा शोकावेग कमी किंवा नाहींसा होतो अशीं पुष्कळ उदहरणें आहेत. दुःखें सांगता सांगतां शांतिलाभ झाल्याचें उदाहरण आम्हीं स्वतः पाहिलेलें आहे. (२) भगवानांना अनेक प्रश्न विचारून शंकासमाधान करून घेणारे. युरोप अमेरिका येथून येणाऱ्या लोकांचा या वर्गांत समावेश होतो. हे लोक अनेक प्रश्न विचारतात. कांहीं पदवीधर भक्त त्यांचें तामिळभाषेंत भाषांतर करून भगवानाला सांगतात आणि भगवान जें कांहीं उत्तर देतील त्याचें इंग्रजींत भाषांतर करून सांगतात. केव्हां केव्हां भगवान इंग्रजींत स्वतः उत्तर देतात, पण असे प्रकार फार थोडे. हीं प्रश्नोत्तरें इतकीं झालेलीं आहेत कीं, तीं जमवून समग्र प्रसिद्ध केल्यास त्याचे तीन चार मोठे ग्रंथ होतील. भगवानांची उत्तर देणेची तऱ्हा अगदीं अलौकिक व अपूर्व असते असें एका युरोपियन गृहस्थानें आम्हांला सांगितलें. तो म्हणाला “ कोणताही प्रश्न विचारला कीं, त्यांतील शब्दांचें, वाक्यांचे अगर कल्पनांचें पृथक्करण करून त्यांचा वेगवेगळा अर्थ स्पष्ट करून नंतर साकल्यानें सर्व अर्थ सांगावयाचा. ही तऱ्हा फारच उत्कृष्ट असून आम्हांला ती फार आवडते. ” असें सांगून त्यानें एक उदाहरणहि दिलें. एका गृहस्थाचा असा प्रश्न होता कीं, जगाचें हित मी कसें साधावें ? त्यावर भगवानांनीं जग म्हणजे काय, हित—खरें हित

म्हणजे काय, तसेंच जगाचें हित म्हणजे काय आणि हित करणारा तो 'मी' म्हणजे कोण, या कल्पनांचें प्रथम पृथक्करण करून विवरण केलें व नंतर त्यांतील सर्व कल्पनांचा सुंदर समन्वय करून अर्थ सांगितला. हीं प्रश्नोत्तरें प्रसिद्ध झालीं तर मुमुक्षु व जिज्ञासु लोकांना तो एक अपूर्व मेवाच होईल असें आमचें मत आहे.

(३) कांहीं भक्त ध्यानमंदिरांत येऊन नमस्कार करून भगवाना-समोर ध्यान लावून स्वस्थ बसतात. ते कांहीं प्रश्न विचारीत नाहींत किंवा शाब्दिक उत्तराची अपेक्षा करीत नाहींत. एका भक्तानें म्हटल्या-प्रमाणें ("I long to speak to Him, But words he takes away") त्यांच्या मनांत कांहीं विचारावें असें आलें तरी त्यांना कांहीं विचारतां येत नाहीं. कारण, न बोलतां न विचारतांच काम झालें तर प्रश्नोत्तराचा उपद्व्याप कशाला? भगवानाच्या सान्निध्याचा त्यांचेवर इष्ट परिणाम होऊन त्यांना शांति मिळते यांत शंका नाहीं.

" चित्रं वटतरोर्मूले वृद्धाश्शिष्या गुरुर्युवा ।
गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्तु छिन्नसंशयाः ॥ "

[वटवृक्षाखालीं चमत्कार पहा! शिष्य वृद्ध असोन तरुण गुरु कांहीं बोलत नाहीं (मौन हाच त्याचा उपदेश). पण शिष्य सर्व संशयांपासून मुक्त होतात.] असें जे सनत्कुमार अगर दक्षिणामूर्ति यांचेविषयीं विधान केलेलें आहे त्याचा रमणाश्रमांत भाग्यवान् साधकांना अनुभव येतो.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कोणीही रमणाश्रमांत जावोत, त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणें थोडेंबहुत तरी परमार्थपथांत त्यांना उत्थान मिळाल्याशिवाय राहत नाहीं.

महर्षींची शिकवण

भगवान रमण महर्षी हे संभाषण करितांना अगर प्रश्नांचीं उत्तरें देतांना असा नेहमीं उपदेश करीत असतात कीं, तुमच्या आंत पहा, शोध

करा, अंतर्मुख व्हा आणि स्वतःला–आत्म्याला जाणा. केव्हांहि ते या आपल्या मूळपदावर–पालुपदावर किंवा आत्मपदावर आल्याशिवाय राहत नाहींत. याचीं कांहीं थोडीं उदाहरणें देतों. (१) मंत्राचा जप केल्यानें आत्मज्ञान होईल काय या प्रश्नास भगवानांनीं सांगितलें कीं, मंत्र कोण जपतो, मंत्र कोठून येतो, जीभ, ओठ आणि तोंड इत्यादि वाणीचीं साधनें उपयोगांत न आणतां कोण मंत्राचा जप करतो? तो मी कोण, माझें स्वरूप काय, यांचा विचार करा. (२) एकानें प्रश्न केला कीं, आपल्या सांगण्याप्रमाणें मी आत्मशोध करितों, पण त्यावेळीं एका तरुणीविषयीं विचार माझे मनांत येऊन मी आकर्षिला जातों याला काय करावें? भगवानांनीं उत्तर दिलें कीं, कोण पाहतो आणि कोण आकर्षिला जातो? काम विकारानें कोण त्रस्त होतो? कामविकार किंवा विचार कोणाच्या मनांत येतात इत्यादि प्रश्न स्वतःला करून त्यांची उत्तरें काय येतील त्याचा नीट विचार कर म्हणजे तुझें कामविकार नाहींसे होतील. (३) मी देह आहे ही विपरीत भावना साधारण मनुष्याला नाहींशी करितां येईल काय? उत्तर–होय. ही नष्ट करण्याकरितांच लोक, भक्ति–ज्ञान–कर्म–योग या मार्गांचा अवलंब करीत आहेत. पण मुख्य मार्ग फार सोपा आहे. प्रश्न,—मी अज्ञानी असल्यामुळें मला तो माहीत नाहीं तो कृपा करून सांगा. उत्तर–कोणाला माहीत नाहीं आणि काय माहीत नाहीं? यांचा नीट विचार करा व शोध करा. आपण अज्ञानी आहों असें म्हणणारा कोण? त्याचा तुम्हीं शोध करूं लागला कीं तो तुमचा ‘ अहं ’ नाहींसा होतो आणि जे कांहीं उरतें तें आत्मज्ञान किंवा आत्मसाक्षात्कार. (४) मेल्यानंतर जीवाचें काय होतें? उत्तर—तुम्हीं कोण आणि मरतो कोण? याचा विचार करा म्हणजे नित्य अचल सनातन अशा आत्म्याचें ज्ञान होईल. (५) एका भक्ताचा सकाळीं उठल्याबरोबर भगवानाला नमस्कार घालावयाचा परिपाठ होता. एके दिवशीं तो उशीरानें उठला. रोजचा नमस्कार चुकल्याबद्दल त्याला हुरहूर वाटली. नंतर भगवान स्नानास जातेवेळीं त्यानें वाटेंत त्यांना दंडवत घातला. भगवान म्हणाले हें काय? एका देहासमोर दुसरा

देह कां लवत आहे? कोण आणि कोणाला नमस्कार* घालीत आहे? कोण गुरु? कोण शिष्य? आपण कोण याचा विचार करा आणि आत्मसाक्षात्कार करून घ्या.§ अशा तऱ्हेचीं अनेक उदाहरणें सांगतां येतील. पण विस्तारभयास्तव इतकींच पुरीं आहेत.

हा उपदेश दिसण्यांत साधा व सोपा दिसतो, पण या साधेपणांतच गहन अर्थ भरलेला आहे. प्राचीन उपनिषत्कालीन ऋषींनींहि असाच उपदेश केलेला आहे खरा, पण भगवान रमण महर्षींप्रमाणें इतक्या सोप्या भाषेंत व सरळ प्रक्रियेंत असा उपदेश आजपर्यंत कोणी केलेला दिसत नाहीं. एक दोन उदाहरणें देऊन हें स्पष्ट करितों. तैत्तिरीयोपनिषदांत भृगुवल्लींत वरुणानें आपल्या भृगुनामक पुत्राला तप करण्यास

---

* तुम्ही नमस्कार करून रमणमहर्षींना देव बनवीत आहां हें बरें काय असा एकदां एका युरोपियन गृहस्थानें आम्हांस प्रश्न केला. आम्हीं सांगितलें कीं, रमणमहर्षि हे लोकांच्या नमस्काराची पर्वा किंवा अपेक्षा केव्हांच करीत नाहींत. आम्हींच आमचा अहंकार घालवून नम्रता शिकण्याकरितां त्यांना नमस्कार करीत असतों. या उत्तरानें त्याचें समाधान झालेंसें दिसलें.

§ शिष्य म्हणून आपला अंगिकार करावा अशी मि. पॉल ब्रंटन यांनीं विनंति केली होती. तेव्हां भगवानांनीं स्वतः इंग्रजींत उत्तर दिलें कीं, "What is all this talk of masters and disciples. All these differences exist only from the disciple's stand-point. To the one who has realised the true self there is neither master, nor disciple. Such a one regards all people with equal eye. You must find the master within you, within your own spiritual self. You must regard his body in the same way that he himself regards it, the body is not his true Self.—Maharshi and His Message. p. 55. (गुरु आणि शिष्य याविषयीं व्यर्थ बोल–वाद कशाला? शिष्याच्या दृष्टीनें हे सर्व भेद आहेत. ज्याला आत्मज्ञान झालें त्याला गुरुहि नाहीं व शिष्यहि नाहीं. तो सर्वांना समदृष्टीनें पाहतो. तुझ्या स्वतःच्या आंत–आत्म्यांत तुला सद्गुरु भेटेल. माझा देह म्हणजे मी—माझा आत्मा नव्हे असें मी मानतों. तूंहि तसेंच मान.)

सांगून, ' अन्नं ब्रह्म, प्राणो ब्रह्म, मनो ब्रह्म, विज्ञानं ब्रह्म आणि आनंदो ब्रह्मेति ' असे पांच धडे देऊन आत्मज्ञान दिलें. तप म्हणजे तापणें, एकाग्र मनानें विचार करणें, किंवा श्रीएकनाथमहाराजांच्या शब्दांत सांगावयाचें तर " जागृतस्वप्नसुषुप्ति आंत । भगवत्प्राप्तीलागीं चित्त । झुरणीमाजीं पडे नित्य । तप निश्चित या नांव ॥ " (नाथ भागवत अ. २५-५७). प्रत्येक धडा शिकण्याकरितां भृगूनें बराच काल तप केलें आणि ब्रह्म किंवा आत्मा, अन्न-प्राणादि पंचकोशाहून भिन्न आहे असा अनुभव घेतला. छांदोग्योपनिषदांत इंद्रविरोचनाच्या आत्मशोधाची दुसरी एक कथा आहे. " पापजरामृत्युशोकक्षुधापिपासारहित सत्यकाम सत्यसंकल्प अशा आत्म्याचा शोध करावा, जो या आत्म्याचा शोध करून त्याला जाणतो, त्याला सर्व लोक प्राप्त होतात आणि त्याचे सर्व काम पूर्ण होतात " हें प्रजापतीनें प्रतिपादन केलेलें तत्त्व, देव आणि असुर या दोघांनीं ऐकिलें आणि तें शिकून घेण्यासाठीं त्यांनीं आपले प्रतिनिधि इंद्र आणि विरोचन यांना प्रजपतीकडे पाठविलें. त्या दोघांनीं तेथें बत्तीस वर्षें ब्रम्हचर्यव्रतानें राहून तपाचरण केल्यावर प्रजापतीनें त्यांना, जागरितस्थान-वैश्वानर आत्मा-छायात्मा याचा पहिला धडा दिला. असुर विरोचनाला तो धडा नीट समजला नाहीं. यामुळें त्याचें विपरीत आचरण होऊन तो पुढें गळून पडला. इंद्राला या धड्याचा अर्थ नीट कळला, पण त्यानें त्याचें नीट समाधान न झाल्यामुळें तो पुनः परत आला. बत्तीस बत्तीस म्हणजे ६४ वर्षें राहून त्यानें पुढील दोन धडे म्हणजे ' स्वप्नस्थान-तैजसआत्मा-स्वप्नात्मा, आणि सुषुप्तिस्थान-प्राज्ञ आत्मा-निद्रात्मा याचे दोन धडे घेतले. त्यांनींहि त्याचें समाधान झालें नाहीं. पुनः तो परत आला आणि पुढें पांच वर्षें (एकंदर १०१ वर्षें) राहून शेवटचा धडा—अमात्र ॐकाराचा-अद्वैत आत्म्याचा धडा शिकून कृतार्थ होऊन परत गेला. असो. या दोन्हीं कथांतील थोडासा अतिशयोक्तीचा वाटणारा भाग वगळला तरी आत्मशोधाचें काम किती कठीण, दीर्घकालीन त्रासाचें आहें हें स्पष्ट होतें. पण भगवान रमणमहर्षींचें हें अलौकिकत्व व वैशिष्टय आहे

कीं, त्यानीं हा आत्मशोधाचा मार्ग आपल्या अनुभवानें अगदीं सुगम व सोपारा करून टाकिला आहे. प्राचीन ऋषीप्रमाणें पंचकोशादिकांचा निरास करण्यास भगवानहि सांगतात, पण तें त्यांनीं किती सहज व सोपें सांगून टाकिलें आहे पहा. ते म्हणतात कीं, आपण–आत्मा हा शरीर, इंद्रियें, प्राण, मन बुद्धि इत्यादि (पंचकोश) रूपानें असणारें तम म्हणजे अज्ञान नव्हे. तो एकच सत्स्वरूप आहे आणि शरीरादि सर्व जड व असत् आहे. (उपदेशसार श्लोक २२ पान ६१ अर्थ व खुलासा पहा.) भगवानांची मुख्य मदार अशा अवांतर गोष्टींवर नाहीं. मुख्य तत्त्वावर त्यांचा सर्व भार आहे आणि त्यांनीं आपला सर्व अनुभव एकाच श्लोकांत सांगून टाकिला आहे आणि काव्यकंठ गणपती मुनीनें म्हटल्याप्रमाणें वेदान्ताचा सारभूत असा हा श्लोक ज्याला समजला त्याला आत्मज्ञानाबद्दलचा कसलाहि संशय उरणार नाहीं. रमणगीता, अध्याय २ श्लोक २ हा तो श्लोक आहे. त्यांत भगवान म्हणतात कीं, आपल्या हृदयांत प्रत्यक्ष ब्रह्म आहे. हेंच ‘ मी मी ’ म्हणून आत्मरूपानें स्फुरत असतें. एकाग्र मनानें त्या आपल्या आत्म्याचा शोध करीत किंवा बुडी मारीत तुम्हीं हृदयांत प्रवेश करा अथवा प्राणगतिनिरोधानें आत्मनिष्ठ व्हा. भगवान इतकें सांगून मोकळे होत नाहींत; तर आपल्या सामर्थ्यानें व कृपेनें, साधकांनाहि आत्मनिष्ठ होण्यासाठीं मदत करण्यास सदैव तयार असतात. साधकांनीं त्याना सर्वभावानें शरण गेलें पाहिजे आणि आपलें कल्याण करून घेतलें पाहिजे.

भगवानांच्या मतें हें आत्मज्ञान प्राप्त होण्यास थोडासा अधिकारहि आपल्या अंगीं पाहिजे. याचीं दोन गमकेंहि भगवानांनीं रमणगीतेंत, अ. ७ श्लोक १०–११ पान १०४ येथें सांगितलीं आहेत. देहाच्या ठिकाणीं नश्वर बुद्धि आणि विषयांविषयींचें वैराग्य या दोन लक्षणांवरून आपला (आत्मज्ञानाचा) अधिकार आपण ओळखावा असें ते सांगतात. हीं दोन्हीं लक्षणें सरळ व योग्य आहेत. (१) आपला देह हा शाश्वत किंवा नित्य आहे काय ? क्षणोक्षणीं तो बदलत असतो. दर सात सात वर्षांनीं तर त्यांत पूर्ण क्रांति (बदल) होत असतें आणि शेवटीं तो

पडून जातो. तेव्हां देह नश्वर आहे हें सत्य पटवून घेऊन त्याप्रमाणें आपण आपली समजूत कां दृढ करून घेऊं नये ? उलट खेदाची गोष्ट ही कीं, आम्ही देह आहों या विपरीत भावनेनें आम्हीं स्वतःला गुरफटून घेतलें आहे आणि आत्मशोधाच्या मार्गांत हें एक विघ्न उपस्थित केलेलें आहे. तेव्हां देह नश्वर आहे, तो मी नव्हे ही भावना साधकानें प्रथम दृढ करून घेतली पाहिजे. (२) दुसरें लक्षणहि स्पष्ट आहे. आत्मशोधाकरितां एकाग्र मनानें विचार केला पाहिजे. विषयांच्या ठिकाणीं आवड किंवा आसक्ति असली तर मन एकाग्र होणार नाहीं आणि आत्मशोधाच्या प्रयत्नाला यश येणार नाहीं–भगवद्गीतेंत (अध्याय २–६२।६३) सांगितल्याप्रमाणें विषयांचें चिंतन करणाऱ्या पुरुषाचे ठिकाणीं त्या विषयाविषयीं संग म्हणजे आवड किंवा आसक्ति उत्पन्न होते. संगापासून काम (इच्छा, वासना), कामापासून क्रोध, क्रोधापासून संमोह (अविवेक), संमोहापासून स्मृतिभ्रम आणि स्मृतिभ्रमापासून बुद्धिनाश आणि बुद्धिनाशापासून सर्वस्वाचा नाश होतो. तेव्हां ही सर्व अनर्थपरंपरा चुकवावयाची असेल आणि आपलें कल्याण करून घेण्याचें असेल तर विषयाविषयींचें वैराग्य आपल्या अंगीं आम्हीं बाणून घेतलें पाहिजे आणि खऱ्या कळकळीनें आत्मशोधाला लागलें पाहिजे.

आत्मशोध किंवा ' मार्गणमार्ग ' यावरच भगवान सर्वस्वीं भर देतात असें मात्र नाहीं. त्यांचें सांगणें असें आहे कीं, भक्ति–ज्ञान–कर्मयोग या मार्गांत वरपांगी भेद दिसत असले तरी तत्त्वतः ते एकच असून ' मनाला हृदयाच्या ठिकाणीं स्वस्थ करणें , हाच सर्वांचा रोख आहे. (उपदेशसार श्लोक १०, पान ५२ पहा)· याप्रमाणें भगवानांची मुख्य शिकवण थोडक्यांत येथें सांगितली आहे. याविषयींची विशेष माहिती रमणप्रस्थानत्रयींत जागोजाग सूज्ञ वाचकांना मिळेलच.

श्रीरमणवाङ्मय

आतां रमणवाङ्मयाविषयीं योडीशी माहिती येथें देतों. ती विद्वान

व रसिक वाचकांना अनेक दृष्टीनें उद्बोधक व कुतूहलवर्धक होईल अशी आशा आहे.

१ '**अरुणाचल पुराण**' नांवाचा एक मोठा ग्रंथ आहे. त्यांत अरुणाचल क्षेत्राचें माहात्म्य ज्या भागांत दिलेलें आहे त्यांतील मुख्य भागाचें भगवानांनीं कांहीं तामील श्लोकांत वर्णन करून त्याचें नांव 'अरुणाचलमाहात्म्य' असें ठेविलें आहे. याशिवाय अरुणाचलावर (१) अरुणाचल अक्षरमणमलै (२) अरुणाचल नवमणीमलै (३) अरुणाचलपादिकम् (४) अरुणाचल अष्टकम् (५) अरुणाचलपंच-रत्नम् अशीं पांच स्तोत्रें स्वतंत्र रचिलेलीं आहेत. पहिलीं चार तामिल भाषेंत व पांचवें संस्कृतांत आहे. या पांचहि स्तोत्रांचें इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध झालेलें आहे.

२ '**विचारसंग्रह**' इ. स. १९०० मध्यें श्रीयुत गंभीरम् शेषय्यर या नांवाचे एक गृहस्थ तिरुवन्नामलै येथें मुनिसिपल ओव्हरसियर होते. त्यांना योगाची आवड असे. त्यांनीं स्वामी विवेकानंदाचे राजयोग ज्ञानयोग इत्यादि ग्रंथ वाचले होते. ते वाचीत असतां त्यांना कांहीं शंका येत, त्यांचा खुलासा ते भगवानाला विचारीत असत व त्याचीं उत्तरें भगवान कागदाच्या चिठ्यावर लिहून देत असत. अशा चिठ्यांचा एक पुडका गंभीरम् शेषय्यरचे घरीं होता तो त्यांच्या निधनानंतर त्यांचे बंधु कृष्णय्यर यांचेकडून परत मिळाला. त्यांतील सर्व प्रश्नोत्तरें एकत्र करून तामिल भाषेंत 'विचारसंग्रह' नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध केलेला आहे. त्याचें इंग्रजी भाषांतर A catechism of enquiry नांवानें प्रसिद्ध झालेले आहे.

३ चिदंबरचे एक शास्त्री श्री शंकराचार्यांच्या '**विवेक चूडामणी**' ग्रंथांतील कांहीं भागाचा खुलासा भगवानांना विचारीत असत. भगवा-नांनीं तामिल भाषेंत या ग्रंथाचें भाषांतर केलेलें आहे.

४ **आत्मविद्या** फार कठीण आहे असा लोकांचा एक गैरसमज आहे. तो दूर करण्यासाठीं 'आत्मविद्या' नांवाचें एक स्तोत्र भगवा-नांनीं तामिलमध्यें केलेलें आहे. त्याचें संस्कृत भाषांतर त्यांच्या शिष्यानीं प्रसिद्ध केलें आहे. त्याचा मराठी अनुवाद परिशिष्टांत दिला आहे.

५ अद्वैत सिद्धान्ताचा उपदेश करणारा आणि कर्म, भक्ति, योग व ज्ञान या मार्गांचा समन्वय करणारा एक सूत्रप्राय 'उपदेशसार' नांवाचा ग्रंथ अवघ्या तीस श्लोकांत भगवानांनीं तामिल भाषेंत तयार केला. पुढें शिष्यांच्या विनतीवरून भगवानांनीं स्वत: या ग्रंथाचें संस्कृत, तेलगु व मलियाळम् या भाषांत रूपांतर केलें आहे.

६ भक्तांनीं वेळोवेळीं जे कांहीं धार्मिक व सामाजिक प्रश्न भगवानांना विचारिले व भगवानांनीं जीं कांहीं उत्तरें दिलीं तीं सर्व श्लोकरूपानें ग्रथित करून त्याची वासिष्ठ गणपतिमुनि नामक सच्छिष्यानें अठरा अध्यायांची एक संस्कृत गीता केली व तिचें नांव 'रमणगीता' असें ठेविलें.

७ 'सद्दर्शन'— भगवानांचा श्रेष्ठ, अद्वैत प्रतिपादक ग्रंथ म्हणजे त्यांनीं तामिलभाषेंत ४० श्लोकांत रचिलेला 'उल्लतुनार्पतु' (सद्दर्शन) होय. वासिष्ठ गणपतिमुनींनीं याचें संस्कृत श्लोकांत रूपांतर केलेलें असून त्यांचे शिष्य कापाली नामक एक शास्त्री यांनीं त्यावर संस्कृत व इंग्रजी टीका केलेली आहे.

(८) श्रीयुत शिवप्रकाश पिल्ले यांच्या प्रश्नांना भगवानांनीं जीं कांहीं उत्तरें दिलेलीं होतीं, तीं सर्व प्रश्नोत्तरें संवादरूपानें तामिलभाषेंत १९२४ सालीं प्रसिद्ध झालेलीं होतीं. नंतर या प्रश्नोत्तरांवरून रमणदास शेषु अय्यर यांनीं लिहिलेला, कोऽहं (Who am I ?) नांवाचा इंग्रजी छोटा ग्रंथ १९३० व ३२ सालीं प्रसिद्ध केलेला आहे.

याशिवाय आणखी कांहीं भगवानांचें लिखाण—विशेषतः प्रश्नोत्तरें—अद्याप प्रसिद्ध झालेलें नाहीं. भगवानांच्या चरित्राविषयीं इंग्रजींत बी. व्ही. नरसिंहस्वामी यांनीं लिहिलेला "Self-Realization—Life & teachings of Raman Maharshi" या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. तेलगु, तामिल, गुजराथी भाषांत श्रीरमणचरित्रें प्रसिद्ध झालेलीं आहेत. १९३७ सालीं पंडित वेंकटेश्वर शर्मा यांनीं लिहिलेलें हिंदी चरित्र प्रसिद्ध झालें आहे. पॉल ब्रंटनच्या मोठ्या इंग्रजी ग्रंथांत रमणमहर्षींविषयीं आलेलीं तीन प्रकरणें निराळीं काढून तीं The Maharshi and His Message या नांवानें लहान पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलेलीं आहेत. Catechism of Instruction

या नांवाचें छोटें इंग्रजी पुस्तकहि प्रसिद्ध झालेलें आहे. याशिवाय श्रीयुत भारद्वाज विश्वनाथ यांनीं रचिलेलें ‘ रमणाष्टोत्तर शतनाम ’ स्तोत्र, आणि सुंदरानंद स्वामींनीं रचिलेलें ‘ रमणाष्टोत्तर मणिमाला ’ स्तोत्र हीं प्रसिद्ध झालेलीं आहेत. हे सर्व ग्रंथ श्रीनिरंजनानंद स्वामी सर्वाधिकारी रमणाश्रम, रमणाश्रम पोष्ट, तिरुवन्नामलै, दक्षिण हिंदुस्थान यांचेकडे मिळतात.

यापैकीं सद्दर्शन, उपदेशसार आणि रमणगीता या तीन मुख्य ग्रंथांचा आम्ही मराठींत अनुवाद केलेला हा ग्रंथ आहे. हिंदूंच्या सर्व धार्मिक ग्रंथांमध्यें उपनिषदें, ब्रम्हसूत्रें व भगवद्‌गीता हे तीन ग्रंथ श्रेष्ठ आहेत. यांनाच ‘ प्रस्थानत्रयी ’ (म्हणजे मोक्षसंपादक तीन सर्वोत्कृष्ट ग्रंथ) म्हणतात. भगवान श्री रमणमहर्षींचा ‘ सद्दर्शन ’ हा ग्रंथ सूत्रप्राय आणि ज्ञानप्रधान असल्यामुळें, व ‘ उपदेशसार ’ हा छोट्या उपनिषदासारखा असल्यामुळें आणि ‘ रमणगीता ’ ही भगवद्गीतेच्या वळणावर असल्यामुळें आम्ही या तीन ग्रंथांना ‘ श्रीरमणप्रस्थानत्रयी ’ असें अन्वर्थक नांव दिलेलें आहे.

ही प्रस्थानत्रयी तयार करण्याचे कामीं श्रीनिरंजनानंद स्वामी, सर्वाधिकारी रमणाश्रम यांची आम्हांला अतिशय मदत मिळालेली आहे. वेळीं अवेळीं आम्हीं त्यांना अनेक प्रश्न विचारले, अनेक कठीण स्थलांचा खुलासा मागितला. त्यावेळीं त्यांनीं ताबडतोब, न कंटाळतां समाधानकारक उत्तरें पाठवून आम्हांस उत्तेजन दिलें; इतकेंच नव्हे तर प्रकाशनाचें कामहि मोठ्या खुषीनें व हौसेनें त्यांनीं पतकरिलें. या कामीं दोघां आत्मीय मित्रांचीहि फार मदत झालेली आहे. (१) श्रीयुत रामचंद्र कृष्ण कामत, ‘ नामजपाचें महत्त्व ’ आणि ‘ नामचिंतामणि ’ इत्यादि ग्रंथांचें कर्ते व श्रीगुरुचरित्राचे संशोधक यांनीं मदत केली आहे असें म्हणण्यापेक्षां माझेबरोबर मिळूनच काम केलें आहे किंवा माझ्यापेक्षां अधिक काम अथपासून इतिपर्यंत (शेवटीं पुरस्कारहि लिहून) केलें आहे असें म्हणणें योग्य होईल. तसेंच प्रेमळ, उदार आणि थोर अधिकाराचे असे आमचे गुरुतुल्य मित्र श्रीयुत केशवराव देशपांडे बार–ॲट–लॉ बडोदा यांनींहि या कामीं बऱ्याच महत्त्वाच्या व उपयुक्त

सूचना केलेल्या होत्या. पण हा ग्रंथ तयार झालेला पहाणेस ते राहिले नाहींत याबद्दल फार वाईट वाटतें. त्याप्रमाणें अनेक मित्रांनीं आर्थिक मदत देऊन सहानुभूति दर्शविल्यामुळें या ग्रंथाचें प्रकाशनकार्य सुलभ झालेलें आहे. या सर्व मित्रांचे आणि श्रीसिद्धेश्वर प्रेसचे मालक श्रीयुत वा. ना. ठकार यांनीं छपाईचें काम सुंदर करून दिल्याबद्दल त्यांचेहि आभार मानतों.

या ग्रंथाचा विषय अध्यात्मशास्त्राचा असल्यामुळें तो समजण्यास कठीण आहे. भगवान रमणमहर्षि किंवा ज्ञानेश्वरमहाराज यांच्यांसारख्या थोर विभूतींना ' अमृतालाहि पैजेनें जिंकतील अशीं रसिक अक्षरें मेळवून ' गहन विषय रम्य व काव्यमय भाषेंत सांगतां येतात हें खरें. पण त्यांचा अनुवाद आमच्यासारख्या प्राकृत माणसानें अन्य भाषेंत करणें हें धाडसाचें व कठीण काम आहे. तेव्हां हा अनुवाद पूर्ण व निर्दोष आहे असें आम्हांस म्हणतां येणार नाहीं. त्यांत कांहीं न्यून व दोषहि आढळतील तर त्याची सर्व जबाबदारी आम्हांवरच आहे. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे शब्दांत आम्हीं वाचकांना असें विनवितों कीं, " तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें । करूनि घ्यावें हें तुमतें । विनवीत असें ॥". ही आमची विनंति सज्जन वाचक अवश्य मान्य करितील असा आम्हांस भरवंसा आहे.

ता. २७।१२।३९ श्रीरमणषष्ट्यब्दिपूर्तिमहोत्सवदिन	संतकृपाभिलाषी, **नागेश वासुदेव गुणाजी,** वासुदेवाश्रम, ठळकवाडी (बेळगांव).

ॐ तत्सत् ।

श्रीसद्गुरुप्रसन्न.

पुरस्कार

—o—

जंववरी देह आहे, तंववरी साधन ।
करूनिया ज्ञान साधिजे कीं ॥
आहे मी हा कोण करावा विचार ।
म्हणे ज्ञानेश्वर अनुभवें ॥

आमचे विद्वान मित्र श्रीयुत नागेशराव गुणाजी यांनीं यापूर्वीं स्वामी रामतीर्थ, रामकृष्ण परमहंस, आत्मोद्धार (अमेरिकेचे बुकर टी. वाशिंगटनचें चरित्र) इत्यादि पुस्तकें लिहिलीं असल्यामुळें त्यांची वाङ्मयसेवा महाराष्ट्रांतील विद्वान लोकांत प्रसिद्ध आहे. तसेंच त्यांचीं भगवद्गीतेचें आणि पंचरत्नीगीतेचें भाषांतरहि मुंबईचे सुप्रसिद्ध प्रकाशक श्रीयुत केशव भिकाजी ढवळे यांनीं प्रसिद्ध केलेलें धार्मिक लोकांत प्रसिद्ध आहे. त्या सर्व पुस्तकांत प्रस्तुतचें वाङ्मय फारच कुतुहलास्पद व उच्च दर्जाचें ठरेल असें मला वाटतें.

हल्लीं वाङ्मयवृद्धीच्या वृत्तीनें चिन्मयवृत्तीचा ऱ्हास समाजांत होत चालला आहे. अशा वेळीं श्रीयुत गुणाजींचें हें वाङ्मय उच्च शिक्षितांपासून तों मध्यम शिक्षितवर्गापर्यंत सर्वांच्या आदराला पात्र होईल अशी मला आशा आहे.

प्रस्तावनेंत त्यांनीं मि. पॉल ब्रंटन साहेबांच्या ' Search in secret India ' या इंग्रजी पुस्तकावरून ब्रंटन साहेबांच्या उत्कट जिज्ञासेचें चित्र थोडक्यांत रेखाटलें आहे, तें आधुनिक विद्वानांनीं पाहून विचार करण्यासारखें आहे. हिंदुस्थानांतील अनेक साधु व योगी यांची भेट घेऊन, त्यांच्या अंगीं असलेल्या असाधारण शक्तीची पारख करून त्याचीं कारणें व साधनें शोधण्याचा ब्रंटनसाहेबानीं प्रयत्न केला आहे.

अलौकिक शक्तीचे साधु शोधतां शोधतां त्यांना अद्भुत चमत्कार करून दाखविणारे जादुगारही भेटले आहेत. त्यांचे प्रयोगही त्यांनीं तितक्याच जिज्ञासुदृष्टीनें पाहिले आहेत, नुसत्या कुतुहलदृष्टीनें नव्हे.

युरोपियन लोकांची सृष्टीकडे पाहण्याची दृष्टि निराळी व आमच्या लोकांची निराळी. आमचे लोक चमत्कारांकडे गंमत या दृष्टीनें पाहून स्वस्थ राहतील, पण ते लोक त्या चमत्कारांची कारणमीमांसा शोधण्याचा पिच्छा पुरवितील. या त्यांच्या स्वभावामुळेंच त्यांनीं सृष्टिशास्त्राचें म्ह. निसर्ग नियमांचे अनेक गूढ शोध लावून ते पूर्णतेला नेले आहेत व नेत आहेत. आमचे लोक त्यांची तारीफच करीत राहिले आहेत. आतां त्यांचें ते शोध 'जगत: क्षयाय' कारण होत आहेत ही गोष्ट निराळी ! असो.

आमच्या साधुसंतांनींहि चमत्कार केले आहेत, पण असे चमत्कार करणें हें साधूचें लक्षण मात्र नव्हे. असाध्य रोग बरे करणें, मेलेलीं प्रेतें उठविणें, भूतभविष्य सांगणें इत्यादि साधुसंतांचे चमत्कार पाहून 'अनिष्ट-निवृत्ति व इष्टप्राप्ति' होण्याकरितां लोक त्यांना भजतात. कर्म, उपासना किंवा ज्ञान यांपैकीं कोणत्याहि मार्गाचा उत्कट अभ्यास केला म्हणजे अशा सिद्धि प्राप्त होतात. पण यांचा उपयोग स्वार्थ साधण्याकडे कोणी करूं लागेल, तर तो परमार्थापासून भ्रष्ट झाल्याशिवाय रहात नाहीं असा इशारा संतांनीं परमार्थमार्गाच्या साधकाला दिलेला आहे. पण तो अविरक्त पुरुषांकरितां आहे. विरक्त पुरुषांनीं लोककल्याणाकरितां मंत्र-पुरश्चरणें वगैरे करून सिद्धिसामर्थ्य संपादन करावें असें श्रीसमर्थांनीं दासबोधांत सांगितलें आहे. पण हेंच मनुष्यजन्माचें साध्य मात्र नव्हे. सर्व सिद्धींचें किंवा सामर्थ्याचें उगमस्थान जो आत्मा त्याला प्राप्त करून घेणें—जाणणें हेंच खरें म्हणजे अंतिम साध्य होय हें साधकांनीं पक्कें लक्षांत ठेवावें.

विश्वांतील सहस्रावधि जड पदार्थांचा किंवा लक्षावधि गूढ शक्तींचा मनुष्यानें शोध लाविला व त्याच्या साह्यानें सर्व पृथ्वीचें राज्य मिळविलें, इतकेंच नव्हे तर विमानादिकांच्या साह्यानें चंद्रलोकावर किंवा मंगळा-वर स्वारी करून तेथील आधिपत्यही मिळवितां आलें, पण अशा अनंत शक्तींचें व सर्व विश्वाचें अधिष्ठान जो आत्मा त्याचा शोध लावितां आला

नाहीं तर अंतःकरणाला शांति म्हणून कदापि मिळणार नाहीं व शांति नाहीं त्याला सुखाची प्राप्ति होणार नाहीं.—' अशान्तस्य कुतः सुखम् ? '

परमशांति व परमसुख, जें फक्त साधुसंतांनींच मिळविलें तें जड पदार्थांच्या म्हणजे विषयेंद्रियाच्या मागें लागणाऱ्या कोणाहि विद्वानाला किंवा सार्वभौम राजालाहि मिळणें शक्य नाहीं. फार काय सांगावें, सप्त पाताळ व सप्त स्वर्ग यांचेंहि आधिपत्य अर्वाचीन शोधांच्या साह्यानें किंवा प्राचीन यज्ञयागादिकांच्या साह्यानें मिळवितां आलें तरी तें त्यायोगेंही मिळणार नाहीं. पदार्थविज्ञान किंवा इंद्रियविज्ञान इत्यादि जड शास्त्रें तेथें पंगू ठरतात.

इंद्रियगम्य सुख हें पशूंचें, मनोगम्य सुख हें मनुष्यांचें व बुद्धिगम्य सुख हें देवांचें होय. पण ' यो बुद्धेः परतस्तु सः ' असें ज्याचें वर्णन भगवद्गीतेंत केलें आहे त्या आत्म्याचें सुख हें संतांचें होय. ह्या आत्मसुखालाच अतींद्रियसुख, ब्रह्मसुख, महासुख, ब्रह्मानंद, आत्मानंद, स्वानंद, निजानंद, परमानंद, निरतिशयानंद इत्यादि नांवें आहेत. आणि हा आनंद मिळविण्याकरितांच मनुष्य जन्म आहे. हें न ओळखतां मनुष्य असूनहि तो विषयानंदांतच तृप्ति मानूं लागला तर त्याच्यांत व पशुपक्षी, कृमिकीटक यांच्यांमध्यें काय फरक राहिला ? परंतु हा विचार सुद्धां मनांत येण्यास अनंत जन्मांचें सुकृत लागतें. अशा सुकृताचें पुंज म्हणजेच साधुसंत.

साधुसंत हे अशा परमोच्चपदाला पोचले असतात आणि म्हणूनच ते विषयेंद्रियसंयोगजन्य सुखाला तुच्छ लेखतात, नव्हे, तसे लेखतात तेव्हांच ते अतींद्रिय सुखाला पोचतात. इंद्रियसुख हें प्रथम सुखच नव्हे, सुखाचा भास आहे व भास देखील दुःखमूल आहे म्हणजे दुःखपरिणामी आहे. हें जाणून विवेकी पुरुष त्यांत रममाण होत नाहींत. " ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते । आद्यन्तवन्तः कौंतेय न तेषु रमते बुधः ॥ (भ. गीता. ५·२२)

तात्पर्य, आत्मेतर सुखाच्या शोधांमागें न लागतां आत्मसुखाचा म्ह. आत्म्याच्या शोधाला जो तीव्रतेनें लागतो त्यास त्या आत्म्याचा साक्षात्कार शीघ्र होतो हें श्रीरमणमहर्षींच्या चरित्रावरून व त्यांच्या बोधावरून दिसून येतें.

आत्मसाक्षात्काराचीं साधनें अनेक संतांनीं अनेक प्रकारचीं सांगितलीं आहेत. त्याप्रमाणें श्रीरमणमहिर्षीनींहि सांगितलीं आहेत. त्यांत खालील तीन साधनांचा ते प्रामुख्यानें उल्लेख करितात.

१ मार्गण, २ मज्जन व ३ प्राणरोधन.

अशीं त्यांचीं नांवें आहेत. रमणगीता अध्याय २ यांत त्यांचा उल्लेख असून त्या अध्यायाचें नांवहि 'मार्गत्रयकथन' असें आहे. **मार्गण** साधनाचा विचार सद्दर्शन श्लोक ११, १३, १६, २९ मध्यें, उपदेशसार श्लोक १७, १९, २० मध्येंहि आलेला आहे. तसेंच **मज्जन** साधनाचा विचार सद्दर्शन श्लोक ३०–३१ मध्यें, उपदेशसार श्लोक २१ मध्यें आणि **प्राणरोधन** साधनाचा विचार उपदेशसार श्लोक ११, १३, १४ मध्यें विशेषेंकरून आलेला आहे.

भावना करण्यापेक्षां शोध करणें चांगलें.

" ब्रह्मैवाहं न संसारी, मुक्तोऽहमिति भावयेत् ।
भावयितुमशक्तश्चेद्वाक्यमेतत्सदाभ्यसेत् ॥ "

असें श्रीशंकराचार्यांनीं सांगितलें आहे. याचा अर्थ—'मी ब्रह्म आहे, संसारी जीव नव्हे, मी मुक्त आहे अशी भावना करावी; भावना करणें शक्य नसेल तर 'मी ब्रह्म आहे' या वचनाचा अभ्यास करावा असा आहे. कारण भावनेवांचून तोंडानें एकसारखें म्हणत राहिलें तरी वाणींमधून कधींतरी मनांत उतरल्याशिवाय रहात नाहीं. पण श्री रमण-भगवान म्हणतात कीं, तुम्हीं एकाग्रमनानें 'मी कोण आहे' याचा तीव्रतेनें शोध करा, शोध करतां करतां तुम्ही या तत्त्वाला आपोआप पोंचाल. कृत्रिम भावना करण्याचें कारणच नाहीं. 'मी ब्रह्म' हें आपोआपच स्फुरूं लागेल. शोध करणें जितक्या तीव्रतेनें होईल, तितक्या शीघ्रतेनें प्राप्ति म्हणजे साक्षात्कार लाभेल. हें म्हणणें अगदीं बरोबर आहे. 'तीव्रसंवेगाद्वा' हें पातंजलसूत्र तर प्रसिद्धच आहे. मुमुक्षा म्हणजे मोक्षाची भगवत्प्राप्तीची–आत्मप्राप्तीची इच्छा इतकी तीव्र

म्हणजे उत्कट झाली पाहिजे कीं, त्यावांचून दुसरें कांहीं सुचतां कामा नये, त्यावांचून जेवणखाणही गोड लागतां कामा नये. मग शरीराचे इतर भोग तर दूरच राहिले. ‘ देहं वा पातयेत् कार्यं वा साधयेत् ’ अशी मनाची अवस्था झाली पाहिजे. म्हणजे हा साक्षात्कार दूर नाहीं. याविषयीं श्रीरामकृष्ण परमहंस नेहमीं एका गुरुशिष्याची गोष्ट सांगत असत. त्या गुरूनें आपल्या शिष्याला पाण्यांत बुडवून, दडपून धरून पाण्याबाहेर येण्याची आणि श्वसन करणेची आवश्यकता व तळमळ याचा धडा शिकविला. त्याचप्रमाणें आत्मसाक्षात्काराची जरूरी व तळमळ असेल तरच काम लवकर फत्ते होईल. याप्रमाणें आत्म्याच्या शोधाविषयीं साधकानें शक्तिसर्वस्व खर्च केलें पाहिजे. तेव्हां त्याचा साक्षात्कार होईल. यालाच ‘ निदिध्यास ’ म्हणतात. निदिध्यासाशिवाय साक्षात्कार नाहीं.

पण एक लक्ष्यांत ठेविलें पाहिजे तें हें कीं, श्रवणमनननिदिध्यासानें साक्षात्कार होतो असें म्हणणें एका अर्थी बरोबर नाहीं. साक्षात्कार हा सहजसिद्ध आहे. श्रवणमनननिदिध्यासानें साक्षात्काराचे प्रतिबंध तेवढे दूर होतात. तात्पर्य आत्मस्वरूपावरील आवरण नामक मुख्य प्रतिबंध जोराच्या ‘ मार्गणानें ’ नाहींसा होतो. दृश्य पदार्थ वोसरतां। अवघा आत्माचि तत्त्वता। नेहटून विचारें पाहतां। दृश्य मुळींच नाहीं॥ ” (दासबोध ८।८।५५) असा अनुभव येतो. यांतील ‘ नेहटून ’ हा शब्द फार महत्वाचा आहे. तीव्र संवेग यालाच म्हणतात.

मार्गणानें एकदां आत्मप्रकाश झाला, तरी तेवढ्यावर तृप्त राहतकामा नये. त्यांत ‘ मज्जन ’ म्ह. बुडी मारून राहतां आलें पाहिजे. हें सत्साधकाला नंतर सहज साधतें. आत्मप्रकाश म्ह० अपरोक्ष अनुभव आला तरी पहिल्यांदा तो कोमल असतो. त्याला ‘ कोमल अपरोक्ष ’ म्हणतात. मज्जनानें हीच अवस्था दृढ होते. तेव्हां त्याला ‘दृढ अपरोक्ष’ म्हणतात.

आतां मार्गण–मज्जन हीं साधनें शुद्धचित्त पुरुषाला लवकर साधतील. ज्याच्या अंतःकरणांत वासनाजंजाल पुष्कळ आहे त्याला हें फार कठिण आहे. त्यानें ‘ प्राणनिरोधानानें ’च वृत्तिनिरोध केला पाहिजे. योगवासिष्ठांतही असेंच सांगितलें आहे.

" द्वौ क्रमौ चित्तनाशाय योगो ज्ञानं च राघव ।
योगो वृत्तिनिरोधो हि ज्ञानं सम्यगवेक्षणम् ॥"

प्राणरोधनानें वृत्तिनिरोध होतो व वृत्तिनिरोधेनानें दृश्यादि प्रतिबंध नाहींसे होऊन ' चित्ताचें चैतन्य ' म्ह. आत्मसाक्षात्कार होतो.

मार्गण अभ्यासानें जशी सिद्धि होते तशी मंत्रजपापासून होते कीं नाहीं असा प्रश्न एका शिष्यानें केल्यानंतर भगवान रमण महर्षींनीं " अचंचल मनानें केलेल्या मंत्राच्या किंवा प्रणवाच्या निरंतर जपानें श्रद्धावान लोकांना सिद्धि प्राप्त होते." (रमणगीता ३–९–१०, पान ८७) असें उत्तर दिलें आहे. ही गोष्ट महाराष्ट्र संतांच्या नामसंप्रदायी लोकांना आनंदकारक वाटल्यावांचून राहणार नाहीं.

या पुस्तकास श्रीयुत गुणाजींनीं ' श्रीरमणप्रस्थानत्रयी ' हें दिलेलें नांव अगदीं अन्वर्थक आहे असें वाचकांस वाटल्यावांचून रहाणार नाहीं. प्राचीन काळापासून रूढ असलेल्या प्रस्थानत्रयीमध्यें भगवद्गीता, दशोपनिषदें व ब्रह्मसूत्रें असे तीन ग्रंथसमूह प्रसिद्ध आहेत. या प्रस्थानत्रयीमधील गीतेच्या जागीं गीता आहेच. उपनिषदाच्या जागीं उपदेशसार व ब्रह्मसूत्रांच्या जागीं सद्दर्शन ठेवतां येईल असें मला वाटतें.

' सद्दर्शन ' ग्रंथ हा यांत पहिल्यांदा घेतला आहे. सद्दर्शन म्ह. सद्वस्तूचें अर्थात् ब्रह्माचें दर्शन. या दर्शनाचें स्वरूप सांगतांना प्रथम त्या वस्तूचें म्ह. ब्रह्माचें लक्षण सांगून त्या वस्तूच्या ठिकाणीं तादात्म्यनिष्ठा (निष्ठा म्ह. निरंतरची अथवा पराकाष्ठेची स्थिति) हेंच ' सद्दर्शन ' असें सांगितलेलें आहे. हरिगुरुकृपेनें हें दर्शन घडल्यानंतर "सुखदुःखादि सर्व द्वंद्वें व दृश्य–द्रष्टा–दर्शन, ज्ञेय–ज्ञाता–ज्ञान इत्यादि सर्व त्रिपुट्या" गळून पडतात व वस्तुसाक्षात्कार करून घेतलेला अचल निष्ठावान पुरुष केव्हांही चलन पावत नाहीं असें श्लोक १०,११ (पृष्ट १४–१५) मध्यें सांगितलें आहे. हें खऱ्या जिज्ञासूनें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

अहंवृत्ति–मीपणाचें ज्ञान कुठून उठतें हें शोधून काढलें पाहिजे. अहंवृत्तीचें मूळ म्हणजेच आत्मा आणि आत्मा म्हणजेच आपण. मीपणाच्या ज्ञानापूर्वींचा जो आपण तो आत्मा. प्रत्येकाच्या हृदयांत ' मी मी '

असें जें स्फुरण होतें तें कोणत्या घटकद्रव्याचें बनलेलें आहे याचा शोध म्हणजे विचार केला असतां तें जड द्रव्य नसून केवळ चैतन्य आहे याची खात्री होते. ही अहंवृत्ति हृदयांत स्फुरल्यानंतर मग देहाला व्यापते. आणि देह मी म्हणायाला लागते. तिला देहाकडे येऊं न देतां तिच्या मूळाकडे नेलें पाहिजे. एकदां ती आपल्या मूळाकडे वळली, तिनें आपल्या मूळाचा ठाव घेतला म्हणजे काम झालें. तेंच आत्म्याचें रूप.

अर्जुनपण न घेतां । 'मी' ऐसें जें पंडुसुता ।
उठतसे तें तत्वता । तयाचें रूप ॥

—ज्ञानेश्वरी १८.१३१५

आत्मस्वरूपाचा अशा तऱ्हेनें म्हणजे संशयरहित निश्चय एकदा झाला तरी, बुद्धीला झालेला देहात्मभावाचा संस्कार मोडण्याकरितां आत्म्याचें अनुसंधान करावें लागतें. हें अनुसंधान करण्यासाठीं 'दिक्' व 'काल' यांचें तत्त्व सांगून तदनुरोधानें आत्म्याचें अनुसंधान कसें करावें हें श्लोक १७ व १८ (पृष्ठ १९।२०) मध्यें सांगितलेलें अश्रुतपूर्व आहे. सत्तत्वजिज्ञासूला तें अत्यंत अभ्यासनीय वाटल्यावांचून रहाणार नाहीं. व तशा अभ्यासाला लागल्यावांचून त्याला रहावणार नाहीं. सारांश,

" आत्मबुद्धि निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची ।
'अहमात्मा' हें कधींचि । विसरों नये ॥ "—(दासबोध)

अज्ञ व ज्ञानी यांना जगाचें अस्तित्व अथवा सत्यत्व भासतेंच. पण अज्ञान्याला जग जगरूपानें सत्य भासतें व ज्ञान्याला तें ब्रम्हरूपानें सत्य भासतें, हें २० श्लोकांत (पृष्ठ २३) मोठ्या गंमतीनें सांगितलेलें आहे. 'विश्व ब्रम्हचि ठेलें' हें श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें प्रगट गुज (Open secret) आहे. " चैतन्याचें अन्यथा भान । तें हें जाण चराचर ॥ " असें श्रीएकनाथमहाराजही आपल्या भागवतांत सांगतात. सारांश साधकांनीं प्रथम 'अहंब्रम्हास्मि'चा अनुभव घेतला पाहिजे, त्यानंतर 'सर्वं खल्विदं ब्रम्ह'चा अभ्यास अथवा अनुभव सुलभ होतो.

" आदौ ब्रम्हाहस्मीत्यनुभव उदिते खल्विदं ब्रह्म पश्चात् "

—श्रीशंकराचार्यकृत शतश्लोकी.

यानंतर प्रारब्ध–प्रयत्नविषयक चर्चा, आत्मदर्शनावांचून ईश्वर-दर्शन ही नुसती मानसिक भावना आहे, खरा ईश्वर साक्षात्कार कोणता, अहंकार व आत्मा यांतील भेद ‘अहं’चा शोध घेणेंच सर्व संगजयाचा उपाय, अहंकाराचा उदयच न होणें हीच सत्यस्थिति म्ह. स्वात्मास्थिति होय, मौनानें म्ह. शांत व एकाग्र मनानें आपल्या मूळस्थानाचा शोध घेणें हाच खरा आत्मविचार, आत्मस्वरूप जर सहजसिद्ध आहे तर त्याच्या ठिकाणीं सहजनिष्ठा कां प्राप्त होत नाहीं, देहात्मभाव स्फुरत असे-पर्यंतच सोऽहंभावाची जरूरी, अहंकर्तृत्वभावाच्या त्यागानेंच कर्मनाश, सत्यस्वरूप आत्म्याला बंधहि नाहीं व मोक्षहि नाहीं, रूपिणी अरूपिणी व उभयात्मिका याप्रमाणें तीन प्रकारच्या मुक्ति, याहून खरी म्ह० पर-मार्थ मुक्ति निराळी इत्यादि विषय इतक्या सोप्या तऱ्हेनें सांगितले आहेत कीं, त्याचें वर्णनच करवत नाहीं.

याप्रमाणें या सद्दर्शन ग्रंथामधील निवडक स्थळें दाखवीत बसण्या-पेक्षां वाचकांना तें मूळामधून त्यांच्याच वाणीनें वाचून पहाण्याची शिफारस करणेंच चांगलें.

यानंतरचें उपदेशसार हें प्रकरण वर म्हटल्याप्रमाणें दशोपनिषत्सार आहे असें समजण्यास हरकत नाहीं. हें कामदा वृत्तांत रचिलेलें दिसतें. पण दोन दोन चरणांचा एकेक श्लोक धरलेला आहे हें थोडें चमत्कारिक वाटतें. परंतु ही छंदशास्त्राची दृष्टि सोडून देऊन वेदान्तशास्त्राच्या दृष्टीनेंच हें पाहिलें पाहिजे. कर्मापासून अथवा कर्मांमुळेंच फळ मिळतें हें खरें, पण तें देणारा ईश्वर असतो. कर्म हें जड असल्यामुळें स्वतः फलोत्पादक नाहीं. व्यवहारांतसुद्धां काम केल्यामुळें पगार मिळतो खरा, पण तो देणारा धनी कोणी तरी लागतोच. याचप्रमाणें अदृष्ट कर्माचें फळ देणाऱ्या ‘चेतन’ ईश्वराची गरज आहे, सुख व दुःख हीं पुण्य व पाप कर्मांचीं फळें आहेत. पण तीं ईश्वराकडूनच मिळतात. हा सिद्धान्त-उपदेशसाराच्या पहिल्या श्लोकांत सांगितला आहे.

सुख व दुःख यांत विषमता दिसली तरी तशीं फळें देणारा जो, ईश्वर त्याच्यांत विषमता किंवा नैष्ठुर्य नाहीं, कारण तो कर्माला अनुसरून

फळ देत असतो, आपल्या लहरीप्रमाणें देत नाहीं. मातेच्या बुद्धींत विषमता नसते. जरूरीप्रमाणें ती आपल्या मुलांना निरनिराळें खाद्य देईल किंवा प्रसंगविशेषीं अपराधामुळें शिक्षाहि करील. पण त्या शिक्षेंत देखील तिचें कारुण्य भंग पावत नाहीं. तसेंच ईश्वराचें समजावें. ईश्वराला 'वैषम्य व नैर्घृण्य' (नैष्ठुर्य) दोष लागत नाहींत हें ब्रह्मसूत्रांत व इतर वेदान्तग्रंथांत सोपपत्तिक रीतीनें सिद्ध करण्याची पराकाष्ठा केलेली आहे. सारांश अशीं हीं तत्त्वें या उपदेशसारांत सूत्ररूपानें गोविलीं आहेत.

निष्काम कर्मे ईश्वरार्पणबुद्धीनें करावीं असें इतर पुष्कळ ग्रंथांत सांगितलें आहे, पण तिसऱ्या श्लोकाच्या अर्थाखालीं जो खुलासा दिला आहे त्यांत "ईश्वरार्पणबुद्धीनें म्ह० हे विश्वाध्यक्षा परमेश्वरा, तुझ्या प्रेरणेनें मी हें कर्म करीत आहे, तुझ्या जगत्कार्याला हवा तसा याच्या फळाचा उपयोग किंवा विनियोग करून घे' असें जें सुचविलें आहे तें फारच चिंतनीय आहे.

यानंतर पुढच्या श्लोकांत कायिक–वाचिक–मानसिक कर्मे कोणतीं व सर्व जगताचें ईशबुद्धीनें सेवन करणें हें अष्टमूर्तिधारी परमेश्वराचें पूजन होय इत्यादि जें सांगितलें आहे तें साधकांनीं अनुष्ठानांत म्हणजे आचरणांत आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या रीतीनें '**जगदेव हरिर्हरिरेव जगत्**' ह्या भावनेनें जगाला पाहूं लागलें म्हणजे त्या भक्ताला लवकर सिद्धि प्राप्त होते. योगयागजपतपादि साधनांत अनेक विघ्नें येण्याचा संभव असतो, पण हरिरूप जगत् पाहणाऱ्यास विघ्नांची बाधा होत नाहीं. कारण त्याला विघ्नांतसुद्धां मग हरिच दिसूं लागतो, त्याला अपायच उपाय होऊन बसतात. याविषयीं श्रीएकनाथ महाराज म्हणतात कीं:–

भक्तां सर्वभूतीं भगवद्भावो । तेथ विघ्नांसी नाहीं ठावो ॥
तयां अपावोचि होय उपावो । भावार्थी देवो साह्य ॥

—नाथभागवत, अध्याय ३.

अनन्य प्रीतीं मज शरण । सर्व भूतीं मद्भावन ।
अभेदबुद्धीं माझें भजन । त्यासी सर्वथा विघ्न बाधीना ॥

—नाथभागवत–अध्याय ८.

वरील नाथवचनांमधील ' सर्वभूतीं ' या शब्दाचा अर्थ सर्व प्राणीमात्र असा तर आहेच पण त्यापेक्षां व्यापक म्ह० पंचमहाभूतांची सर्व चराचर सृष्टि असाच घेतला पाहिजे. उपदेशसारामधील वरील ५ श्लोकांत हाच अर्थ अभिप्रेत आहे. भक्तीची सीमा व ज्ञानाची पराकाष्ठा देखील हीच आहे.

यानंतरच्या श्लोकांत कायिक-वाचिक-मानसिक जपाचें स्वरूप व उत्तरोत्तर श्रेष्ठता, तुपाच्या धारेप्रमाणें अविरल ध्यान करणेची आवश्यकता, अभेदभावनेची पवित्रता, व अभेदभावनेच्या उपासनेनें लाभणारी वृत्तिशून्य अवस्था यांचें वर्णन (श्लोक ६ ते ९) फार चांगलें आहे. नवव्या श्लोकाच्या खुलाशामध्यें दिलेलीं श्रीएकनाथमहाराज व श्रीनारायणमहाराज जाळवणकर यांचीं वचनें फारच गंभीर व मननीय आहेत.

यानंतर हृदयामध्यें मन स्थिर करण्यानें कर्ममार्ग, भक्तिमार्ग, योगमार्ग व ज्ञानमार्ग हे चारही साधतात असें सांगून (श्लोक १०) मन हृदयांत स्वस्थ करण्याचे **लय** व **नाश** नांवाचे दोन मार्ग आहेत. पैकीं मनोलय झाला तरी पुनः कांहीं वेळानें तें (मन) आपल्या रोजच्या स्वरूपांत उठतेंच, पण मनोनाश झाला म्हणजे मन हें मनपणानें न उठतां त्याचें ' उन्मन ' होतें असें सांगितलें आहे (श्लोक ११ ते १४).

पुढें १६ व्या श्लोकांत तत्त्वदर्शन म्हणजे निजचित्स्वरूपाचें दर्शन असें सांगून त्याचा खुलासा श्रीसमर्थ व त्यांचे भक्त श्रीबांदकरमहाराज यांचीं वचनें देऊन केला आहे तो फारच मार्मिक आहे. यानंतर मन म्हणजे आहे तरी काय याचा शोध करूं लागणें हाच मनोनाशाचा उत्तम उपाय होय, वृत्ति हेंच मन, व मन म्हणजे अहंकार हा कोठून उद्भवतो याचा शोध करण्यास आरंभ केला म्हणजे तो गळूनच पडतो. हा मनोमय एक देशी अहंकार नाश पावल्यावर त्या ठिकाणीं परम पूर्ण असा ' हृत्स्वरूप ' अहंकार स्फुरण पावूं लागतो. मनोमय अहंकाराला गौण अहंकार व आत्मगत अहंकाराला (जो गाढ निद्रेंत सुद्धां लय पावत नसून सत्तारूपानें सदैव स्फुरतच असतो त्याला) मुख्य अहंभाव-अहंस्फूर्ति म्हणतात असें २०व्या श्लोकापर्यंत सांगितलें आहे.

हा मुख्य अहं म्ह. आत्मा सद्रूप आहे व चिद्रूपहि आहे. ईश्वर व जीव उपाधिभेदानें वेगळे भासले तरी दोघेही एकाच रूपाचे म्ह० सत्तारूप आहेत म्हणूनच याला ' सद्वस्तु ' म्हणतात. जीवानें आपल्या पिंडोपोधीचा त्याग केला म्हणजे त्याला स्वात्मदर्शन होतें व स्वात्मरूपानें ईशदर्शन होतें. या स्वात्मदर्शनालाच ' आत्मसंस्थिति ' अथवा ' आत्मनिष्ठा ' म्हणतात व ही आत्मनिष्ठा द्वैतभाव निघून गेल्यावरच होते; ही आत्मनिष्ठा प्राप्त झाली, अर्थात् सद्रूप व चिद्रूप यांत वृत्ति स्थिरावली म्हणजे आत्म्याचें आनंदरूप प्रगट होतें, वृत्यारूढ होते. हेंच बंधमोक्षातीत ' परमसुख ' होय. यालाच निजसुख, निजानंद, आत्मानंद व. ब्रम्हानंद म्हणतात. हेंच नरदेहाचें अत्यंत श्रेष्ठ व अंतिम साध्य होय-याच्या प्राप्तीनें गौण अहंकाराचा नाश होऊन आत्मस्वरूपाचें भान होऊं लागतें व हेंच ' परमतप ' होय असें सांगून हें उपदेशसाररूपी रमणोपनिषत् संपविलें आहे.

आतां **रमणगीता** ग्रंथाविषयीं सांगतांना ' गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रसंग्रहैः ' या वचनाप्रमाणें ती कंठगत अथवा आत्मगतच करावी; इतर शास्त्रें घेऊन काय करावयाचीं आहेत असेंच सांगावेसें वाटतें. या गीतेचें माहात्म्य—वर्णन किंवा तिचें समालोचन कोणी यथार्थ करूं म्हणेल तर तो ग्रंथहि तेवढाच मोठा होण्याचा संभव; करितां विस्तारभयास्तव तसें न करितां अनुक्रमणिकाच लक्ष्यपूर्वक वाचून पहावी व नुसती ग्रंथ वाचनावरच तृप्ति न मानतां ज्यांना साक्षात्कारासाठीं कांहीं तरी करावेसें वाटेल त्यानें 'मनोनिग्रहोपाय' नामक सहावा अध्याय लक्ष्यपूर्वक वाचून त्याप्रमाणें अभ्यास करूं लागावें अशीच शिफारस करावीशी वाटते. झंझावातापेक्षां किंवा विजेपेक्षांहि चपल किंवा चंचल असणाऱ्या मनाचा निग्रह कसा करावा हें त्यांत फारच उत्तम सांगितलें आहे. प्राणरोधानें वृत्तीचा निरोध व वृत्तिरोधानें वृत्तीचें जन्मस्थान जें आत्मस्वरूप त्या आत्मस्वरूपांत साधक स्थिर होतो, असें सांगून प्राणरोधाचें अत्यंत सुगम साधन ५ व्या श्लोकांत सांगितलें आहे. दुसरें, इतर वेदान्त ग्रंथांत अगदीं मिळणार नाहीं असें यांत कांहीं असेल तर

१० व्या अध्यायांत सांगितलेली 'संघविद्या' होय. एका जुन्या मताच्या वेदान्ती व सिद्ध पुरुषाचें, राष्ट्र किंवा समाजसंघटनाविषयक मत कसें आहे व तें किती विचारणीय आहे हें या अध्यायावरून समजून येईल.

सिद्धिप्राप्तीला नियमांची आवश्यकता आहे कीं नाहीं (पृष्ठ ८६) ज्ञान कशाला म्हणतात हा प्रश्न व त्याचें उत्तर (पृष्ठ ८९,९०) ब्रह्म हें वृत्तिव्याप आहे काय? (पृष्ठ ९०–९१), हृदय कशाला म्हणतात (पृष्ठ ९२), हृदयाहून श्रेष्ठ असा दुसरा कोणी नाहीं, हृदयांत स्थित झालेल्यास द्रष्टा व दृश्य एकच होऊन जातात (पृष्ठ ९६), निद्रा मूर्च्छा आणि समाधि यांतील भेद (पृष्ठ ९७). याशिवाय इतर अनेक मुद्यांचें विवरण करणें विस्तारभयास्तव शक्य नाहीं. वाचकांनीं हे सर्व मुद्दे अथवा विषय मूळांतून वाचून मनन करावेत अशी पुनः शिफारस करितों.

या ग्रंथत्रयीशिवाय अनुवादकांनीं यांत आणखी कितीतरी सुंदर सुंदर विषय गोंवले आहेत. सारांश श्रीयुत गुणाजी यांना श्रीरमण-महर्षींचें वचनामृत आपल्या महाराष्ट्रबंधूंना किती पाजावें तेवढें थोडेंच वाटत आहे असें दिसतें. याची साक्ष त्यांनीं या ग्रंथाच्या शेवटीं दिलेलें 'आत्मविद्या' प्रकरण पाहिलें असतां दिसून येईल. असो.

'सर्वभूतसुहृद्' परमात्मा या त्यांच्या प्रेमश्रमाचें महाराष्ट्रजनते-कडून योग्य चीज करवो अशी त्यांच्या चरणीं प्रार्थना करून, तसेंच ही सेवा करण्याची संधि दिल्याबद्दल मित्रवर्य श्रीयुत गुणाजी यांचे आभार मानून व परमात्म्याचें वर्तमान सगुणरूप भगवान श्रीरमणमहर्षी यांना सप्रेम साष्टांग प्रणिपात करून ही यथामति केलेली सेवा त्यांच्याच चरणीं समर्पित करितों.

हल्लीं मुक्काम
श्रीसमर्थसदन, गिरगांव मुंबई
ता. ४।१२।३९

संताचा चरणरज,
रामचंद्र कृष्ण कामत,
श्रीदुर्गादत्तमंदिर, माशेल गोंवा.

ॐ

भगवान रमणमहर्षींच्या चरित्रांतील तीन मुख्य भाग.

‘ नाहं देहो ’

(१) वयाच्या १७ व्या वर्षीं आपण आतां मरणार असें त्यांना एकदम वाटलें व मनांत धडकी भरली. त्यावेळीं ‘ आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां ’ हें त्यांनीं प्रत्यक्ष अनुभवून ‘ आपण देह नव्हे ’ अशी पूर्ण खातरी करून घेतली.

‘ कोऽहं? सोऽहम् ’

(२) नंतर आपण देह नव्हे तर कोण ? याचा शोध करण्यासाठीं परमात्म्याच्या प्रेरणेनुसार ते अरुणाचलीं आले आणि तेथें त्यांना लवकरच आपण परमात्माच आहों (सोऽहं) असा पूर्ण अनुभव मिळाला. हा अनुभव इतका जोरदार होता कीं, त्यांची वाचा बंद पडली, विचारशक्ति खुंटली आणि देहस्मृति हारपली. या विदेहस्थितींत त्यांनीं बरींच वर्षें एकांतवासांत आणि मौनांत काढलीं.

‘ आपण तरोनि विश्व तारा ’

(३) याप्रमाणें ते आपण तरून आतां विश्वाला तारण्यास मोक्षाची पाणपोई घालून बसले आहेत आणि हें त्यांचें काम अखंड, अव्याहत व सुसंघटित असें श्रीकृपेनें हल्लीं चाललें आहे.

भगवान श्रीरमणमहर्षि यांचें अल्पचरित्र.

" काश्यां मरणान्मुक्तिः स्मरणादरुणाचले ॥ "

काशीक्षेत्रामध्यें देह ठेविला असतां मुक्ति मिळते असें एक वचन व तदनुसार आमची भावना आहे. तसेंच अरुणाचलाच्या नुसत्या स्मरणानें मुक्ति मिळते असेंहि एक वचन व तदनुसार आमची भावना आहे. काशीक्षेत्र सर्वांना माहीत आहे, पण अरुणाचल क्षेत्राची माहिती सर्वांना नसल्यामुळें ती आम्हीं देत आहों.

ज्योतिर्लिंग

दक्षिण हिंदुस्थानांत पंचमहाभूतांचीं निदर्शक अशीं पांच पवित्र क्षेत्रें आहेत. त्यांना 'पंचलिंग' असें म्हणतात. पृथ्वीतत्त्वाचें क्षेत्र तिरुवरुयार म्हणजे तंजावर, आपतत्त्वाचें क्षेत्र जंबुकेश्वर, तेजतत्त्वाचें क्षेत्र तिरुवन्नामलै म्हणजे अरुणाचल, वायुतत्त्वाचें क्षेत्र काळहस्ती आणि आकशतत्त्वाचें क्षेत्र चिदंबर असें म्हणतात. यांपैकीं तिसऱ्या क्षेत्राला ज्योतिर्लिंग म्हणतात.

अरुणाचलाची त्रैमूर्ति

तामिल भाषेंत 'तिरुवन्नामलै' याचा अर्थ (तिरु = पवित्र, वन्ना = अरुण व मलै = पर्वत) पवित्र अरुणाचल असा आहे. तिरुवणामलै हें स्टेशन साउथ इंडियन रेल्वेच्या काटपाडी ते व्हिलुपुरम् या लाईनवर असून काटपाडीहून ५८ मैल आहे. हें क्षेत्र किंवा गांव मोठा असून त्याची लोकसंख्या अजमासें तीस हजार होईल. हा गांव डोंगराच्या पायथ्याशीं वसलेला आहे. या क्षेत्रांत त्रैमूर्ति म्हणजे तीन देवता आहेत. श्री 'अरुणाचल' नामक शिवाचें एक फार मोठें देवालय श्रीवेणुगोपाळ यांच्या मालकीचें असून त्यांचीं चार मोठीं व उंच गोपुरें आहेत व देवालयासभोंवतीं उंच दगडी तटबंदी आहे. यामुळें हें देवालय म्हणजे एक मोठा तटबंदी किल्लाच आहे असें वाटतें. या

देवालयाचें मागें अरुणाचल पर्वत आहे. हा पर्वत शिवलिंगाच्या आकाराचा असून त्याचे सभोंवार आठ मैल चांगली सडक (रस्ता) आहे. या रस्त्याला ‘ प्रदक्षिणापंथ ’ असें म्हणतात. प्रत्येक मंगळवारीं या रस्त्यानें भाविक लोक अरुणाचल पर्वताला प्रत्यक्ष शिवलिंग मानून सावकाश न बोलतां प्रदक्षिणा घालीत असतात. प्रतिवर्षी कार्तिक शुद्ध पक्षांत पंचमी ते पौर्णिमेपर्यंत दहा दिवस या क्षेत्रांत अजमासें एक लाख लोकांची यात्रा भरत असते. दशमीदिवशीं संध्याकाळीं अरुणाचलाच्या देवालयांतून देवाची स्वारी पालखींतून बाहेर निघते न निघते तोंच अरुणाचल पर्वताच्या शिखरावर कित्येक मण कापूर व तूप यांची एक प्रचंड ज्वाला पेटविली जाते. ही ज्वाला (तेजोलिंग) दृष्टीस पडतांच आपणास प्रत्यक्ष तेजोमय परमेश्वराचें दर्शन झालें असें आजुबाजूचे सर्व लोक मानून भक्तिभावानें नमन करितात आणि कांहीं काळ संसार विसरून अरुणाचलाचें–परमज्योतीचें ध्यान करितात. या पर्वताच्या दुसऱ्या बाजूच्या पायथ्याशीं असलेल्या पालीतीर्थाजवळ एक नवीन आश्रम (रमणाश्रम) स्थापन झालेला आहे. त्या आश्रमांत एक जिवंत देवता आहे. तिचें नांव भगवान श्रीरमणमहर्षि. या देवतेचा अल्पपरिचय आम्हीं येथें वाचकांना करून देत आहों.

जन्म व बाळपण

मद्रास इलाख्यांत रामनाद जिल्ह्यांत मदुरेहून तीस मैलांवर त्रिशूळपूर (तामील नांव तिरुच्चुली) नांवाचा एक लहानसा गांव आहे. तेथें गेल्या शतकाचे शेवटीं पाराशर गोत्री सुंदरमय्यर नांवाचे एक ब्राम्हण रहात असत. प्रथम ते अर्ज दस्त लिहून देण्याचें काम करीत पण पुढें मुखत्यार वकील बनले. त्यांचें घर म्हणजे सर्वांना एक मुक्तद्वारच झालेलें होतें. पक्षकार, साक्षीदार, गोरगरीब, सरकारी दरबारी लोक, भटभिक्षुक इत्यादि सर्वांचे तेथें नेहमीं सुस्वागत होत असे. सुंदरमय्यर हे स्वभावानें करारी, निश्चयी, सहनशील आणि मनुष्यांची व वस्तूंची योग्य पारख करणारे होते. त्यांना त्यांची साध्वी पत्नी श्रीमती सौंदर्याम्बा (तामील नांव अलगम्मा) हिच्यापासून तीन पुत्र व एक

कन्या अशीं चार अपत्यें झालीं. ज्येष्ठपुत्र नागास्वामी यांचा जन्म सन १८७८ सालीं झाला. द्वितीयपुत्र (आमचे चरित्रनायक) व्यंकटरमण यांचा जन्म ता. ३० डिसेंबर १८७९ रोजीं झाला. आणि कनिष्ठ पुत्र नागसुंदरं (हल्लींचे रमणाश्रमाचे सर्वाधिकारी ' निरंजनानंदस्वामी ' म्हणून प्रसिद्ध असलेले) यांचा जन्म १८८६ सालीं झाला. व्यंकटरमण यांचें बालपण इतर सामान्य मुलांप्रमाणेंच गेलें. त्यांच्यांत विशेष असें त्यावेळीं कांहीं दिसून आलें नाहीं. त्यांची बुद्धि साधारण इतर मुलांसारखीच; पण खेळांकडे अधिक प्रवृत्ति. कुस्ती लढणें, मारामारी करणें पोहणें व इतर मर्दानी खेळ यांत ते नेहमीं रमत व भाग घेत असें सांगतात. त्यांचें प्राथमिक शिक्षण त्यांच्या जन्मगांवींच झालें. तदनंतर पुढील शिक्षणाकरितां ते एक वर्ष दिंडीगल येथें राहून दुय्यम शिक्षणाकरितां मदुरा येथें आपल्या चुलत्याकडे जाऊन राहिले.

तरुणपण

तरुणपणीं विशेष लक्षांत ठेवण्याजोग्या अशा त्यांच्यांत दोन गोष्टी दिसून आल्या. (१) दिवसा जागृत अवस्थेंत ते नेहमीं विचाराच्या तंद्रींत असत. त्यांच्या मनांत कोणते विचार घोळत असतील हें कोण जाणे ? पण ' कोऽहं, कस्त्वम्, कुत आयातः ' असेच विचार त्यांच्या मनांत येत असावेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. (२) त्यांची झोंप फार गाढ होती, कुंभकर्णी होती असें म्हटल्यास चालेल. असें सांगतात कीं, एकदां १८९१ सालीं दिंडीगल येथें घरची सर्व मंडळी देवदर्शनार्थ गेली होती. व्यंकटरमण (महर्षींचें पूर्वींचें नांव) दरवाजा बंद करून निजले. मंडळी परत आल्यावर त्यांनीं दरवाजा ठोठावला, हापटला, जोरजोरानें पुकारा केला, सर्व कांहीं प्रयत्न करून पाहिले तरी व्यर्थ. शेवटीं भिंत फोडून दरवाजा उघडावा लागला. या कुंभकर्णी अवस्थेचा फायदा वेंकटरमणाचे सहाध्यायी व खेळगडी घेत असत. जागृदवस्थेंत ते त्यांना वचकून असत, पण निद्रावस्थेंत ते त्यांना बाहेर नेत, अंगभर प्रहार करीत व मार देत असत आणि परत त्यांना खोलींत आणून सोडीत. पण त्यांना त्याचा गंधहि नसे. ही अवस्था Mystical

Nature म्हणजे एकाग्रता, समाधि–अवस्था याची निशाणी म्हणजे दर्शक आहे असे मानसशास्त्रवेत्ते म्हणतात.

अरुणाचलस्मृति

मदुरा येथील हायस्कुलांत अभ्यास करीत असतां १८९५ च्या अखेरीस त्यांच्या गांवचा एक आप्त व्यंकटरमणाला भेटला. 'कोठून आला आपण' असें त्यास विचारतां 'अरुणाचलाहून' असें त्यानें उत्तर दिलें. अरुणाचल हा शब्द ऐकतांच व्यंकटरमणाचे मनांत आदर, पूज्यता, पावित्र्य, आनंद व ईश्वराचें सर्वव्यापी अस्तित्व इत्यादि पवित्र भावना जागृत झाल्या आणि ते एकदम उद्गारले–"काय अरुणाचलाहून आपण आला ! कुठें आहे तो अरुणाचल !" ही त्यांची वृत्ति पाहून त्या आप्ताला आश्चर्य वाटलें आणि त्यानें उत्तर दिलें कीं, "तुला तिरुवन्नामल्लै माहीत नाहीं कां ! तिरुवन्नामल्लै म्हणजेच अरुणाचल." या उत्तरानें त्यांची तात्पुरती शांति झाली असें दिसलें.

पेरियापुराण

याच सुमारास घरीं त्यांच्या चुलत्यानें कोणाकडून तरी मागून आणलेला पेरियापुराण नांवाचा ग्रंथ त्यांना वाचावयास मिळाला. त्यांच्या वाचनांत आलेला हाच पहिला धार्मिक ग्रंथ होय. तो त्यांना फार आवडला आणि अत्यंत आवडीनें त्यांनीं तो मन लावून वाचिला. त्यांत दिलेलीं ६३ तामील संतांचीं चरित्रें, त्यांची निष्काम भक्ति, त्यांचा उज्वल स्वार्थत्याग, त्यांची अचल श्रद्धा, त्यांचा अमृतानुभव इत्यादि वाचून त्यांना अपरिमित आनंद झाला आणि आपणहि त्यांचेसारखें व्हावें असें त्यांच्या मनांत भरलें. कांहीं कालानंतर ही त्यांची वृत्ति मावळली व ते पुनः आपल्या नेहमीच्या व्यवसायांत गुंतले. त्या वेळीं इंग्रजी सहाव्या इयत्तेचा अभ्यास ते करूं लागले होते.

'आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां'

त्यानंतर १८९६ सालीं म्हणजे वयाच्या सतराव्या वर्षी त्यांच्या आयुष्यांत क्रांति करणारा असा अद्भुत प्रसंग घडून आला. त्याची

हकीकत स्वतः भगवानांनीं सांगितली, ती अशीः— “ एके दिवशीं मदुरा येथें चुलत्याच्या घरीं माडीवर मी एकटाच बसलों असतां एकाएकीं माझ्या मनांत मृत्यूची धडकी भरली. मी आतां खास मरणार असें मला वाटूं लागलें. असें कां वाटूं लागलें हें समजलें नाहीं. मित्रांचा, आप्तेष्टांचा किंवा डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असेंहि वाटलें नाहीं. हें संकट किंवा कोडें मीच स्वतः सोडवावें असा निश्चय केला. मरण तर आतां आलेंच. पण मरण म्हणजे काय चीज आहे ती पाहूं तरी असें म्हणून मरणाचा अनुभव घेण्यास सुरवात केली. लगेच मीं हस्तपादादि अवयव पसरून ताठ केले. मढ्यासारखी शरीराची ठेवण केली. शवासनच घातलें म्हणाना. मरणाचा ‘ सीन ’ (देखावा) हुबेहुब साधण्यासाठीं मी माझें तोंडहि बंद केलें, ओंठ आवळले, डोळे मिटले आणि श्वासहि बंद केला. प्रत्यक्ष मरणाचें सोंग सर्व आणलें. मग म्हटलें कीं, आतां हें शरीर तर मेलेंच. याला आतां घाटावर घेऊन जातील आणि जाळून भस्म करितील. पण काय चमत्कार सांगावा ! लगेच त्या क्षणीं दुसरा एक असा विचार मनांत आला कीं, शरीर हें तर मेलें खरें, पण मी कांहीं मेलों नाहीं. शरीर जड व अचेतन झालें खरें, पण शरीराच्या पलीकडे (आंत) ‘ मी ’ म्हणून कोणी तरी हें मरण पाहणारा आहेच. ती वस्तु कांहीं नष्ट झाली नाहीं. शरीराहून निराळ्या अशा त्या वस्तूचा मला भास होत आहे. तेव्हां शरीराहून निराळी अशी चेतन वस्तु—चिद्वस्तु—मी आहे. असें ठाम ठरलें. तर्कानें किंवा वादविवादानें ही गोष्ट ठरली नाहीं. तर मला तिचें एकदम प्रत्यक्ष ज्ञानच झालें. बस्स, मृत्यूची धडकी जशी भरली होती, तशी ती लगेच पार नाहींशीहि होऊन गेली. तेव्हांपासून ‘ मी ’ म्हणजे शाश्वत सनातन वस्तु किंवा शक्ति आहे, अशी माझी भावना कधींहि नाहींशी झाली नाहीं इत्यादि ”. श्रीतुकाराम महाराजांनीं म्हटल्याप्रमाणें “ मरण माझें मरोन गेलें। मज केलें अमर ”॥ अशीच त्यांची स्थिति झाली.

“ तो जाहला सोहळा अनुपम्य ”

हा अनुभव आल्यानंतर त्यांचा स्वभाव मात्र पूर्ण पालटला.

त्यांच्या पूर्वीच्या संवयी गेल्या. त्यांना एकान्तवास फार आवडूं लागला. आपणांत आपण रमावें असें त्यांना वाटूं लागलें. अन्नाविषयीं आवडनावड नाहींशी झाली. प्रसंगोपात्त मिळेल तें अन्न, रुचि, वास, जातपात किंवा तऱ्हा इत्यादि गोष्टींकडे न पाहतां ते सेवन करूं लागले. मदुरा येथील मीनाक्षी-सुंदरेश्वर देवालयांत जाऊन तेथील शिव, मीनाक्षी, नटराज आणि त्रेसष्ट तामील संत यांच्या मूर्तींपुढें ते तासचे तास उभे राहूं लागले आणि ईश्वराची कृपा व्हावी म्हणून भक्तिभावानें प्रार्थना करूं लागले.

महाभिनिष्क्रमण

पण ही त्यांची वृत्ति त्यांचे चुलते व वडील बंधु यांना आवडली नाहीं. त्यांना वाटलें कीं, हा हुशार व होतकरू मुलगा बिघडत चालला. बंधुराजानें त्यांना ज्ञानी, योगी, भक्त श्रेष्ठ इत्यादि टोमणे मारून चिडवून पाहिलें पण सर्व व्यर्थ ! सोक्षमोक्षाचा किंवा आणीबाणीचा प्रसंग केव्हां तरी ओढवणार असें त्यांना वाटूं लागलें आणि तसा तो लगेंच आलाहि. शनिवार ता. २९ माहे आगष्ट १८९६ हाच तो दिवस. त्या दिवशीं त्यांनीं इंग्रजी व्याकरणाचा धडा नीट तयार केला नाहीं म्हणून बेनच्या व्याकरणांतून तो धडा तीनदां लिहून आणावा अशी त्यांना वर्गांत मास्तराकडून शिक्षा फर्माविण्यांत आली. त्याप्रमाणें घरीं येऊन त्यांनीं तो धडा दोनदां लिहून काढला. तिसऱ्यांदा लिहिणार तोंच त्यांच्या मनानें उचल खाल्ली. झालें, सर्व कारभार आटपला. त्यांनीं बेन ठेविला गुंडाळून, कागद दिले फेंकून आणि आसन घालून, डोळे मिटून, स्वारी ध्यान लावून बसली. बंधुराज हें सर्व आडून पहातच होते. ते एकदम ओरडून म्हणाले, कीं, ‘ योगी, ऋषी यांचेसारखें व्हावयाचें असेल तर हें सर्व (अभ्यासाचें-परीक्षेचें) अवडंबर कशाला ?’ या खेपेस बंधुराजाची ही मर्मोक्ति त्यांना बरीच झोंबली आणि ते आपल्याशींच म्हणाले कीं बंधुराजांचें म्हणणें खरें आहे; आतां माझें येथें काय काम ? लगेंच त्यांच्या मनांत अरुणाचलाची कल्पना भरली. सर्वज्ञ सर्वशक्तिमान असा तो अरुणाचल प्रभु आपणास बोलावीत आहे असें त्यांना वाटूं लागलें

आणि त्यांनीं तिकडे जाण्याचा आपल्या मनांत घाट घातला. ‘ श्रीचिदंबरला गेल्यावर परत मागें कोण फिरतो ’ या साधु नंदाच्या उक्तीप्रमाणें आपण अरुणाचलास जावयाचें आणि कांहींहि झालें तरी परत यावयाचें नाहीं असा त्यांनीं निश्चय केला आणि हें काम बिनबोभाट कसें करितां येईल याचा विचार चालविला. कांहीं वेळानें त्यांनीं बंधुराजास कळविलें कीं, आपण दुपारीं शाळेस जाणार आणि यापुढें अभ्यास नीट करणार. हें ऐकून बंधुराज खूष झाले आणि म्हणाले कीं, खालीं पेटींतून पांच रुपये घेऊन जा आणि तुझ्या शाळेजवळील माझे कॉलेजांत जाऊन माझी फी भरणा कर. व्यंकटरमण मनांत फार खूष झाले. ईश्वर आपणास कशी मदत करीत आहे हें पाहून त्यांना आनंद वाटला. लगेंच त्यांनीं जेवण उरकून घेतलें आणि चुलतीकडे जाऊन पांच रुपये मागून घेऊन शाळेंत न जातां त्यांनीं थेट स्टेशनचा रस्ता धरला.

“ यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ”

घर सोडून जातां जातां घाईनें त्यांनीं एक चिठीवजा पत्र खरडलें आणि तें घरीं कोणालाहि मिळेल अशा जागीं ठेवून दिलें. त्यांतील मजकूर असा होता कीं “ पित्याच्या शोधार्थ त्याच्या आज्ञेप्रमाणें मी निघालों. हें चांगलें काम आहे. याकरितां यासंबंधीं कोणी शोक करूं नये. आणि माझ्या शोधार्थ पैसा खर्च करूं नये. ”

ता. क. कालेजची फी दिलेली नाहीं. दोन रुपये सोबत आहेत. } आपला,
× × × × ×.”

गाडी त्या दिवशीं बरीच ‘ लेट ’ होती. ही त्यांना प्रभुयोजनाच वाटली. जुनें टाईमटेबल पाहून दोन रुपये देऊन त्यांनीं तिंडीवनचें टिकीट काढलें, आणि गाडी येतांच ते गाडींत जाऊन बसले. बाकीच्या उतारूंचीं मनें आपापलें सामानसुमान नीट लावून ठवण्यांत गुंतलीं. पण त्यांचें मन ध्यानमग्न झालें. ‘ जेथें तुमचें धन तेथें तुमचें मन. ’ उतारूंचें धन ट्रंकांत व पेट्यांत असल्यामुळें त्यांची ते काळजी

घेऊं लागले पण यांचें तनमनधन अरुणाचलाकडे लागलें. डब्यांत एक मौलवी, साधूंविषयीं गोष्टी सांगत होता. त्यानें या छोकऱ्याची चौकशी करून तिरुवन्नामल्लैला कसें जावें याविषयीं बरोबर माहिती दिली. यावरून ते त्रिचनापल्लीवरून व्हिल्लुपुर जंक्शनवर येऊन तेथून मंबलपट्टला आले. तेथें उतरून ८।१० मैल पायीं चालून वे अरयाननिल्लुर गांवीं पोचले आणि तेथील अतुल्यनाथेश्वराचें दर्शन घेऊन रात्रौ किल्लूर येथें आले. तेथें विराटेश्वराच्या देवालयांत त्यांनीं ती रात्र कशीबशी काढून पहांटे सोमवारीं, ता. ३१ आगष्ट १८९६ इ. रोजीं गोकुळाष्टमीच्या दिवशीं ते मुत्तुकृष्ण भागवत यांचे घरीं आले. त्या घरच्या गृहलक्ष्मीनें या बाल अतिथीचें योग्य स्वागत करून त्यांना प्रथम देवाचा नैवेद्य दिला. आपलें सामानसुमान वाटेंत हारवलें असें सांगून त्यांनीं मुत्तुकृष्ण भागवत यांचेकडे आपल्या कानांतील भिकबाळी गहाण ठेवून त्यांचेकडून चार रुपये उसने घेतले आणि स्टेशनचा मार्ग धरिला. जातांना त्या माईनें थोडेसें पाथेयहि दिलें. पैसे व पाथेय घेऊन ते स्टेशनवर येऊन निजले आणि ता. १ सपटंबर १८९६ रोजीं मोठ्या पहांटेस चार आणे देऊन तिरुवन्नामल्लैचें टिकीट काढून गाडींत बसले आणि एक दोन तासांतच ते तिरवन्नामलै येथें येऊन दाखल झाले.

पित्याच्या पायांशीं

ता. १ सप्टंबर १८९६ रोजीं सकाळीं अरुणाचल पर्वत व अरुणाचल म्ह० त्याचीं उंच गोपुरें हीं त्यांच्या दृष्टीस पडलीं. साधु नंदाला श्रीचिदंबराच्या देवालयाचें गोपूर पाहून जसा आनंद झाला किंवा पंढरीच्या वारकऱ्यांना श्रीविठोबाच्या देवालयाचा कळस पाहून जसें आनंदाचें भरतें येतें, तसाच आनंद त्यांना त्यावेळीं झाला. देवालयाचीं सर्व द्वारें त्यावेळीं खुलीं होतीं. ते तडक गर्भगृहापर्यंत गेले आणि आपण सर्वस्वाचा त्याग करून येथें तुमच्या पायांपाशीं दाखल झालों असें त्यांनीं साष्टांगप्रणिपातपूर्वक प्रभूला निवेदन केलें. तात्काळ त्यांचा सर्व शीणभार नाहींसा झाला आणि सर्व आधिव्याधींचें निरसन होऊन त्यांना अपरोक्षानुभूतीचा—निरतिशय सुखाचा तेथें लाभ झाला.

अनुभवाचें वैशिष्ट्य

हा त्यांचा अनुभव इतका तीव्र व जोरदार होता कीं, त्यामुळें त्यांची वाचा बंद पडली, त्यांची विचार–शक्ति खुंटली आणि ते स्वरूपीं इतके मग्न होऊन गेले कीं, त्यांची देहस्मृतिही हारपली. अशा या विदेह स्थितींत त्यांना बरींच वर्षें एकान्तवासांत आणि मौनांत काढावीं लागलीं. ही त्यांची खडतर तपश्चर्याच होय असें म्हटल्यास चालेल. अशा या स्थितींतहि केव्हां केव्हां कोणी तीव्र मुमुक्षूंनीं (गंभीरम् शेषय्यरसारखे) त्यांना शरण येऊन कांहीं शंका विचारल्या तर त्यांचीं उत्तरें चिठ्याच्या तुकड्यावर लिहून ते त्यांचें समाधान करीत. आतां आमच्या सुदैवानें ते जरी नेहमीं आपल्या सहजावस्थेंत असले तरी आमच्यांत मिसळून आम्हांला उपदेश करण्यास आणि आमचेवर कृपा करण्यास सदैव तयार असतात हे ईश्वराचे आमच्यावर उपकार होत. त्यांचा हा अनुभव अगदीं और व विलक्षण असाच होता. इतिहासांत तो अद्भुत व अपूर्व होय. कारण त्यांना सद्गुरु शोधावा लागला नाहीं, कोणाकडून उपदेश घ्यावा लागला नाहीं. किंवा त्यांना कांहीं साधन करावें लागलें नाहीं. श्रीकृपेनें ते एकदम परमात्मपदावर आरूढ झाले आणि तेथें स्थिर होऊन आतां लोकांनाहि आत्मज्ञान देऊन ‘ आपणासारखे ’ करण्याचें त्यांनीं सुरूं केलें.

खडतर तपश्चर्या

नंतर त्यांनीं एका न्हाव्याकडून क्षौर करून घेतलें. पण शरीराला स्नानाचें सुख द्यावें असें त्यांना वाटलें नाहीं. जवळपास जे कांहीं पैसे उरले होते ते त्यांनीं फेंकून दिले. तेव्हांपासून तों आजतागायत त्यांनीं पैशास स्पर्श केला नाहीं. अंगावरच्या कपड्याच्या चिंध्या करून त्याही त्यांनीं फेंकून दिल्या. पण त्यापैकीं एक तुकडा घेऊन त्याची कौपीन परिधान केली. यज्ञोपवीपतालाहि रजा दिली. तेव्हांपासून ते आतांपर्यंत एक कौपीनच परिधान करीत आहेत. “ कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः ” हेंच खरें आहे. अशी पूर्ण तयारी करून त्यांनीं आपल्या तपश्चर्येस आरंभ केला.

प्रथम त्यांनीं कांहीं आठवडे देवालयांतील सहस्रमंडपांत काढले. तेथें त्यांना उनाड व द्वाड मुलांच्या दगड व मातीचीं ढेकळें यांच्या फेंकीपासून त्रास होऊं लागला, म्हणून त्यांनीं त्या मंडपाच्या एका बाजूस असलेल्या भुयाराचा–पाताळलिंगाचा आश्रय केला. तेथेंहि किडे मुंग्या इत्यादि प्राण्यांपासून त्यांना बराच उपसर्ग झाला आणि त्यांच्या मांड्यातून पू व रक्त वाहूं लागलें. शेषाद्रिस्वामी या नांवाचे एक साधु यापूर्वीं ४।५ वर्षें तेथें आले होते, त्यांनीं व व्यंकटाचल मोदलीयार यांनीं त्यांना तेथून काढून गोपुर सुब्रह्मण्यस्वामीच्या मंदिरांत आणून ठेविलें. तेथें कांहीं महिने राहून पुढें ते अरुणाचल देवालयाच्या आग्नेय बाजूला असलेली फुलवाडी, नंतर वाहनमंडप, शिवगंगा तीर्थाजवळील बिल्ववृक्ष, मधुकवृक्ष, मंगेपिळ्ळयार मंदिर, इत्यादि ठिकाणीं गेले. १८९६ च्या मार्गशीर्ष महिन्यांत त्यांचे पहिले भक्त उदंडी नायनार व अन्नामलै तंबिरान यांनीं त्यांना तेथून आणून तिरुवन्नामलैच्या एका मोहल्यांत ‘ गुरुमूर्तम् ’ नांवाच्या समाधि मंदिरांत आणून ठेविलें. कांहीं दिवसांनंतर नायनार व तंबिरान हे गेल्यावर पलनिस्वामी नांवाचे एक मलियाळी साधु त्यांचेजवळ राहून त्यांची सेवा करूं लागले व अखेरपर्यंत सेवा करीत राहिले. येथें असतांना तालुका शिरस्तेदार वेंकटरामय्यर यांनीं सत्याग्रह करून त्यांचें एका चिठीवर ‘ वेंकटरमण तिरुचुळी ’ असें नांव लिहून घेतलें. तेव्हांपासून हे कोणच्या गांवचे आहेत व कोण आहेत आणि यांना लिहितां वाचतां येतें तें तिरुवन्नामलैकरांना समजलें व ते त्यांना ‘ ब्राम्हणस्वामी ’ असें म्हणूं लागले. अठरा महिने या मंदिरांत वास केल्यानंतर येथें लोकांची गर्दी दर्शनास येऊं लागल्यामुळ ते नजीक असलेल्या वेंकटराम नायकरच्या आंबराईत राहणेस गेले. तेथें राहत असतां त्यांच्या घरच्या मंडळींना त्यांचा पत्ता लागल्यामुळें त्यांचे चुलते नेलियप्पय्यर हे त्यांना घरीं परत घेऊन जाण्यास आले. पण तेथें त्यांची डाळ कांहीं शिजली नाहीं. सहा महिने येथें राहिल्यावर १८९८ च्या सप्टंबर महिन्यांत ते अरुणगिरीनाथ मंदिरांत येऊन एक महिनाभर राहिले. तेथून पुढें ते अरुणाचलेश्वर मंदिराच्या

मीनारांत-गोपुरांत कांहीं दिवस राहून नंतर प्रवालगिरी नांवाच्या अरुणाचलाच्या एका गांवालगतच्या टेंकडीवर राहणेस गेले. येथें राहत असतां त्यांची मातोश्री आपल्या वडील मुलासहित दिसेंबरच्या सुटींत आली आणि त्यांना परत घरीं घेऊन जावें म्हणून तिनें आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली आणि शेवटीं मातांचें ब्रह्मास्त्र (अश्रु) हि सोडून पाहिलें, पण तें कांहीं उपयोगी पडलें नाहीं. शेवटीं पंचयप्पा पिल्ले नामक एका सज्जनाच्या विनवणीवरून "प्रारब्धाप्रमाणें सर्व कांहीं होत असतें, आलिया भोगासि असावें सादर, देवावरी भार घालोनिया, ठेविलें अनंतें तैसेचि राहावें, चित्तीं असो द्यावें समाधान" अशा अर्थाचा मजकूर त्यांनीं लिहून देऊन आपल्या मातोश्रीची बोळवण केली.

यानंतर ते अरुणाचल पर्वतावर राहणेस गेले. येथें ओंकाराच्या आकृतीप्रमाणें असलेली विरुपाक्ष गुहा, सद्गुरु स्वामी गुहा, गुहनमःशिवाय गुहा, मुलैपाल (स्तन्य) तीर्थाजवळील आम्रगुहा, स्कंदाश्रम या ठिकाणीं त्यानीं वास केला. यापैकीं विरुपाक्षगुहा ही प्रशस्त, निवाऱ्याची आणि सोयीस्कर अशी जागा असल्यामुळें तेथेंच त्यांचा बराच काळ–(१६–१७ वर्षें) गेला. १९०० सालीं त्यांचे थोरले बंधु मातेसहित त्यांना भेटून गेल्यानंतर लगेच वारले. १९०२ सालीं कनिष्ठ बंधु नागसुंदरम् त्यांना भेटावयास आले. त्यानंतर त्यांची माता व इतर आप्त त्यांना भेटण्यास केव्हां केव्हां येत असत. १९१४ सालीं तिरुपतीस जाऊन श्रीबालाजी (व्यंकटेशा) चें दर्शन घेऊन माता त्यांना भेटण्यास विरूपाक्ष गुहेंत आली व तेथें विषमज्वरानें आजारी पडली. त्यांतून ती बरी होऊन पुनः मनमदुरेस परत गेली. १९१५ सालीं नागसुंदरम् यांची पत्नी एका अर्भकाला मागें ठेवून परलोकीं गेली. तेव्हां विरक्त होऊन आपल्या कनिष्ठ पुत्रासह त्यांची आई त्यांचेबरोबर राहणेस आली आणि त्यांची व भक्तमंडळीची सेवा करू लागली. यामुळें तिचें वैराग्य दृढ होऊन समदृष्टि व निष्काम कर्माचरण यांची प्राप्ति होऊन तिनें संन्यास घेतला. १९२२ सालीं तिनें अखेरची समाधि स्कंदाश्रमांत घेतली. नागसुंदरम् यांनींहि योग्य काळीं संन्यास घेऊन 'निरंजनानंद

स्वामी ' असें नामग्रहण केलें आणि आणि आतां ते श्रीरमणाश्रमाच्या सर्वाधिकाऱ्याचें काम पहात आहेत.

मातेची समाधि अरुणाचलपर्वताच्या एका पायथ्याशीं असलेल्या पालीतीर्थाजवळ बांधण्यांत आली आणि त्या समाधीवर एका लिंगाची स्थापना करून त्याला ' मातृभूतेश्वर ' असें नांव देण्यांत आलें. यानंतर येथें नजीकच कांहीं झोंपड्या बांधून भगवान तेथें राहण्यास आले. श्रीरमणाश्रमाचा अशा रीतीनें पाया घालणेंत आला आणि आतां येथें अनेक सुखसोयीसहित बऱ्याच इमारती बांधल्या गेल्या आहेत; व बांधल्या जात आहेत. गेल्या सप्टेंबर महिन्यापासून मातृभूतेश्वरमंदिर व त्यासमोर एक ध्यानमंदिर अशी सुंदर व विस्तृत इमारत बांधण्याचें काम सुरू झालें असून तें लवकरच पुरें होईल आणि त्यानंतर पुष्कळ लोकांनीं ध्यानमंदिरांत बसून ध्यान करण्याची उत्तम सोय होईल. आश्रमाचे बाहेर खुल्या जागेवर आमच्या व युरोपियन लोकांनीं प्रशस्त बंगले बांधून एक नवीन ' रमणवाडी 'च स्थापन केलेली आहे.

या सर्व इमारतींत ध्यानमंदिर ही श्रेष्ठ व उपयुक्त इमारत आहे. कारण भगवान नेहमीं येथेंच ध्यानस्थ सहजसमाधींत बसलेले असतात; व येथेंच सर्व शिष्य व भक्तमंडळी त्यांचें दर्शन घेतात. १८९६ सालीं भगवान जे अरुणाचलीं आले ते तेथून कुठें बाहेर गेलेच नाहींत. १९२२ सालापासून ते रमणाश्रमांतच राहत असून त्यांच्या दर्शनाचा व सहवासाचा योग सर्व लोकांना येथेंच सहज घडून येत आहे.

भक्तमंडळाची वाढ

कमळाची कळी उमलली कीं तेथें भ्रमरांचे थवे येतात, त्यांना आमंत्रण द्यावें लागत नाहीं. त्याप्रमाणें भगवानांच्या दर्शनास येणाऱ्या जवळपासच्या व दूरदूर देशच्या भक्तमंडळीचा समुदाय आपोआप वाढत आहे. वासिष्ठ गणपतिमुनि नांवाचे एक मंत्रशास्त्रवेत्ते विद्वान् पुरुष होते. त्यांच्या विद्वत्तेबद्दल त्यांना 'काव्यकंठ' ही पदवी व प्रशस्तिपत्रेंहि मिळालेलीं होतीं. ते प्रागतिक मताचे असून आपल्या मायदेशाची सर्वांगीण उन्नति

कशी होईल या विवंचनेंत नेहमीं असत आणि त्या दिशेनें त्यांचे प्रयत्नहि चालू असत. त्यांनीं अनेक तीर्थयात्रा केल्या व तेथें तपें व पुरश्चरणें केलीं. शिवाचा पंचाक्षरी कोटिजपहि त्यांनीं केला, पण त्यांना साक्षात्कार कांहीं होईना. तेव्हां ते प्रथम १९०३ सालीं व नंतर १९०७ सालीं तपश्चर्येसाठीं म्हणून अरुणाचलीं आले आणि भगवानांची कीर्ति ऐकून विरूपाक्षगुहेंत जाऊन त्यांनीं त्यांचें दर्शन घेतलें व साष्टांग प्रणिपात करून ‘ तप ’ म्हणजे काय असा प्रश्न केला. भगवानांनीं तामिल भाषेंत उत्तर दिलें कीं, “ अहं म्हणजे मी याची कल्पना कोठून निघते याचें चांगलें निरीक्षण केलें म्हणजे आमचें मन त्या आपल्या मूळ स्थानीं रमतें. हेंच खरें तप. किंवा मंत्राचा उच्चार करितांना तो मंत्र कोठून निघतो याचेकडे नीट लक्ष* लाविलें म्हणजे आपलें मन त्याठिकाणीं लीन होतें. तप तें हेंच. ” हा थोडक्यांत पण स्पष्ट खुलासा ऐकून गणपतिमुनीला आनंद झाला आणि भगवानाच्या पूर्ण नांवाची चौकशी करून लगेच एक ‘ श्रीरमणपंचक ’ स्तोत्र रचून त्यांत त्यांनीं त्यांचा भगवान श्री रमणमहर्षि असा उल्लेख केला. तेव्हांपासून सर्व लोक त्यांना या नांवानें संबोधूं लागले.

मद्रास इलाख्यांतील अनेक विद्वान लोक, वकील, न्यायाधीश हायकोर्टजज्ज इत्यादि भगवानांचे शिष्य किंवा भक्त बनले आहेत. भगवानांनीं कोणाहि मानवी गुरूकडून दीक्षा घेतलेली नाहीं व ते कोणासहि दीक्षा देऊन शिष्य बनवीत नाहींत. श्रीतुकाराम महाराजांनीं सांगितल्या प्रमाणें “ मेघवृष्टीनें करावा उपदेश । परि गुरूनें न करावा शिष्य ॥ ’ ते सर्वांना सारखा उपदेश करित असतात. त्यांच्या दर्शनास जाणारी व त्यांच्या कृपेस पात्र होणारी मंडळी आपणांस त्यांचे शिष्य किंवा भक्त म्हणवितात. त्यांपैकीं कांहीं जणांचीं नांवें येथें देत आहों—

---

* “ रामनाम ध्वनि उमटे । तेथ लक्ष्य लावीं नेटे ॥ ब्रम्हानंद सहज भेटे प्रचुर प्रचुर प्रचुर प्रचुर ॥ जप तूं राम नाम किती । मधुर मधुर मधुर मधुर ॥”

—श्रीकृष्णभटजी बांदकरमहाराज

(१) शिवप्रकाश पिल्ले—हे ग्रॅजुएट असून दक्षिण अर्काटच्या कलेक्टराच्या खात्यांत नोकर होते (१९००–१०)

(२) रामस्वामी अय्यर. P. W. D. सुपरव्हायझर (१९०८)

(३) लक्ष्मीअम्मा किंवा एच्चमा—हिच्यावर अनेक दुःखांचे प्रसंग ओढवले. भगवानांच्या दर्शनानें व कृपेनें त्यांचा शोकभार नाहींसा झाला. (१९०६)

(४) रामनादची शांतम्मा.

(५) राघवाचारी (T. R. S. Supervisor तिरुवन्नामलै)

(६) हंफ्रीस पोलीस सुंपरिटेंडंट (१९११).

(७) नटनानंद स्वामी (नटेश मुदलियार) (१९१७–२६)

(८) रामनाथ अय्यर.

(९) संन्यासिनी सुंदरम्मा (१९२८)

(१०) योगी रामय्या–नेल्लूर तालुक्यांतील अन्नारेडीपालेमचे एक धनिक सुखवस्तु गृहस्थ. यांचा अधिकार फार मोठा आहे. यांनीं बराच मंत्रजप व योगाभ्यासहि केलेला आहे. शेवटीं यांना भगवानांकडूनच शांतीचा लाभ झाला. हे वर्षांतून बरेच महिने रमणाश्रमांत राहतात. यांनीं ध्यानमंदिर बांधण्यास, पालीतीर्थाची व पेय पाण्याच्या विहीरीची दुरुस्ती करण्यास आणि रमणश्रमाच्या इतर कामास पुष्कळ मदत केली आहे. यांचे बऱ्याच वर्षांचें मौनव्रत आतां सुटलें आहे.

(११) नरसिंह स्वामी (अय्यर) सेलमचे एक प्रख्यात वकील. १९२८ ते ३१ पर्यंत ते रमणश्रमांत राहिले. यांनीं भगवानांचें इंग्रजी चरित्र लिहिलें आहे.

(१२) शुद्धानंद भारती—हे शक्त्युपासक व उत्तम तामिल लेखक असून त्यानीं खिस्ती, बौद्ध, मुसलमान, पारशी व जैन धर्मांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. यांनीं भगवानांचें तामिल भाषेंत ‘ रमण-विजय ’ नांवाचें चरित्र लिहिलें आहे.

याशिवाय रामकृष्णस्वामी, कुंजरस्वामी, सुंदरेश अय्यर, शेषु-अय्यर, भारद्वाज विश्वनाथ, के. लक्ष्मणशर्मा इत्यादि अनेक स्वामींचे

भक्त आहेत. त्या सर्वांची माहिती स्थलाभावामुळें येथें देतां येत नाहीं याबद्दल वाईट वाटतें.

युरोपियन शिष्यांमध्यें पहिले हॅरि डिकूमन हे होत. हे सोविएट रशियाच्या पश्चिमेकडील लटविया या प्रजासत्ताक राज्यांतील तुकुम शहराचे रहिवासी. दुसरे फ्रेडरिक फ्लेचर हे इंग्रज असून आक्सफर्ड युनिव्हर्सिटीचे पदवीधर आहेत, त्यांनीं बुद्धधर्माचा स्वीकार करून 'भिक्षु प्रज्ञानानंद' हें नांव धारण केलें आहे. १९३२ सालीं हे रमणाश्रमांत राहिले होते. याच सुमारास 'लंडन फोरम' पत्राचे लेखक राफेल हर्स्ट उर्फ पॉल ब्रंटन हे हिंदुस्थानांत आले आणि सर्व देशभर फिरून शेवटीं रमणाश्रमांत येऊन शांति मिळविते झाले. यांच्या 'भारतांतील अध्यात्मविद्येचा शोध' या ग्रंथांनीं भगवानांची कीर्ति दिगंतरीं पसरली व आतां लांबलांबच्या अनेक ठिकाणाहून लोक भगवानाच्या दर्शनास वरचेवर येत आहेत.

स्थलाभावामुळें तेथील अनेक गोष्टींचें म्हणजे भगवानाचे प्रीतींतील चतुष्पद प्राणी,–त्यांचे साथीदार म्हणजे श्वानवर्ग, वानरवर्ग व गोवर्ग यांची हकीकत, आश्रमांत झालेली चोरी व त्यावेळचें भगवानाचें अहिंसा व्रतपालन, मत्सरी व भोंदू साधूंनीं दिलेला उपसर्ग आणि भगवानाचें त्यांच्याशीं सरळ वर्तन, त्यांचे बालोन्मत्त पिशाचवृत्तीचे मित्र श्री. शेषाद्रि स्वामी इत्यादि अनेक महत्वाच्या गोष्टीविषयीं येथें कांहीं सांगतां येत नाहीं याबद्दल वाईट वाटतें. झाली तेवढीच सेवा वाचकांनीं गोड करून घ्यावी अशी त्यांना नम्र विनंति आहे. त्यांची तशी तीव्र इच्छा असल्यास आणि भगवानांची कृपा झाल्यास त्यांचें विस्तृत चरित्रहि लिहिण्यांत येईल.

श्रीरमणचरणारविंदार्पणमस्तु.

ॐ

श्रीरमणप्रस्थानत्रयी

भाग १ ला

[‘सत्’– स्वरूपाचें दर्शन करून देणारीं रमणसूत्रें]

-सद्दर्शन-

SRI RAMANASRAMAM

सत्तत्त्वसारं सरलं दधाना, मुमुक्षुलोकाय मुदं ददाना ।
अमानुषश्रीरमणीयवाणी–मयूखभित्तिर्मुनिवाग्विभाति ॥

—सद्दर्शन ४४

सद्दर्शन–प्रस्तावना

या ग्रंथाचें नांव '**सद्दर्शन**' असें आहे. सद्दर्शन हा शब्द सत् व दर्शन हे दोन शब्द मिळून झाला आहे. 'सत्' याचा अर्थ अस्तित्व, त्रिकालीं असणारें सत्य तत्त्व म्हणजे सद्वस्तु किंवा आत्मा. 'दर्शन' म्हणजे पाहणें किंवा साक्षात्कार. सद्दर्शन म्हणजे आत्मदर्शन किंवा आत्मसाक्षात्कार. भगवान श्रीरमणमहर्षींना जो कांहीं साक्षात्कार किंवा अनुभव आला, तो त्यांनीं शुक्ल (तामील वेंबा) छंदाच्या चाळीस श्लोकांत (मंगलाचरणाचे दोन श्लोक धरून बेचाळीस श्लोकांत) '**उल्लातु नार्पतु**' या नांवानें प्रसिद्ध केला. त्यांचे शिष्य काव्यकंठ वासिष्ठ गणपतिमुनि यांनीं याचा अनुवाद उपजाति छंदांत गीर्वाण भाषेंत केला आहे; आणि या गीर्वाण अनुवादावरून आम्हीं महाराष्ट्र भाषेंत सर्वांना हा विषय सहज समजावा म्हणून गद्यांत केलेला आहे.

हें सद्दर्शन न्याय–वैशेषिक इत्यादि षड्दर्शनाप्रमाणें तत्त्वाचें पर्यालोचन करणारें नाहीं; किंवा शैव–वैष्णव, द्वैताद्वैत इत्यादिकांच्या सिद्धांतांचें खंडन–मंडन करणारें नाहीं.

अगर श्रुति, ब्राह्मण, वेदान्त यांतील तत्त्वें प्रतिपादन करणाऱ्या धर्म–ब्रह्म–मीमांसेप्रमाणें आप्तवाक्यांचा अर्थ सांगणारें नाहीं. तर संत शठकोप (**नम्माळवार**) **माणिक्यवाचक**, ज्ञानसंबंध इत्यादि तामील संतांच्या वेदवाक्यां (ईशस्तोत्रां) प्रमाणें किंवा फार प्राचीनकालीन ऋषींच्या मुखांतून निघालेल्या उपनिषद्वाक्यांप्रमाणें ही ' **सद्दर्शन–चाळिसी** ' वेदवेदान्तांतील तत्त्वसारबोधक अशी भगवान् श्रीरमणमहर्षींची स्वानुभवप्रदर्शक स्वतंत्र रचना आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे श्रीरमणमहर्षींना जो कांहीं सत्चा–सत्याचा किंवा सद्वस्तूचा अनुभव आला, तो त्यांनीं लोकोपकारासाठीं तामील वेंबा छंदांत ग्रथित केला. तेव्हां हें त्यांचें सद्दर्शनच होय; किंवा याला ' श्रीरमणदर्शन ' असेंहि अन्वर्थक नांव देतां येईल.

सहाव्या शतकांत **द्रविड** देशामधील शैव सांप्रदायांतील धर्माचार्य श्रीज्ञानसंबंध यांनीं सोळाव्या वर्षीं आपली धार्मिक कामगिरी (नास्तिक लोकांपासून धर्माचें संरक्षण) करून शिवस्तोत्रें रचून इहलोकची कामगिरी संपवून पित्यापाशीं गमन केलें. जगद्गुरु श्रीशंकराचार्य यांनीं वयाच्या १६व्या वर्षीं आपलें अद्वितीय शारीरभाष्य रचून आपल्या कारणगुरूचें कार्य करून जगद्गुरुपद प्राप्त करून घेतलें. त्याप्रमाणेंच महाराष्ट्रांत श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं वयाच्या १६–

१७ व्या वर्षीं ज्ञानेश्वरी व अमृतानुभव यांसारखे अमूल्य व अद्भुत ग्रंथ रचून आपलें अवतारकृत्य संपविलें. या त्रैमूर्ती-प्रमाणेंच श्रीरमणमहर्षींनीं सोळावें वर्ष संपतांच मृत्यूच्या भीतीनें मृत्युंजयाला शरण जाऊन त्याचे चरण धरिले आणि त्याच्या प्रसादानें आपला आत्मा हा आपल्या देहाहून निराळा असून तो आपल्या हृदयांत प्रगट आहे असा अनु-भव मिळविला आणि जगत्पिता हा आपला खरा पिता आहे असें समजून त्याच्याच प्रेरणेनें आपलें अहंकाराचें ठाणें सोडून अचल असें परमात्मपद प्राप्त करून घेतलें. याच आत्म-परमात्मपदाला त्यांनीं ‘अरुणाचल’ असें संबोधिलेलें असून त्याविषयीं अनेक स्तोत्रें रचिलेलीं आहेत.

जगद्गुरु श्रीशंकराचार्यांप्रमाणें मुमुक्षूंना अध्यात्म देणारा, श्रीज्ञानसंबंधमूर्तींप्रमाणें परमात्म्याचे ठिकाणीं पितृभक्ति अर्पण करणारा, आपली आभ्यंतर जीवनप्रभा सहज बाह्य जगांत चोहों बाजूंनीं पसरविणारा, आपल्यापाशीं आलेल्या बुद्धिमान लोकांना बोध करण्यासाठीं आपल्या उच्च स्थितीं-तून खालीं येऊन त्यांच्या अधिकारानुसार त्यांचेवर अनुग्रह करणारा, जगदंबा मायेचा सुत पण मायामुक्त, अपरिग्रही व ब्रह्मचारी अशा भगवान श्रीरमणमहर्षींचें येथील दिव्य जीवन-चरित्र “ इह चेदवेदीथ सत्यमस्ति, न चेदिहावेदीन्महती विनष्टि ” (येथेंच तुम्ही ज्ञान प्राप्त करून घेतलेंत तर

तुम्हांला सत्य–सद्वस्तु मिळेल, नाहीं तर फार मोठी हानि होईल) या श्रुतिमंत्राचें परम रहस्य प्रकाशणारें आहे.

अशा दिव्य विभूतीच्या अंतःकरणांतून–हृदयांतून प्रगट झालेलें हें **सद्दर्शन** सर्वांना सद्दर्शनसुख–सच्चित्सुख म्हणजे सच्चिदानंद देवो !

वासुदेवाश्रम–विजयनगर,
ठळकवाडी–बेळगांव,
श्रावण १५ शके १८६१.

सद्दर्शनलुब्ध
संतसेवक
नागेश वासुदेव गुणाजी.

श्री

सद्दर्शन

मंगलाचरण (श्लोक १–२)—

सत्प्रत्ययाः किं नु विहाय सन्तम्?
हृद्येष चिन्तारहितो हृदाख्यः।
कथं स्मरामस्तममेयमेकम् ?
तस्य स्मृतिस्तत्र हृदैव निष्ठा ॥ १ ॥

अर्थ—सत्‌ला म्हणजे सद्वस्तूला सोडून (हें आहे तें आहे असें) अस्तित्वाचे प्रत्यय तरी कसे येणार ? ही सद्वस्तु तरी कोणती ? तर चिन्तारहित म्हणजे अंतःकरणवृत्तिरहित असणारी—हृदयांत स्फुरणारी जी ‘ अस्मिता ’ (शुद्ध अहंवृत्ति) हीच ती सद्वस्तु होय. या हृदयांतील सद्वस्तूला ‘ हृत् ’ असें म्हणतात. ही सद्वस्तुच आत्मा होय. अर्थात् ‘ हृत् ’ म्हणजे आत्मा असें समजावें. पण मनापेक्षां सूक्ष्मतर असल्यामुळें तर्क करण्यास अशक्य अशा त्या सद्वस्तूचें

स्मरण आम्हीं कसें करावें ? त्या वस्तूच्या ठिकाणीं दृढ निष्ठा (निरंतर स्थिति) ठेवणें हेंच तिचें स्मरण होय असें समजावें.

यात्रमाणें स्वानुभवसिद्ध सहजात्मनिष्ठा ज्ञानमार्गानें सांगून, पुढें भक्तिमार्गाची पूर्ण प्रपत्ति म्हणजे शरणागति सांगतात.

मृत्युंजयं मृत्युभियाश्रिताना—
महंमतिर्मृत्युमुपैति पूर्वम् ।
अथ स्वभावादमृतेषु तेषु
कथं पुनर्मृत्युधियोऽवकाशः ॥ २ ॥

अर्थ—मृत्यूच्या भयानें मृत्युंजयाला(परमात्म्याला) शरण जाणाऱ्यांची *अहंमति पूर्वीच नाश पावलेली असते. नंतर ते स्वभावानें अमृत झाल्यावर त्यांचे ठिकाणीं मृत्यूच्या कल्पनेला अवसर कसा असणार ?

याप्रमाणें ब्रह्मात्मैक्यसाक्षात्काररूप ‘ निष्ठा ’ व ‘ प्रपत्ति ’

---

* हा देह मी, हें शरीर माझें व इतर सर्व भूतांहून मी निराळा अशी जी बुद्धि ती अहंमति किंवा अहंभाव होय. आत्मस्वरूपानें हृदयांत स्फुरणाऱ्या सर्वेश्वराला सर्वभावानें शरण जाणाऱ्या पुण्य-पुरुषाची देहात्माभिमान—ग्रंथि-रूपिणी अहंमति नष्ट होऊन जाते. असें झाल्यावर त्यांच्या ठिकाणीं मृत्यु-चिंतेला अवकाश कोठून असणार ?

म्हणजे शरणागति यांचें समान फल आहे; जिज्ञासु व भक्त यांच्या सत्त्वपरिपाकानुसार होणारी निष्ठा व प्रपत्ति यांच्या-संबंधानें दृष्टिभेद असला तरी निष्ठावानाचीच प्रपत्ति पूर्ण होत असते व प्रपन्नाचीच निष्ठा सिद्ध होते असें समजावें. याप्रमाणें भगवान रमणमहर्षि हे यथार्थ भक्ति व ज्ञान यां-मध्यें अविरोधच मानतात.

अशा या परमपुरुषार्थसाधनभूत मार्गद्वयाचें प्रतिपादन करणाऱ्या वरील दोन श्लोकांत निष्कल—सकलात्मक (प्रत्य गात्मा व परमात्मरूप) परब्रह्माचें संस्मरण करून शिष्टा-चारानुसार ग्रंथकारानें मंगलाचरण केलें असें समजावें. पहिल्या श्लोकांत 'निष्कल' ब्रह्माचें (प्रत्यगात्म्याचें) निष्ठा-श्रयत्वानें प्रतिपादन केलें असून, दुसऱ्या श्लोकांत 'सकल' ब्रह्माचें (परमात्म्याचें) शरण्यत्वानें स्तवन केलें आहे.

अशा रीतीनें शरण्यत्वानें परमात्मा अनुग्रह करितो असें सिद्ध झाल्यानंतर जगत्, जीव व ईश्वर अशीं तीन तत्त्वें ग्रहण केल्यामुळें द्वैतापत्ति येईल अशी कोणी शंका करूं नये म्हणून सांगतात—

सर्वैर्निदानं जगतोऽहमश्च
वाच्यः प्रभुः कश्चिदपारशक्तिः ।
चित्रेऽत्र लोक्यं विलोकिता च
पटः प्रकाशोऽप्यभवत्स एकः ॥ ३ ॥

अर्थ—अपार शक्तिमान् असा अनिर्वचनीय प्रभु जगाचें व जीवाचें कारण आहे असें सर्व शास्त्रदर्शनवेत्ते कबूल करितात. या (नामरूपात्मक) सृष्टिरूप चित्राचे ठिकाणीं दृश्य–द्रष्टा, पट व प्रकाश हीं सर्व तो परमात्माच झालेला आहे.

जर एकमेवाद्वितीय अशी सद्वस्तु सर्व शक्तिमत्वामुळें जगत्, जीव व ईश्वररूप होतें तर मग या तिघांचें वस्तुतः असणारें एकत्व प्रत्ययाला कां येत नाहीं, असें म्हणाल तर सांगतात—

आरभ्यते जीवजगत्परात्म —
तत्त्वाभिधानेन मतं समस्तम् ।
इदं त्रयं यावदहंमति स्यात्
सर्वोत्तमाऽहंमतिशून्यनिष्ठा ॥ ४ ॥

अर्थ—जीव, जगत् व परमात्मा या तीन तत्त्वांचा उल्लेख करून सर्व द्वैतादि सिद्धांताचा आरंभ होतो हें खरें, परंतु जोंपर्यंत अहंमति असते तोंपर्यंतच हीं तीन तत्त्वें असतात. आणि ही अहंमति नाहींशी झाल्यानें जी निष्ठा प्राप्त होते तीच सर्वोत्तम स्थिति होय.

अहंमति नाहींशी झाल्यावर जगत्, जीव व ईश्वर यांचें भिन्नत्व उरत नसल्यामुळें हें सर्व जगत् सत्य आहे कीं

असत्य आहे इत्यादि शंका निवारण करण्यासाठीं जो कांहीं शास्त्रार्थ किंवा वाद केला जातो त्याचा तत्त्वसाक्षात्कारार्थ प्रत्यक्ष असा कांहींच उपयोग नाहीं याबद्दल सांगतात—

सत्यं मृषा वा चिदिदं जडं वा
दुःखं सुखं वेति मुधा विवादः।
अदृष्टलोका निरहंप्रतीति—
र्निष्ठाऽविकल्पा परमाऽखिलेष्टा ॥ ५ ॥

अर्थ—हें जगत् सत्य आहे कीं मिथ्या, चित् आहे कीं जड, सुखकारक कीं दुःखकारक, यांविषयींचा वादविवाद व्यर्थ आहे. ज्या निष्ठेमध्यें जगताचें भान नाहीं, जींत अहंप्रतीति व संशय नाहीं अशी परम उच्च निष्ठाच सर्वांना इष्ट आहे.

जगत्—जीव—ईश्वराचें अखंडैकरस आत्म्यामध्यें ऐक्य असल्यामुळें द्रष्टा व दृश्य यांच्या भेदाला तेथें अवकाश नाहीं म्हणून आत्म्याचें अनंत दृष्टिस्वरूपत्व प्रतिपादन करितात—

सरूपबुद्धिर्जगतीश्वरे च
सरूपधीरात्मनि यावदस्ति।
अरूप आत्मा यदि कः प्रपश्येत्
सा दृष्टिरेकाऽनवधिर्हि पूर्णा ॥ ६ ॥

अर्थ—जोंपर्यंत आत्मा सरूप (साकार) आहे अशी आपली बुद्धि असते तोंपर्यंत् जगत् व ईश्वर हे सरूप (नामरूपात्मक) आहेत असें आपणास वाटतें. आत्मा अरूप आहे अशी आपली बुद्धि (जाणीव) झाली कीं, कोण कोणाला पहाणार? कारण हें ज्ञान (अखंडात्मस्वरूप) अद्वितीय, अनंत व पूर्ण असें आहे.

द्रष्टा जो आत्मा तो सशरीर असल्यामुळें देहात्मबुद्धीनेंच जगताचें ज्ञान होतें असें सांगतातः—

यत्पंचकोशात्मकमस्ति देहं
तदन्तरा किं भुवनं चकास्ति ।
देहं विना पंचविधं तदेतत्
पश्यंति के वा भुवनं भणन्तु ॥ ७ ॥

अर्थ—पंचकोशात्मक असा जो देह त्यावांचून जगताचें भान होऊं शकतें काय? नाहीं. या पंचकोशात्मक देहाशिवाय जग कोणाला दिसतें तें सांगा पाहूं?

मनुष्यामधील द्रष्टा हा मनोमय असल्यामुळें दृश्य जगत्सुद्धां मनोरूपच असतें. याप्रमाणें द्रष्टा व दृश्य—वृत्ति व विषय—यांचें तादात्म्य दर्शविण्याकरितां जगताचें मनोमयत्व प्रतिपादन करितातः—

शब्दादिरूपं भुवनं समस्तं
शब्दादि सत्तेन्द्रियवृत्तिभास्या
सत्तेंद्रियाणां मनसोवशे स्यात्
मनोमयं तद्‌भुवनं वदामः ॥ ८ ॥

अर्थ—हें सर्व जगत् शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध विषयात्मक आहे. या पंचविषयांची सत्ता इंद्रिय-वृत्तिभास्य आहे. इंद्रियांची सत्ता मनावर अवलंबून आहे. म्हणून हें जगत् मनोमय आहे असें आम्ही म्हणतों.

जग आणि मनोवृत्ति एकमेकांपासून निराळीं नसतात. तथापि जगाला प्रकाशित करितें तें मनच होय असें सांगतातः—

धिया सहोदेति धियाऽस्तमेति
लोकस्ततो धीप्रविभास्य एषः ।
धीलोकजन्मक्षयधाम पूर्ण
सद्वस्तु जन्मक्षयशून्यमेकम् ॥ ९ ॥

अर्थ—जग हें मनाबरोबर [मूल अहंवृत्तीबरोबर] उदय पावतें. आणि त्याच्याबरोबरच अस्ताला जातें. अर्थात् जग हें मनोवृत्तिभास्यच आहे. पण मन व जग हीं उभयतां ज्या ठिकाणीं जन्म व नाश पाव-

तात तें स्थान म्हणजे सद्वस्तु ही ‘जन्ममृत्युविरहित’ ‘एकमेवाद्वितीयम्’ पूर्ण अशी आहे.

उपरोक्त लक्षणांच्या सद्वस्तूच्या ठिकाणीं तादात्म्यनिष्ठा हेंच ‘सद्दर्शन’ होय असें सांगतातः—

भवन्तु सद्दर्शनसाधनानि
परस्य नामाकृतिभिः सपर्याः ।
सद्वस्तुनि प्राप्ततदात्मभावा
निष्ठैव सद्दर्शनमित्यवेहि ॥ १० ॥

अर्थ—परमात्म्याचें नामरूपादिकानें अर्चन * करणें हें सद्दर्शनाचें साधन आहे हें खरें ; पण त्या सर्व उपास्यमूर्तींना आश्रयभूत असलेलें जें सद्भावाख्य ब्रह्म त्याच्याशीं तादात्म्य करून घेऊन तेथेंच निष्ठा (निरंतर स्थिति) ठेवणें हेंच खरें सद्दर्शन होय असें समजावें.

यानंतर भगवान जिज्ञासूंना **मार्गण** व **मज्जन** अशीं दोन साधनें सुचवितात. त्यांपैकीं खालील श्लोकांत विचारशील जिज्ञासूंना **मार्गण** म्हणजे अन्वेषण अथवा शोध या साधनाचा उपदेश करितातः—

* एष मे सर्वधर्माणां धर्मोऽधिकतमो मतः ।
यद्भक्त्या पुंडरीकाक्षं स्तवैरर्चेन्नरः सदा ॥ ८ ॥
—विष्णुसहस्रनाम (म. भा.)

द्वन्द्वानि सर्वाण्यखिलास्त्रिपुट्यः
किंचित्समाश्रित्य विभान्ति वस्तु ।
तन्मार्गणे स्याद्गलितं समस्तं
न पश्यतां सच्चलनं कदापि ॥ ११ ॥

अर्थ—(सुखदुःखादि) सर्व द्वंद्वें आणि (द्रष्टा-दृश्य-दर्शन इत्यादि) सर्व त्रिपुट्या ह्या एका अवर्णनीय आश्रयभूत वस्तूचा आश्रय करूनच प्रकाशमान होतात. तशा त्या वस्तूच्या शोधानेंच तीं द्वंद्वें व त्या त्रिपुट्या गळून पडतात. अशा त्या सद्वस्तूला साक्षात् करून घेणारे पुरुष केव्हांहि चलन पावत नाहींत. [ते अचल निष्ठावान होतात.]

यानंतर १२ ते २१ श्लोकांपर्यंत खऱ्या जिज्ञासूला अत्यंत उपयुक्त असे तत्त्वानुसंधानाचे अनेक प्रकार सांगतातः—

विद्या कथं भाति न चेदविद्या
विद्यां विना किं प्रविभात्यविद्या ।
द्वयं च कस्येति विचार्य मूल-
स्वरूपनिष्ठा परमार्थविद्या ॥ १२ ॥

अर्थ—अविद्या नसेल तर विद्या कशी संभवणार आणि विद्येवांचून अविद्या तरी कशी दिसणार ? पण विद्या व अविद्या हीं कोणाला असतात, अर्थात् विद्यावान कोण व अविद्यावान कोण याचा सूक्ष्म दृष्टीनें

शोध करून विद्या व अविद्या यांना आश्रयभूत असलेल्या मूळस्वरूपाचे ठिकाणीं निष्ठा ठेवणें हीच परमार्थविद्या होय. [अनुभवात्मक ज्ञान हीच परमार्थविद्या असून लौकिकी विद्या हें मानसज्ञान असें समजावें.]

याप्रमाणें विद्या—अविद्यात्मक मूलान्वेषणाचा [मूलात्मस्वरूप शोधण्याचा] उपदेश केला. आतां त्यापेक्षांहि सूक्ष्म अशा ज्ञाता—ज्ञेय—ज्ञानरूप त्रिपुटीच्या मूलाश्रयज्ञानानें ज्ञात्याचा सत्—स्वरूपाशीं तादात्म्यानुभव सांगतातः—

बोद्धारमात्मानमजानतो यो
बोधः स किं स्यात्परमार्थबोधः ।
बोधस्य बोध्यस्य च संश्रयं स्वं
विजानतस्तद् द्वितयं विनश्येत् ॥१३॥

अर्थ—सर्वांला जाणणारा जो आत्मा त्याला न जाणणाऱ्याचें [दृश्यविषयक] ज्ञान हें परमार्थज्ञान [सत्यज्ञान] होईल काय? नाहीं. तर ज्ञान व ज्ञेय या दोहोंला आश्रयभूत असणारा ज्ञाता जो आत्मा [आपण] त्यास पूर्णपणें जाणलें असतां ज्ञान व ज्ञेय हीं नाहींशीं होतात. [सत्—स्वरूपसाक्षात्कार झाला असतां ज्ञान व ज्ञेय म्हणजे वृत्ति व विषय यांचासुद्धां स्वस्वरूपाशीं अभेदच आहे असा अनुभव येतो.]

ज्ञात्यासंबंधीचें ज्ञान हें मूलस्वरूपप्रापक आहे असें सांगितलें. आतां तें ज्ञान म्हणजे व्यावहारिक ज्ञान व अज्ञान यांहून विलक्षण, केवळ चिद्रूप आहे असें दृढते-करितां पुनः सांगतातः—

निद्रा न विद्या ग्रहणं न विद्या
गृह्णाति किंचिन्न यथार्थबोधे।
निद्रापदार्थग्रहणेतरा स्या-
च्चिदेव विद्या विलसन्त्यशून्या ॥१४॥

अर्थ—निद्रा म्हणजे शून्यावस्था हें तर ज्ञान नव्हेच, पण इतर मोठमोठ्या गहन विषयांचें ज्ञान हेंहि ज्ञान नव्हे. खऱ्या ज्ञानांत इतर विषयांचा गंधहि नसतो. वर सांगितलेल्या दोहोंहून भिन्न असलेलें—विषयज्ञानाला व निद्रेंतील विषयज्ञानाच्या अभावाला—प्रकाशित करणारें जें ज्ञान [शुद्ध आश्रयभूत चैतन्य] तीच सद्विद्या म्हणजे खरें ज्ञान (यथार्थबोध) होय. हें ज्ञान द्वंद्वाला ग्रासून टाकणारें असल्यामुळें शून्य म्हणतां येत नाहीं. तर तें स्वप्रकाश असून ज्ञाना-ज्ञानात्मक द्वंद्वाला प्रकाशणारें आहे.

आतां वर सांगितलेलें सत्यज्ञान हें एकच आहे; त्याच्या नानात्वाला निराळी सत्ता (अस्तित्व) नाहीं हें सुवर्ण-अलंकाराच्या दृष्टान्तानें सांगतातः—

सत्यश्चिदात्मा विविधाकृतिश्चित्
सिद्ध्येत्पृथक्सत्यचितो न भिन्ना।
भूषाविकाराः किमु सन्ति सत्यं
विना सुवर्णं पृथगत्र लोके ॥ १९ ॥

अर्थ—चिदात्मा हा सत्य व एक आहे. जगद्रूप विविध आकृति ह्या त्याच्याच आहेत. एकमेव सच्चिद्रूप आत्म्यापासून त्या भिन्न असूं शकत नाहींत. कारण ह्या लोकांत सुवर्णाचे अलंकाररूप विकार हे सुवर्णाहून कधीं भिन्न असतात काय? म्ह. सुवर्णाशिवाय सत्य असतात काय? [एका सद्वस्तूचींच हीं नानारूपें आहेत असें पूर्वी सांगितलें. येथें त्या सद्वस्तूचें चिद्रूपत्व (सत् तेंच चित् असें) प्रतिपादून चित्स्वरूप अशा अखंडात्मरूपाचेच हे रूपभेद—जीव व जगत्—या रूपानें आहेत असें सांगितलें म्हणून समजावें.]

सारासारविचारक्षम बुद्धीनें 'अहं' वृत्तीचें मूळ शोधून काढलें पाहिजे व असें करणें हें 'मार्गणा' ला साहाय्यकारी होतें असें सांगतातः—

तद् युष्मदोरस्मदि संप्रतिष्ठा
तस्मिन्विनष्टेऽस्मदि मूलबोधात्।
तद् युष्मदस्मन्मतिवर्जितैका
स्थितिर्ज्वलन्ती सहजाऽत्मनः स्यात्

अर्थ— तो व तूं ह्या (परोक्ष–प्रत्यक्षाच्या) कल्पना 'अहं'च्या कल्पनेवर (अहंवृत्तीवर) अधिष्ठित म्ह० अवलंबून आहेत. त्या 'अहं'च्या मूलाधिष्ठानाचा बोध झाला कीं, 'अहं'ची वृत्ति नाश पावते. असें झालें म्हणजे मग तो–तूं–मी या कल्पनेनें रहित अशी लख्ख सहजात्मस्थिति प्रकट होते.

आत्मा (पुरुष) हा देशकालातीत असून सुद्धां देश-कालांत व्यापून आहे. म्हणून दिक् व काल यांचें खरें स्वरूप अथवा तत्त्व काय आहे याचा विचार करण्यानें अंतिम सत्याचा (सद्वस्तूचा) साक्षात्कार करून घेतां येतो असें (पुढील दोन श्लोकांत) प्रतिपादन करितात—

भूतं भविष्यच्च भवत्स्वकाले
तद्वर्तमानस्य विहाय तत्त्वम् ।
हास्या न किं स्याद्गतभाविचर्चा
विनैकसंख्यां गणनेव लोके ॥ १७ ॥

अर्थ—भूतकाळ हा एके काळीं वर्तमानकाळच होता. आणि भविष्यकाळहि पुढें वर्तमानकाळच होणार आहे. (यावरून सूक्ष्म विचार केला असतां भूत व भविष्य या उभयकाळाचें वर्तमानकालत्वच सिद्ध होतें) तेव्हां नित्य वर्तमानकालाच्या तत्त्वाला

सोडून भूतभविष्यकालाची चर्चा करणें हें, 'एक' या मुख्य संख्येशिवाय इतर संख्या मोजण्यासारखें हास्यास्पद नाहीं काय? [मागची वृत्ति लय पावल्यानंतर पुढची वृत्ति उठण्यापूर्वींची जी मध्यसंधि तीवर बारीक नजर ठेवून लक्षीत रहाण्यानें कारंज्याप्रमाणें अंतःकरणांत अविरत उठणाऱ्या वृत्तींच्या प्रवाहाला अधिष्ठानभूत असलेल्या निजतत्त्वाचा–प्रज्ञानघन ब्रह्माचा-साक्षात्कार करून घेतां येतो अशीहि या श्लोकांत कालतत्त्वानुसंधानद्वारें 'स्वरूपनिष्ठा' दाखविली.] *

आतां देशानुसंधानानें स्वरूपनिष्ठा दाखवितातः—

क्व भाति दिक्कालकथा विनास्मान्
दिक्काललीलेह वपुर्वयं चेत्।
न क्वापि भामो न कदापि भामो
वयं तु सर्वत्र सदा च भामः ॥१८॥

---

* " नष्टे पूर्वविकल्पे तु यावदन्यस्य नोदयः ।
निर्विकल्पकचैतन्यं स्पष्टं तावद्विभासते ॥ "
—(श्रीशंकराचार्यकृत लघुवाक्यवृत्ति.)

यावरील श्रीहंसराजाची टीका येणेप्रमाणें:—

पूर्व संकल्प निमाला असतां । जों काळ दुजा उदयासी न येतां ।
निर्विकल्पचैतन्य तत्त्वता । तों काळ स्पष्ट कळे ॥ २९४० ॥
येक संकल्प उठोनि मावळे । दुजा जोंवरी न उफाळे ॥
तो संधी सामान्यत्वें कळे । पाहतां साधकां ॥ २९४४ ॥

अर्थ—आम्हांला (आत्म्याला) सोडून देश व काल असा व्यवहार कुठें भासणार? आम्हीं शरीर असूं तरच देशकालाच्या लीलेंत (व्यवहारांत) सांपडूं. पण आम्हीं शरीर नसल्यानें देशरूप नव्हत व काल-रूपहि नव्हत. दोन्हीहि नसल्यानें सर्वत्र व सदा आहोंच आहों. [जेव्हां चैतन्य हें आपल्या अपार शक्तिमत्त्वानें मनोमय (सूक्ष्म) व स्थूल आकार धारण करितें, तेव्हां तें दिक्कालावच्छिन्न आहे असें भासतें. जरी देश व काल हे चिच्छक्तीचे विकार किंवा आकार-विशेष असले, तरी देश व काल हे चित्स्वरूपाहून भिन्न आहेत असें मानतां कामा नये. कारण चिद्रूप ब्रह्म व त्याची शक्ति ही दीप व त्याची प्रभा याप्रमाणें अभेदरूप आहेत. देशकालरूपानें व्यक्त होणाऱ्या मानसतत्त्वाचें आश्रयभूत मूलस्वरूप—हेंच आमचें सत्यस्वरूप-निजरूप आहे. अर्थात् देशकालावच्छिन्नते मध्यें आत्मा मनोमय होतो व अनवच्छिन्नतेमध्यें तो मनोतीत-मूलस्वरूप होऊन राहतो. याप्रमाणें आत्म्याचें शुद्धचैतन्यरूपानें व तद्विलासरूपानें म्ह० 'निष्कल' व 'सकल'ब्रह्मरूपानें येथें वर्णन केलें आहे असें समजावें.]

आतां ज्ञानी व अज्ञानी यांच्या अनुभवांतील भिन्नता सांगतातः—

देहात्मभावे ज्ञजडौ समाना-
वेकस्य देहे हृदि दीप्त आत्मा ।
आक्रम्य देहं च जगच्च पूर्णः
परस्य मेयं तनुमात्र आत्मा ॥ १९ ॥

अर्थ—ज्ञानी आणि अज्ञानी या दोघांनाहि देहात्मभाव सारखाच असतो. तथापि त्यांच्यांत भेद हा आहे कीं, ज्ञान्याच्या देहांतील मूलस्थानरूप हृदयांत आत्मा हा स्वात्मरूपानें देदीप्यमान होत्साता स्फुरण पावून देहाला व जगताला व्यापून पूर्ण म्हणजे सर्वात्मक* होतो, पण अज्ञान्याचा आत्मा त्याच्या देहापुरताच असतो.

याप्रमाणें व्यष्टिशरीरदृष्टीनें अज्ञानी व ज्ञानी यांच्या देहात्मभावाची समानता व विशेषता दर्शविली, आतां समष्टि शरीराच्या म्ह० विश्वाच्या दृष्टीनें उभयतांचें साम्य व भेद दाखवितातः--

---

* यथैव मृण्मयः कुंभस्तद्वद्देहोऽपि चिन्मयः ।
आत्मानात्मविभागोऽयं मुधैव क्रियते बुधैः ॥ ६९ ॥
—श्रीशंकराचार्यकृत अपरोक्षानुभूति.

मृण्मय जैसा कुंभ, तसा हा देहहि चिन्मय जाण;
देहात्म्यांचा भेद वृथा हा मूढ करिति निर्माण ॥ ६९ ॥

अज्ञस्य विज्ञस्य च विश्वमस्ति
पूर्वस्य दृश्यं जगदेव सत्यम् ।
परस्य दृश्याश्रयभूतमेकं
सत्यं प्रपूर्णं प्रविभात्यरूपम् ॥ २० ॥

अर्थ—अज्ञानी व सज्ञानी या दोघांनाहि विश्वाचें अस्तित्व भासतेंच. परंतु अज्ञानी म्हणजे विश्वाचें मूलाधिष्ठान न जाणणारा, याला दृश्य म्हणजे डोळ्यानें दिसणारें नामरूपात्मक जगतच सत्य म्हणजे परमार्थ-तत्त्व भासतें. याचें उलट ज्ञान्याला दृश्य जगतास आधारभूत असलेलें एकमेव अद्वितीय, पूर्ण व रूपवर्जित असें सत्तत्त्वच प्रकट दिसतें.

———

आतां दैव किंवा प्रारब्ध व प्रयत्न यांविषयीं वाद घालीत बसणें व्यर्थ असून दोन्ही वादांचें मूळ जाणणाऱ्या ज्ञानी पुरुषांना दैव किंवा प्रयत्न यांचेपासून बाधा होत नाहीं असें सांगतातः—

विधेः प्रयत्नस्य च कोऽपि वाद—
स्तयोर्द्वयोर्मूलमजानतां स्यात् ।
विधेः प्रयत्नस्य च मूलवस्तु
संजानतां नैवविधिर्न यत्नः ॥ २१ ॥

अर्थ—पूर्व जन्मांतरीय कर्मविपाकरूप ‘प्रारब्ध’ (विधि) व आतां केला जाणारा ‘प्रयत्न’ यांविषयीं

त्यांचें मूळ न जाणणारे अज्ञानी लोकच वाद घालीत बसतात. पण प्रारब्ध व प्रयत्न यांचें मूलकारणभूत स्वरूप स्पष्टतया जाणणारे ज्ञानी पुरुष यांना प्रारब्धहि नाहीं व प्रयत्नहि नाहीं. अर्थात् प्रारब्ध व प्रयत्न हे त्यांना बाधक होऊं शकत नाहींत. *

आतां 'आत्मज्ञान' म्हणजे आत्मनिष्ठा (स्वरूपस्थिति) होय असें सांगतातः—

यदीशितुर्वीक्षणमीक्षितारं
अवीक्ष्य तन्मानसिकेक्षणं स्यात् ।
न द्रष्टुरन्यः परमो हि तस्य
वीक्षा स्वमूले प्रविलीय निष्ठा ॥२२॥

अर्थ—द्रष्टा म्ह. पाहणारा (जो आपण) त्याला म्हणजे आपणा स्वतःला पाहिल्याशिवाय, जें ईश्वराला पाहणें, तें 'निजदर्शन' नसून मानसिक दर्शन (भावनामय मूर्तीचें दर्शन) होय. कारण तो परमेश्वर द्रष्ट्याहून

* [टीप—यावरून असें जाणावयाचें कीं, प्रारब्ध व प्रयत्न हे दोन्ही परतंत्रच आहेत. प्रारब्ध हें प्राचीन प्रयत्नावर अवलंबून असणारें, प्रयत्न हा इच्छेवर अवलंबून असणारा, इच्छा ही आपणाला स्वतंत्र मानणाऱ्या जीवाच्या अहंकाराधीन असणारी, जीव हा त्याच्या आश्रयभूत असणाऱ्या ईश्वराधीन; तात्पर्य प्रारब्ध व प्रयत्न हे दोघेहि स्वतंत्र असणाऱ्या ईश्वराचे आधीन आहेत व तोच एक सर्व कर्मांचा प्रेरक व फलदायक असल्यानें त्याचाच आत्म्यांत शोध करणें इष्ट आहे.]

निराळा नाहीं. म्हणून मनोमय द्रष्टयाचा मूलाधार जो आत्मा त्याच्या ठिकाणीं विलीन होऊन राहणें (अहं नाहींसा करणें) एतद्रूप जी निष्ठा ह्मणजे सहजात्मस्थिति तेंच खरें ह्मणजे 'निजदर्शन' होय.

आतां याच आत्मदर्शनाचें स्वरूप पुन्हा सांगतात:—

आत्मानमीक्षेत परं प्रपश्ये--
दित्यागमोक्तेः सुलभो न भावः।
नात्मैव दृश्यो यदि का कथेशे
स्वयं तदन्नीभवनं तदीक्षा ॥ २३ ॥

अर्थ—आत्मा पहावा, ईश्वराचा साक्षात्कार करून घ्यावा, असें जें वेदांत–उपनिषदांत–सांगितलें आहे, तें कांहीं तितकें सोपें नाहीं; फार कठीण आहे. कारण, आत्मा हा जर द्रष्टाच आहे, दृश्य नाहीं; तर ईश्वर हा दृश्य कसा होऊं शकेल? त्या श्रुत्युक्त दर्शनाचा भाव असा आहे कीं, त्याचें दर्शन म्हणजे त्याचें आपण अन्न होऊन जाणें–त्याला आत्मसात् होणें किंवा त्याच्यांत समरसून जाणें हेंच होय. यालाच 'ईश्वरसाक्षात्कार' म्हणतात.

याप्रमाणें ईश्वरदर्शनाचें स्वरूप सांगितलें. आतां आत्मदर्शनाहून ईश्वरदर्शन भिन्न नाहीं असें सांगतात:—

धिये प्रकाशं परमो वितीर्य
स्वयं धियोऽन्तः प्रविभाति गुप्तः ।
धियं परावर्त्य धियोऽन्तरेऽत्र
संयोजनान्नेश्वरदृष्टिरन्या ॥ २४ ॥

अर्थ—परमात्मा हा आमच्या बुद्धीला प्रकाश देऊन स्वतः आपण बुद्धीच्या आंत गुप्तपणें राहून प्रकाशत असतो. याकरितां आमची बहिर्मुख झालेली बुद्धि-वृत्ति मागें म्हणजे अंतरांत* मूळ अधिष्ठान स्वरूपाशीं संयुक्त करणें याहून परमात्मदर्शन दुसरें नाहीं.

यापुढील तीन श्लोकांत अहंकाराचें—अहंवृत्तीचें लक्षण सांगतातः—

न वक्ति देहोऽहमिति प्रसुप्तौ
न कोऽपि नाभूवमिति प्रवक्ति ।
यत्रोदिते सर्वमुदेति तस्य
धियाऽहमः शोधय जन्मदेशम् ॥२५॥

[* यासंबंधीं श्रीमुकुंदराजाच्या परमामृतांतील खालील ओव्या पहाव्यात—]

स्थूळ इंद्रियांमधून । युक्तीनें एकवटीं मन ।
अंतराकाशीं नेऊन । स्थिर करीं ॥ ९·६ ॥
उफराटे दृष्टीचें पाहणें । जे द्रष्ट्यामाजीं दृष्टि मुरवणें ।
पाहतया मुळासि जाणणें । स्वस्वरूपासी ॥ ४·२ ॥

अर्थ—मी देह आहे असें देह कांहीं म्हणत नाहीं (यावरून देह मी नव्हे हें स्पष्ट आहे). झोंपेंत मी नव्हतों असेंही कोणी म्हणत नाहीं. [तसें कोणाला वाटतच नाहीं, यावरून शरीराहून निराळा असा कोणीतरी जागृति व सुषुप्ति या दोन्हीं अवस्थांमध्यें अविच्छिन्नपणें असतोच; व अवस्था बदलल्या तरी त्याचें–'अहं'चें अस्तित्व कायम असतें.] ज्या 'मी' चा उदय झाला असतां सर्व जगताचें भान होतें, त्या 'मी'चें उत्पत्तिस्थान सूक्ष्म बुद्धीनें शोधून काढ (तो मी कुठून उत्पन्न होतो तें पहा).*

याप्रमाणें अहंकार हाच सर्व व्यवहारज्ञानाचें कारण आहे असें सांगून पुढील श्लोकांत त्याचे व्यापारभेदानुसार नामभेद सांगतातः—

देहो न जानाति सतो न जन्म
देहप्रमाणोऽन्य उदेति मध्ये ।

* येथें नाथभागवतांतील खालील ओंव्या पहाण्यासारख्या आहेत—

स्थूल सूक्ष्म देहांहून । आत्मा तो सर्वदा भिन्न । तेणें वेगळेंपण जाण । करी वर्तन प्रपंचीं ॥ २५५ ॥ जीव उभय देहीं वर्ततां । प्राणियांसी देहातीतता । स्फुरत असे सर्वथा । तेचि तत्त्वतां नेणती ॥ २५६ ॥ म्हणे माझा डोळा दुखों लागला । परी न म्हणे मीचि दुखों आला । माझा पावोचि मोडला । परी मी मोडला हें न म्हणे ॥२५७॥ यापरी देहीं वर्ततां । प्रत्यक्ष सांगे देहातीतता । हे आपुली आपणा अवस्था । न कळे भ्रांता देहभ्रमें ॥ २५८ ॥—(अ. १०)

अहंकृतिग्रंथिविबंधसूक्ष्म-
शरीरचेतोभवजीवनामा ॥ २६ ॥

अर्थ—देह जड असल्यामुळें तो कांहींच जाणत नाहीं. सद्वस्तूला चिद्घनत्वामुळें उत्पत्तिच नाहीं; [तर मग 'माझा तुझा' असा व्यवहार कसा संभवतो हें सांगतात.] अज अशी सच्चिदानंदवस्तु व जड देह या दोहोंमध्यें या दोहोंहून निराळा पण देहाइतकाच दुसरा कोणी तरी उदय पावतो. [हा कोण व याचे व्यापार म्ह. काय कोणतीं हें दर्शविण्यासाठीं याचीं विविध नांवें सांगतात.] अहंकार, ग्रंथि, बंध, सूक्ष्म-शरीर, चित्त, जीव व भव अशीं याचीं नांवें आहेत.

अहंकार—चिदात्मा हा सर्वव्यापक असला तरी, तो जड व चेतन यांच्यामध्यें असल्यामुळें दोघांना जोडणारा व देहभर व्यापून अभिमानानें 'मी मी' म्हणून स्फुरणारा असा असतो, म्हणून त्याला अहंकार म्हणतात.

ग्रंथि—जड देह व चिद्रूप आत्मा यांची गांठ बांधतो म्हणून याला ग्रंथि–चिज्जडग्रंथि म्हणतात.

बंध—हा चिज्जडाला बांधून टाकतो म्हणून याला बंध असें ही नांव आहे.

सूक्ष्म शरीर–स्थूल व कारण या शरीरांमध्यें असल्या-मुळें हा सूक्ष्म म्हटला जातो. देहाचा आश्रय करून देह-

कार्यें करीत असतो. ह्मणून त्याला सूक्ष्मशरीर असेंही नांव आहे.

चेतोभवजीवनामा—सूक्ष्म शरीराचे दोन भाग आहेत. (१) प्राण व (२) मन किंवा चित्त. यांपैकीं मन हें आत्मरवीच्या अधिक जवळ आहे. या मुद्द्यावर लक्ष्य देऊन बोलावयाचें तर अहंकाराला चित्त किंवा मन ह्मणतात. पण सर्व शरीराला व मनालाहि प्राण चेतना देत असल्या-मुळें त्याला ‘ जीव ’ असें म्हणतात. आणि जीव हा निरंतर जन्ममरणाच्या चक्रावर फिरत असल्यामुळें त्याला (अहंकाराला) ‘भव’ किंवा ‘संसार’ असें म्हणतात.

आतां अहंपिशाचाचा खेळ कसा असतो तें सांगतातः—

रूपोद्भवो रूपततिप्रतिष्ठो
रूपाशनो धूतगृहीतरूपः ।
स्वयं विरूपः स्वविचारकाले
धावत्यहंकारपिशाच एषः ॥ २७ ॥

अर्थ—(स्थूल अथवा सूक्ष्म अशा) रूपापासूनच याचा जन्म होतो. रूपसंततीवरच ह्याची स्थिति अवलंबून असते. रूपांवरच हा जगतो; अनेक रूपें घेतो व सोडतो. [एका रूपापासूनच आश्रयार्थ दुसऱ्या रूपा-

अर्थ—पाणबुड्या ज्याप्रमाणें खोल विहिरींत बुडी मारून बुडाशीं असलेली वस्तु शोधून काढतो, त्याप्रमाणें साधकानें प्राण आणि वाणी यांचें नियमन करून नितान्त तीक्ष्ण बुद्धीनें आपल्या अंतरांत खोल शिरून शोध करावा म्हणजे अहंकाराच्या मूळ स्वरूपाचा पत्ता लागेल.

वाणी व प्राण यांच्या नियमनानें 'मज्जन' नामक साधन सांगितलें. आतां मौन धरून मनानें करणेचें विचाररूप साधन सांगतात:—

मौनेन मज्जन्मनसा स्वमूल–
चर्चैव सत्यात्मविचारणं स्यात् ।
एषोऽहमेतन्न मम स्वरूप—
मिति प्रमा सत्यविचारणांगम् ॥३१॥

अर्थ – मौनानें म्हणजे शांत व एकाग्र मनानें आपल्या मूळ स्थानाचा शोध करणें हाच खरा 'आत्मविचार' होय. हा (द्रष्टा) मी आहे, हें (शरीरादि दृश्य) माझें स्वरूप नव्हे अशा तऱ्हेची प्रमा (अनुभवक्षम शास्त्रीय बुद्धि) हें आत्मविचाराचें अंग (साधन) आहे.

आत्माभासरूप अहंकाराचा नाश झाल्यावर अंतःकरणाधिष्ठित परमात्मस्वरूपदर्शक शुद्ध अहंवृत्तीचें स्फुरण होतें याविषयीं सांगतातः—

गवेषणात्प्राप्य हृदन्तरं तत्-
पतेदहन्ता परिभुग्नशीर्षा ।
अथाहमन्यत्स्फुरति प्रकृष्टं
नाहंकृतिस्तत्परमेव पूर्णम् ॥ ३२ ॥

अर्थ—मागें सांगितल्याप्रमाणें शोध करितां करितां मन जेव्हां हृदयाच्या मूलस्थानाला जाऊन भिडतें, तेव्हां अहंकार आपलें डोकें वांकवून गळून पडतो (स्वरूपांत लीन होतो). त्यानंतर निराळा एक उत्कृष्ट म्ह. शुद्ध अहंकार उदयास येतो (स्फुरतो). हा पूर्वींचा विकारी अहंकार नव्हे, तर तो नित्यस्फुरद्रूप, परमश्रेष्ठ व पूर्ण असा आहे.

अशा तऱ्हेच्या जीवन्मुक्ताची स्थिति, इतरांस समजण्यास अशक्य असते असें सांगतातः—

अहंकृतिं यो लसति ग्रसित्वा
किं तस्य कार्यं परिशिष्टमस्ति ।
किंचिद्विजानाति स नात्मनोऽन्यत्
तस्य स्थितिं भावयितुं क्षमः कः ॥ ३३ ॥

अर्थ—याप्रमाणें (क्षुद्र) अहंकाराला ग्रासून टाकून

जो आत्मस्वरूपानें प्रकाशतो त्याचें कोणतें कर्तव्य शिल्लक राहिलें? कोणतेंच नाहीं. आपल्याहून निराळें दुसरें कांहीं आहे असें तो मुळीं समजतच नाहीं. अशा जीवन्मुक्ताची स्थिति-गति समजण्यास कोण समर्थ आहे?

दुर्बल मतीमुळेंच हे वादविवाद उत्पन्न होतात असें सांगतातः—

आह स्फुटं तत्त्वमसीति वेद—
स्तथाप्यसंप्राप्य परात्मनिष्ठाम् ।
भूयो विचारो मतिदुर्बलत्वं
तत्सर्वदा स्वात्मतया हि भाति ॥३४॥

अर्थ—तो (आत्मा) तूं आहेस असें श्रुति स्पष्ट सांगत आहे. तथापि त्याप्रमाणें आत्मनिष्ठा (सहजात्मस्थिति) प्राप्त करून न घेतां पुन्हा विचार व वादविवाद करीत राहणें हें दुर्बल (अपरिपक्व) मतीचें लक्षण आहे. तो (परमात्मा) सर्वदा आत्मरूपानें स्फुरतच असतो.

द्रष्टा जो आत्मा हा कधीं दृश्य होऊं शकत नाहीं, म्हणून तो दोन्ही रूपानें एकच आहे असें सांगतातः—

न वेद्म्यहं मामुत वेद्म्यहं मा—
मिति प्रवादो मनुजस्य हास्यः ।

दृग्दृश्यभेदात्किमयं द्विधात्मा
स्वात्मैकतायां हि धियां न भेदाः ॥

अर्थ—मी स्वतःला जाणत नाहीं किंवा जाणतो अशा तऱ्हेचा प्रवाद मनुष्याला अगदीं हास्यास्पद होय. हा आत्मा द्रष्टा व दृश्य असा द्विविध आहे काय? केव्हांच नाहीं. आत्मा हा एकच आहे असा सर्वांचा अनुभव आहे. (आत्माभास—चिदाभासरूप जीवाचा, मूळ आत्मस्वरूपाशीं अभेद म्हणजे ऐक्य आहे असें तात्पर्य.)

आत्मस्वरूप जर सहज सिद्ध आहे तर त्याच्या ठायीं निष्ठा सहज कां प्राप्त होत नाहीं याविषयीं सांगतातः—

हृत्प्राप्य सद्भासनिजस्वरूपे
स्वभावसिद्धेऽनुपलभ्य निष्ठाम् ।
मायाविलासः सदसत्सरूप—
विरूपनानैकसुखप्रवादाः ॥ ३६ ॥

अर्थ—स्वभावसिद्ध अशा आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं भासमान होणारें त्याचें स्थान जें 'हृदय' तें प्राप्त होऊन सहजात्मनिष्ठा न मिळवितां, 'तें आहे कीं नाहीं, तें साकार कीं निराकार, तें एक कीं अनेक' असे अनेक प्रकारचे संशय घेणें हा केवळ मायाविलास म्हणजे परमात्म्याच्या 'अघटितघटनापटीयसी' अशा विचित्र शक्तीचा खेळ होय.

आतां आत्मलाभ हीच परमसिद्धि होय असें सांगतातः—

सिद्धस्य वित्तिः सत एव सिद्धिः
स्वप्नोपमानाः खलु सिद्धयोऽन्याः ।
स्वप्नः प्रबुद्धस्य कथं नु सत्यः
सति स्थितः किं पुनरेति मायाम् ॥३७॥

अर्थ—नित्य सिद्ध अशा सत्स्वरूप आत्म्याचें ज्ञान (साक्षात्कार) हीच खरी सिद्धि होय. दुसऱ्या (अणिमादि) सिद्धि स्वप्नवत् होत. जागा झालेल्या पुरुषाला स्वप्न खरें भासतें काय? त्याप्रमाणें आत्म-स्थित—आत्मनिष्ठ पुरुष पुन्हा मायेंत सांपडतो काय?

आतां, देहात्मभाव असेतोंपर्यंत 'सोऽहं' भावाची जरूरी असते असें सांगतातः—

सोऽहं विचारो वपुरात्मभावे
साहाय्यकारी परमार्गणस्य ।
स्वात्म्यैकसिद्धौ स पुनर्निरर्थो
यथा नरत्वप्रमितिर्नरस्य ॥ ३८ ॥

अर्थ—जोंपर्यंत देह (स्थूल अथवा सूक्ष्म) आपण आहे अशी भावना असते, तोंपर्यंत 'सोऽहं' (तो मी आहे) हा विचार आत्मशोधाला साहाय्यकारी (उपकारक) असतो. पण स्वात्म्यैक्य सिद्ध झालें कीं, 'मी मनुष्य आहें, मी मनुष्य आहें' असें

म्हणणें मनुष्याला जसें निरर्थक असतें, तसा हा 'सोऽहं' विचारहि मागाहून व्यर्थ होतो.*

आतां नित्यसिद्ध आत्मा सत्स्वरूप आहे हें 'दशम' च्या दृष्टांतानें सांगतात:—

द्वैतं विचारे परमार्थबोधे
त्वद्वैतमित्येष न साधुवादः ।
गवेषणात्प्राग्दशमे विनष्टे
पश्चाच्च लब्धे दशमत्वमेकम् ॥३९॥

अर्थ—आत्मविचार करीत असतांना पूर्वीं द्वैतभाव होता व आतां परमार्थज्ञान झाल्यावर अद्वैतभाव प्राप्त झाला हें म्हणणें योग्य नाहीं. उदाहरणार्थ, नदी उतरून जाणाऱ्या दहा जणांपैकीं प्रत्येकजण स्वतःस सोडून मोजीत असतां 'दहावा' गमावला असें वाटलें व पुनः नीट (स्वतःस धरून) मोजतांना तो सांपडला असें दिसलें; तरी पूर्वीं व नंतर तो दहावा एकसारखाच होता कीं नाहीं?

आतां अहंकर्तृभावाच्या त्यागानेंच कर्मनाश होतो असें सांगतात:—

---

* श्रीज्ञानेश्वरांची पुढील ओंवी पहा—

"तैसा ज्ञानरूप आत्मा । ज्ञानेंचि आपुली प्रमा ।
करितसे 'सोऽहं' मा । ऐसा बंधु ॥"

—अमृतानुभव. ३-२३.

करोमि कर्मेति नरो विजानन्
बाध्यो भवेत्कर्मफलं च भोक्तुम्।
विचारधूता हृदि कर्तृता चेत्
कर्मत्रयं नश्यति सैव मुक्तिः॥४०॥

अर्थ—'मी कर्म करितों' असें मानणारा व म्हणणारा पुरुषच त्या कर्माचें फल भोगण्यास बद्ध होतो. आत्मस्वरूपभानाचें स्थान जें हृदय त्यांतून सत्यात्मस्वरूपविचारानें कर्तृत्वबुद्धि दूर केली असतां, संचित प्रारब्ध व क्रियमाण या तीन्हीहि कर्मांचा नाश होतो, व याचेंच नांव मुक्ति.* (कर्मत्रय नाशानें मुक्ति होते असें म्हटलें, यावरून अहंकारामुळें कर्माला बाधकत्व यतं हें स्पष्ट होतें. अर्थात् अहंकाराच्या नाशानेंच आत्मलाभरूप मुक्ति प्राप्त होते हें सिद्ध झालें).

आतां सत्यस्वरूप आत्म्याला बंध नाहीं व मोक्षहि नाहीं असें सांगतातः—

बद्धत्वभावे सति मोक्षचिन्ता
बन्धस्तु कस्येति विचारणेन।

---

* या ठिकाणीं "नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित्" हा भगवद्गीतेंतील अ. ५ श्लोक ८ व ९ पहावा.

सिद्धे स्वयं स्वात्मनि नित्यमुक्ते
क्व बन्धचिन्ता क्व च मोक्षचिन्ता ॥

अर्थ—'मी बद्ध आहे' अशी भावना असली कीं, मोक्षाची चिंता करावी लागते. परंतु बंध हा कोणाला आहे याचा सूक्ष्म विचार केला असतां आत्मा हा स्वयंसिद्ध व नित्यमुक्त आहे असा अनुभव येतो. मग बंधचिंता अगर मोक्षचिंता कुठें राहिली ?

———

आतां त्रिविधमुक्तीहून निराळी अशी अहंभावनाशरूप खरी मुक्ति सांगतातः—

रूपिण्यरूपिण्युभयात्मिका च
मुक्तिस्त्रिरूपेति विदो वदन्ति ।
इदं त्रयं या विविनक्त्यहंधी—
स्तस्याः प्रणाशः परमार्थमुक्तिः ॥४२॥

अर्थ—'रूपिणी' (सगुण), 'अरूपिणी' (निर्गुण) आणि उभयात्मिका अशी तीन प्रकारची मुक्ति आहे असें विद्वान म्हणतात. पण अहंबुद्धि हीच या तीन्ही मुक्तींचा विचार करून त्यांचा अंगीकार करिते. त्या अहंबुद्धीचा विनाश हीच (वरील तीन मुक्तींहून निराळी अशी) 'परमार्थमुक्ति' म्हणजे खरी मुक्ति होय.

———

सद्दर्शनं द्राविडवाङ्निबद्धं
महर्षिणा श्रीरमणेन शुद्धम् ।
प्रबंधमुत्कृष्टममर्त्यवाण्या-
मनूद्य वासिष्ठमुनिर्व्यतानीत् ॥४३॥

अर्थ--याप्रमाणें महर्षि श्रीरमणांनीं द्राविड भाषेंत जो ‘ सद्दर्शन ’ नांवाचा शुद्ध व उत्कृष्ट प्रबंध रचिला त्याचा वासिष्ठ गणपति मुनींनीं गीर्वाण भाषेंत हा अनुवाद केलेला आहे.

[आणि याच अनुवादावरून सर्वांना समजण्यासाठीं आम्हीं महाराष्ट्रभाषेंत गद्यांत त्याचा अनुवाद केलेला आहे.]

सत्तत्त्वसारं सरलं दधाना
मुमुक्षुलोकाय मुदं ददाना ।
अमानुषश्रीरमणीयवाणी—
मयूखभित्तिर्मुनिवाग्विभाति ॥४४॥

अर्थ—परमार्थतत्त्वाचें सार सुलभ रीतीनें सांगणारी, मुमुक्षुजनांना आनंद देणारी, आणि भगवान श्रीरमणमहर्षींच्या दैवी वाणीच्या किरणांचा आश्रय घेणारी अशी गणपतिमुनींची वाणी सर्वदा विजयी असो.

॥ ॐ तत्सत्—ब्रह्मार्पणमस्तु ॥

ॐ

श्रीरमणप्रस्थानत्रयी

भाग २ रा

[श्रीरमणोपनिषत्]

- उपदेशसार -

अहमपेतकं निजविभानकम् ।
महदिदं तपो रमणवागियम् ॥

—उपदेशसार, श्लोक ३०.

उपदेशसार-प्रस्तावना.

भगवान श्रीरमण महर्षीच्या हृदयांतून निघालेला 'उपदेशसार' हा एक छोटासा सुटसुटीत ग्रंथ आहे. ईश, केन यांसारखीं छोटीं उपनिषदें, श्रीशंकराचार्यांचीं मोहमुद्गरासारखीं छोटीं सुंदर स्तोत्रें, श्रीज्ञानदेवाचा हरि-पाठ, श्रीसमर्थ रामदासस्वामींचे मनाचे श्लोक, श्रीमयूर-पंताची केकावली इत्यादि 'वामनमूर्ति पण बडी कीर्ति' ग्रंथांप्रमाणें 'उपदेशसार' हाहि नित्यपाठांत ठेवण्याच्या लायकीचा ग्रंथ आहे. या ग्रंथाचा हा एक विशेष आहे कीं, तो संस्कृतांत असला तरी सुलभ, स्पष्ट व अर्थपूर्ण असा आहे. भगवान् श्रीरमणमहर्षींनीं संस्कृताचा अभ्यास केव्हांच केला नाहीं. त्यांचे शिष्य 'काव्यकंठ' वासिष्ठ गणपतिमुनि या बड्या संस्कृतज्ञ शास्त्री पंडिताच्या व इतर संस्कृतज्ञांच्या सहवासामुळें त्यांना संस्कृताचा थोडाबहुत परिचय १९०८ सालापासून होऊं लागला. १९१५ सालीं त्यांनीं संस्कृतांत एक श्लोक रचिला; १९१७ सालीं त्यांनीं 'अरुणाचल पंचरत्न' नांवाचें स्तोत्र रचिलें; आणि सर्व साधकांकरितां आपला 'अमृतानुभव' स्वतः केलेल्या मूळ तामिल श्लोकांवरून फारच स्पष्ट व विशद अशा अवघ्या ३० श्लोकांत १९२७ सालीं जनताजनार्दना-

पुढें मांडला. तोच हा ‘ उपदेशसार ’ होय. याकरितां आम्हीं या छोट्या ग्रंथाला ‘ श्रीरमणोपनिषत् ’ असें अन्वर्थक नांव देत आहों. याची रूपरेषा थोडक्यांत अशी आहे कीं—

पहिल्या १ ते ५ श्लोकांत कर्ममार्गाचें, ६ ते १० श्लोकांत भक्तिमार्गाचें, ११ ते १५ श्लोकांत योगमार्गाचें आणि १६ ते २८ श्लोकांत ज्ञानमार्गाचें सूत्ररूपानें वर्णन केलेलें आहे. दहाव्या श्लोकांत तर या सर्व मार्गांचा त्यांनीं थोडक्यांत उत्तम तऱ्हेनें समन्वय केलेला आहे. या अनुवादाचे कामीं काव्यकंठ वासिष्ठ गणपतिमुनि यांच्या संस्कृत टीकेचें फार साहाय्य झालें आहे.

महाराष्ट्र वाचकांनीं या ‘ अनुभवामृता ’चा आस्वाद घेऊन त्यांतील रस चाखून चोखून पुष्ट व अमर व्हावें, अशा शुभेच्छेनें प्रेरित होऊन हा प्रयत्न केला आहे.

वासुदेवाश्रम—विजयनगर
ठळकवाडी—बेळगांव
विजयादशमी शके १८६१

उपदेशसाररत
संतसेवक
नागेश वासुदेव गुणाजी

रमणमहर्षिप्रणीत

सार्थ उपदेशसार

(कामदा वृत्त)

कर्तुराज्ञया प्राप्यते फलम् ।
कर्म किं परं कर्म तज्जडम् ॥ १ ॥

अर्थ—(सृष्टि) कर्ता जो परमेश्वर त्याच्या आज्ञेनुसार किंवा प्रेरणेनुसार (कर्माचें) फल (जीवाला) मिळत असतें. पण कर्म हें 'पर' म्हणजे श्रेष्ठ आहे काय ? नाहीं. कारण तें जड आहे.

खुलासा—कर्माला प्राधान्य देणारे पूर्वमीमांसक ईश्वर मानीत नाहींत. 'पेरावें तसें उगवतें' या न्यायानें अमुक कर्म केलें असतां अमुक फल मिळतें, तेव्हां कर्मालाच श्रेष्ठ मानणें योग्य आहे, असें ते म्हणत असतात. या त्यांच्या मताच्या खंडनार्थ हा श्लोक आहे. भगवान श्रीरमणमहर्षि सांगतात कीं, कर्माच्या अंगीं फल देण्याचें सामर्थ्य नाहीं, कारण तें जड आहे. म्हणून जगन्नियामक परमेश्वराच्या आज्ञेनेंच किंवा प्रेरणेनेंच कर्माचें फल प्राप्त होतें. याकरितां कर्म श्रेष्ठ नाहीं, परमेश्वरच श्रेष्ठ आहे. साधकांनीं हा मुद्दा प्रथम ध्यानांत ठेवून, मी अमुक कर्म करीन तमुक फल मिळवीन,

असा वृथा अभिमान सोडून देऊन परमेश्वरालाच सर्वभावें शरण गेलें पाहिजे.

कृतिमहोदधौ पतनकारणम् ।
फलमशाश्वतं गतिनिरोधकम् ॥२॥

अर्थ—कर्मापासून मिळणारें फळ हें अशाश्वत आहे. तें आम्हांस कर्ममहासागरामध्यें पतन पावण्यास म्ह. आमच्या अधोगतीस कारण होतें; अर्थात् आमच्या गतीच्या—मोक्षप्राप्तीच्या आड येतें.

खुलासा—आम्हांला कर्माचें फल मिळालें. (सुख-दुःखाचा अनुभव येऊन गेला) तरी त्या फलाच्या अशाश्वततेमुळेंच कर्माविषयींची वासना मनांत उरते. या वासनेमुळेंच आम्हांला पुनःपुनः कर्म करावें लागतें. आणि त्यामुळें जन्ममरणाच्या फेऱ्यांत आम्हीं सांपडतों. ही वासनाच आम्हांला कर्ममहासागरांत पाडण्यास कारण होते. अर्थात् पुनरावृत्तिरहित गतीच्या म्हणजे मोक्षाच्या आड कर्मफलवासनाच येते; कर्म येत नाहीं. यावरून सकाम कर्मावरच भगवंताचा कटाक्ष आहे हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

ईश्वरार्पितं नेच्छयाकृतम् ।
चित्तशोधकं मुक्तिसाधकम् ॥ ३ ॥

अर्थ—तेंच कर्म ईश्वरार्पणबुद्धीनें आणि निष्काम भावानें केलें, तर तें चित्ताची शुद्धि करणारें आणि (तद्द्वारा) मोक्ष साधून देणारें असें होतें.

खुलासा—' निष्कामभावानें ' (कोणतीही स्वार्थाची इच्छा न बाळगतां) आणि ' ईश्वरार्पणबुद्धीनें ' म्हणजे हे विश्वाध्यक्ष परमेश्वरा, तुझ्याच प्रेरणेनें मी हें कर्म करीत आहे, तुझ्या जगत्कार्याला हवा तसा याच्या फलाचा उपयोग किंवा विनियोग तूं करून घे, अशा भावनेनें केलेलें कर्म चित्तशुद्धिकारक व मुक्तिसाधक होतें. चित्तशुद्धि झाली कीं, मोक्ष सुलभ होतो. 'निष्काम कर्मयोग' तो हाच.

कायवाङ्मनः कार्यमुत्तमम् ।
पूजनं जपश्चिन्तनं क्रमात् ॥ ४ ॥

अर्थ—कायेचें कार्य 'पूजन', वाणीचें कार्य 'जप', आणि मनाचें कार्य ' चिन्तन ' [ध्यान] हीं क्रमानें एकापेक्षां एक श्रेष्ठ होत. अर्थात् पूजनापेक्षां जप व जपापेक्षां चिंतन किंवा ध्यान उत्तम होय. (स्तोत्राचा जपांत समावेश होतो असें समजावें.)

खुलासा—वरील अर्थाचाच शास्त्रांत दुसरा श्लोक आढळतो तो असाः—

" पूजाकोटिसमं स्तोत्रम् स्तोत्रकोटिसमं जपः ।
जपकोटिसमं ध्यानं, ध्यानकोटिसमं लयः ॥ "
(अर्थ सर्वांना समजण्यासारखाच आहे.)

जगत ईशधीयुक्तसेवनम् ।
अष्टमूर्तिभृद्देवपूजनम् ॥ ५ ॥

अर्थ—सर्व दृश्य जगताचें ईशबुद्धीनें सेवन करणें हें अष्टमूर्तिधारी परमेश्वराचें पूजन होय.

खुलासाः—पूर्वश्लोकांत सांगितलेलें पूजन हें सामान्यतः मूर्तिपूजन होय. पण या श्लोकांत ' पूजन ' शब्दानें सर्व कर्मांत अत्यंत श्रेष्ठ असें पूजन सांगतात. अखिल चराचर जगताचें ईशबुद्धीनें सेवन म्हणजे ' पुरुष एवेदं सर्वं '= सर्व जगत् हें ईश्वराचें रूप आहे, अशा बुद्धीनें सेवन करणें हेंच श्रेष्ठ पूजन होय. ही " सर्वं खल्विदं ब्रह्म तज्जलानिति शान्त उपासीत " याप्रमाणें छान्दोग्य उपनिषदांत सांगितलेली ' शांडिल्य ' विद्येंतील उपासना होय. **' अष्टमूर्ति '** म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश हीं पंचमहाभूतें व सूर्य, चंद्र आणि जीव असें समजावें. ह्या मूर्तींनीं सर्व जगत् व्यापिलें असल्यामुळें जगताची ईश्वरबुद्धीनें उपासना करणें ही ' अष्टमूर्ति-उपासना ' समजावी. हेंच पूर्ण व श्रेष्ठ पूजन होय. मागच्या

श्लोकांतील पूजा ही एकदेशी स्वरूपाची असल्यामुळें व प्राधान्यतः 'कायेनें' करण्याची असल्यामुळें अपूर्ण आहे आणि ही (या श्लोकांतील) पूजा सर्वात्मक मूर्तीची व सर्वथैव 'बुद्धीनें' केली जाणारी असल्यामुळें पूर्ण आहे असें यांतील वैशिष्ट्य समजावें.

उत्तमस्तवादुच्चमन्दतः ।
चित्तजं जपध्यानमुत्तमम् ॥ ६ ॥

अर्थ—उत्तम स्तोत्रापेक्षां किंवा मोठ्यानें अगर हलक्या स्वरानें केलेल्या जपापेक्षां मानसिक जप म्हणजे ध्यान श्रेष्ठ होय.

खुलासा—जप तीन प्रकारचा आहे. (१) वाचिक, (२) उपांशु आणि (३) मानस. मोठ्यानें उच्चारला जाणारा तो **वाचिक** जप; दुसऱ्यास ऐकूं न जाईल अशा हलक्या स्वरानें उच्चारलेला म्हणजे ओठांतल्या ओठांत केलेला हा **उपांशु** जप; आणि ओठ व जीभहि न हालवितां मनांतल्या मनांत केलेला जप तो **मानस** जप होय. वाचिक जपापेक्षां उपांशु जप श्रेष्ठ, आणि उपांशु जपापेक्षां मानस जप श्रेष्ठ होय. (कारण मानसजप म्हणजेच ' ध्यान ' आणि ध्यान ही मनाची क्रिया.)

आज्यधारया स्रोतसा समम् ।
सरलचिन्तनं विरलतः परम् ॥ ७ ॥

अर्थ--तुपाच्या धारेप्रमाणें व नदीच्या प्रवाहा-प्रमाणें सरळ व अखंड चिन्तन हें खंडित व तुटक चिन्तनापेक्षां श्रेष्ठ आहे.

खुलासा—पाण्याची धार अविरल नसते म्हणजे तुटक तुटक असते, पण तेलाची किंवा तुपाची धारच अविरल म्हणजे मध्यें न तुटणारी अर्थात् अखंड असते. नदीचें किंवा झऱ्याचें पाणी हें निर्मळ व सतत वाहणारें असतें. ध्यान हें पूजा व जप यापेक्षां उत्तम असलें तरी अवि-च्छिन्न [न तुटणारें] ध्यान हें विच्छिन्न ध्यानापेक्षां श्रेष्ठ होय असें समजावें. येथें तुपाच्या दृष्टान्तानें भक्तिरूपी स्नेहसंबंध आणि नदीच्या प्रवाहाच्या दृष्टान्तानें निर्मळत्व सुचविलेलें आहे असें जाणावें. म्हणून या दोन दृष्टान्ता-नुसार असणारें ध्यानच श्रेष्ठ होय.

भेदभावनात्सोऽहमित्यसौ ।
भावनाऽभिदा पावनी मता ॥ ८ ॥

अर्थ--(ध्याता निराळा व ध्येय परमात्मा निराळा अशा) भेदभावनेच्या ध्यानापेक्षां ध्येय म्हणजे ईश्वर तो मीच आहे अशी अभेद भावना पवित्र आहे.

खुलासा--मागच्या श्लोकांत ध्यान कसें करावें हें सांगितलें. पण या श्लोकांत ध्यानाचें स्वरूप कसें असावें

हें दाखवून भेदभक्तीपेक्षां अभेदभक्ति श्रेष्ठ असें सांगितलें आहे.

भावशून्यसद्भावसुस्थितिः ।
भावनाबलाद्भक्तिरुत्तमा ॥ ९ ॥

अर्थ—अभेद भावनेच्या सामर्थ्यामुळें भावशून्य म्हणजे संकल्पशून्य अथवा वृत्तिशून्य अशी जी सद्भावाची-सद्रूपाची सुस्थिति म्ह. निष्ठा तीच उत्तम भक्ति होय.

खुलासा—' सत्भाव ' म्हणजे अस्तित्व, अंतरांतील आहेपणाची भावना. याला सत् + ता='सत्ता' (असणेंपणा) हि म्हणतात. हा असणेपणा आपला आपणास भासतो त्यास चित् + ता='चित्ता' म्हणजे जाणणेंपणा म्हणतात. आणि जाणणेंपणा हाच सहजप्रियपणा (आनंद). यांस अस्ति + भाति + प्रिय अथवा सत् + चित् + सुख किंवा आनंद म्ह. 'सच्चिदानंद' म्हणतात. हेंच परमात्म्याचें खरें स्वरूप. या स्वरूपांत चित्ताचा अथवा मनाचा लय म्हणजे ' निष्ठा ' हीच उत्तम भक्ति होय. यालाच 'उत्तम तप' असेंहि म्हणतात.

" हृदयीं हरि चिंतणें सद्रूप । (अ. १७–९४) **....चित्स्वरूप** (अ. १९–४५४) ॥ **हें परमतप तपामाजीं** "— असें एकनाथी भागवतांत सांगितलें आहे.

याच अर्थाचा श्रीनारायण महाराज जालवणकर यांचाही एक श्लोक आहे, तो असा—

" जें भान भावविरहीत असे सदा जें।
निष्कंप निष्क्रिय निरंतर जें विराजे ॥
तें शुद्ध मीच समजोनि त्यजा वियोगा।
साधा भजा नमुनि सद्गुरुराज योगा ॥ "

हृत्स्थले मनःस्वस्थता क्रिया ।
भक्तियोगबोधाश्च निश्चितम् ॥१०॥

अर्थ—हृदयाचे ठिकाणीं मन स्वस्थ करणें हेंच श्रेष्ठ **'कर्म'** (कर्ममार्ग), हीच **'भक्ति'** (उपासनामार्ग), हाच **'योग'** (योगमार्ग), हेंच **'ज्ञान'** (ज्ञानमार्ग) असें निश्चितपणें समजावें.

खुलासा—या श्लोकांत कर्म, भक्ति, योग व ज्ञान या मार्गांचें सार थोडक्यांत सांगून भगवानांनीं त्यांचा उत्तम समन्वय केलेला आहे.

" विषयांचा विसर पडे। इंद्रियांची कसमस मोडे ॥
मनाची घडी घडे । हृदयामाजीं ॥ "

—ज्ञानेश्वरी—६—१८

हें ज्ञानेश्वर महाराजांचें वचन या ठिकाणीं लक्ष्यांत ठेवण्याजोगें आहे.

वायुरोधनाल्लीयते मनः ।
जालपक्षिवद्रोधसाधनम् ॥ ११ ॥

अर्थ—वायूचें रोधन (प्राणायाम) **केल्यानें, जाळ्यांत सांपडलेल्या पक्ष्याप्रमाणें मनाचा निश्चलपणा म्ह० लय होतो.**

खुलासा—प्राणायाम हें एक मनोलयाचें साधन आहे. उड्या मारणाऱ्या पक्ष्याला जाळ्यांत अडकवून ठेवतात, त्याप्रमाणें हठयोगानें कुंभक साध्य करून किंवा प्राणापान-गतीचें सम्यक् निरीक्षण करून प्राणवायूचा निरोध केल्यानें मनाचा लय होतो. राजयोग्याच्या मताप्रमाणेंही हा 'कुंभक' होतो. रमणगीतेंत यास पुढील प्रमाण सांपडतें. "प्राणरोधश्च मनसा प्राणस्य प्रत्यवेक्षणम् । कुंभकं सिध्यति ह्येवं सततप्रत्यवेक्षणात् ॥" (अ. ६।५).

चित्तवायवश्चित्क्रियायुताः ।
शाखयोर्द्वयी शक्तिमूलका ॥ १२ ॥

अर्थ—विचार व क्रिया यांनीं युक्त असलेले असे (१) चित्त आणि (२) वायु हे एका मूळ (आदि) शक्तीच्या दोन शाखा होत.

खुलासा--चित्त म्हणजे मन याचें कार्य 'चिंतन' करणें. आणि वायु म्हणजे प्राण याचें कार्य 'क्रिया'

करणें. या चिंतन आणि क्रिया यांनीं युक्त असलेले आमचें मन व प्राण हे त्या एका आदिशक्तीच्या दोन शाखा होत. आदिशक्तीची ' ज्ञानशक्ति ' शाखा मन व ' क्रियाशक्ति ' शाखा प्राण होय. ज्याअर्थीं मन व प्राण ईश्वरशक्तीच्या दोन शाखा आहेत, त्याअर्थीं ईश्वरप्राप्ति यांच्या द्वारेंच सुलभ होते असें समजावें.

लयविनाशने उभयरोधने ।
लयगतं पुनर्भवति नोमृतम् ॥१३॥

अर्थ—मन हृदयाचे ठिकाणीं स्वस्थ करण्याचे दोन मार्ग—(१) लय व (२) नाश. लय पावलेलें मन पुनः उठतें; पण मृत झालेलें मन पुनः उठत नाहीं.

खुलासा—मनाला आपल्या ताब्यांत (हृदयांत) ठेवण्याचे दोन मार्ग (साधनें) आहेत. (१) मनोलय व (२) मनोनाश. मनांत जे कांहीं विचार अथवा तरंग म्हणजे वृत्ति उठतात त्या उठूं न देणें यास 'लय' म्हणतात. लय म्हणजे वृत्तींचा उपसंहार; आणि सर्व वृत्तींचा मूळ जो अहंकार त्याचा उपसंहार म्हणजे 'मनोनाश.' मनोलयानें योग्याला समाधि व व्युत्थान हीं होतात; पण मनोनाशानें ज्ञान्याला नित्य म्ह. अखंडसमाधि प्राप्त होते. (ही समाधि शांत व घोरकर्में करीत असतांनाहि नष्ट होत नाहीं.)

पुढील श्लोकांत मनोलयाचा व मनोनाशाचा उपाय सांगतातः—

प्राणबंधनाल्लीनमानसम् ।
एकचिन्तनान्नाशमेत्यदः ॥ १४ ॥

अर्थ—प्राणाच्या नियमनानें मन लीन होतें म्हणजे मनोलय होतो व एकमेवाद्वितीयाच्या चिंतनानें (आत्मानुसंधानानें) **तें नाश पावतें म्ह. मनोनाश होतो.**

खुलासा—प्रथम मनोलयाचा अभ्यास करावा. प्राणायामाच्या अभ्यासानें मनाला लीन करितां येतें व असें मन " एकमेवाद्वितीयम् " अशा आत्म्याचे ठिकाणीं स्थिर करण्याच्या अभ्यासानें नाश पावतें. (प्राणरोध हें साधन मनोलयाचें आहे, मनोनाशाचें नव्हे. मनोलयानें साधणारें ऐक्यानुसंधान हेंच मनोनाशाचें साधन होय.)

पुढील श्लोकांत मनोनाशाचा परिणाम अथवा महत्त्व सांगतात.

नष्टमानसोत्कृष्टयोगिनः ।
कृत्यमस्ति किं स्वस्थितिं यतः ॥१५॥

अर्थ—मन नाश पावल्यामुळें ज्याला स्वरूपस्थिति (आत्मनिष्ठा) **प्राप्त झाली, त्या उत्तम योग्याचें कोणतें कर्तव्य जगांत शिल्लक राहतें ? कोणतेंच नाहीं.**

खुलासा—मनोनाश होऊन ज्याला स्वस्थिति (स्वरूपांत स्थिर रहाणें–आत्मनिष्ठा) प्राप्त झाली अशा श्रेष्ठ योग्याचें इतिकर्तव्य संपलें. [**यस्त्वात्मरतिरेवस्यादात्मतृप्तश्च मानवः। आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥** भ० गीता ३–१७]

दृश्यवारितं चित्तमात्मनः ।
चित्त्वदर्शनं तत्त्वदर्शनम् ॥ १६ ॥

अर्थ—**दृश्य*** **म्हणजे दिसणाऱ्या वस्तु** (अर्थात् मनांत उठणाऱ्या वृत्तीसुद्धां) **यांपासून परावृत्त केलेल्या अन्तर्मुख मनालाच आत्म्याच्या चित्त्वाचें–चित्स्वरूपाचें दर्शन होतें. यालाच 'तत्त्वदर्शन' असें म्हणतात.**

खुलासा—व्यतिरेकानें विषयापासून परावृत्त केलेलें मनच अन्वयानें आत्म्याचें चित्स्वरूपदर्शनाला पात्र होतें. चित्ताच्या बहिर्मुखत्वाचा अभाव पण त्याबरोबरच निद्रे-

---

* 'दृश्य' संबंधीं श्रीसमर्थ रामदासांच्या खालील ओव्या लक्ष्यांत ठेवण्यासारख्या आहेत.

" दृष्टीसी दिसे मनासि भासे । तितुकें कालांतरीं नासे ॥
म्हणोनि दृश्यातीत असे । परब्रह्म तें ॥ " दासबोध ६।८।४७
दृश्य पदार्थ वोसरतां । अवघा आत्माचि तत्त्वता ।
नेहटून विचारें पहातां । दृश्य मुळींच नाहीं ॥ दा. ८।८।५५
दृश्य पाप वोसरलें । पुण्य परब्रह्म उरलें ।
अनन्य होतांचि जालें । नामातीत ॥ दा. १०।१०।५६ ॥

चाहि अभाव§ (wide-awake thoutlessness) यायोगें अंतर्मुख झालेल्या मनाचें चिदात्मस्वरूपांतच पर्यवसान होतें.

म्हटलें आहे—‘ यदात्मनश्चित्त्वदर्शनं तदेव तत्त्वदर्शनम् ’—आपल्या चित्स्वरूपाचें जें दर्शन, तेंच तत्त्वदर्शन म्हणजे ब्रह्मात्मदर्शन होय.

मानसं तु किं मार्गणे कृते ।
नैव मानसं मार्ग आर्जवान् ॥१७॥

अर्थ—मन म्हणजे काय याचा शोध करूं लागलें म्हणजे मन म्हणून कांहीं निराळें शिल्लकच राहत नाहीं (हेंच मनन म्हणजे मन न). **मनोनाशाचा हाच सरळ मार्ग होय.***

खुलासा—विचार किंवा शोध करणारा हा स्वतः मनाचें स्वरूप आहे. मन हें एक त्याचें (आत्मरवीचें) किरण आहे. विचारणेच्या समयीं त्या किरणाचा आत्म्यांत

---

§ निद्रेमाजिं जसा निवृत्त अससी जागेंपणीं हो तसा ।
आनंदांत मुरोनि विस्मृति न घे रक्षीं सुखात्मा ठसा ॥
जें जें पाहसि तें सुखात्मक असें येईल लक्षीं तुला ।
तूं आनंदसमुद्र विश्व लहरी जाणोनि घोटीं मुला ॥ ४८ ॥

—श्रीबांदकर महाराजकृत ‘स्वात्मतत्त्वामृतशतक. ’

* “ मन आपणाहूनि भिन्न देखणें । स्वयें मनाचा साक्षि होणें ॥
या नांव गा मन टाकणें । खूण जाणणें हेचि मुख्य ॥ ”

—श्रीरंगनाथी योगवासिष्ठ.

उपसंहार होतो, तेव्हां मन म्हणून कांहीं शिल्लक रहात नाहीं, असें भगवान श्रीरमण महर्षि सांगतात. मनाचा शोध करणें हाच मनोनाशाचा सरळ मार्ग होय.

वृत्तयस्त्वहंवृत्तिमाश्रिताः ।
वृत्तयो मनो विद्ध्यहं मनः ॥१८॥

अर्थ—सर्व वृत्ति (विचार किंवा मनांतील कल्पना) एका अहंवृत्तीवर अवलंबून आहेत. वृत्ति हेंच मन आणि मन म्हणजे अहंकार असें समजावें.

खुलासा—मनांतील सर्व वृत्ति एका अहंवृत्तीवर अवलंबून आहेत. अहंवृत्ति ह्मणजे 'मी मी' असें उठणारें स्फुरण. सर्व प्रकारच्या वृत्ति ह्या तन्मूलक म्ह. अहंवृत्तिमूलक आहेत. वृत्ति म्हणजेच मनोविकास. याकरितां मन म्हणजे ' अहं ' असें समजावें. ज्याअर्थीं वर सांगितल्याप्रमाणें एकंदर वृत्ति अहंवृत्तिमूलक आहेत, त्याअर्थीं वृत्तिरूप मन हें अहंवृत्तिरूप ['अहं मनः'] आहे असें तात्पर्य किंवा सिद्धान्त जाणावा.

अहमयं कुतो भवति चिन्वतः ।
अयि पतत्यहं निजविचारणम् ॥१९॥

अर्थ—हा मी (अहं) कोठून उद्भवतो याचा शोध करतां करतां, बाबांनो ! तो गळूनच पडतो. आत्मविचार तो हाच.

खुलासा—हा 'अहं' म्ह. अहंवृत्तिरूप अहंकार कुठून येतो असा विचार करतां करतां तो अहंकार नाहींसाच होतो. यालाच आत्मविचारणा अथवा आत्मशोधन (आपल्या स्वरूपाचा शोध) असें म्हणतात.

अहमि नाशभाज्यहमहंतया ।
स्फुरति हृत्स्वयं परमपूर्णसत् ॥२०॥

अर्थ—हा मनोमय एकदेशी अहंकार नाश पाव-ल्यावर शाश्वत व परमपूर्ण असा हृत्स्वरूप अहंकार अहमहमिकेनें (मी मी म्हणून) स्फुरण पावूं लागतो.

खुलासा—मनोमयवृत्तिरूप 'अहं' नाहींसा झाल्या-वर त्या ठिकाणीं दुसरा अखंड व पूर्ण असा हृत्स्वरूप* अहं 'मी मी' म्हणून स्फुरूं लागतो. या ठिकाणीं अशी एक शंका येईल कीं, एका 'अहं' चा नाश झाला असतां दुसरा 'अहं' कोठून व कसा उद्भवतो? याचें उत्तर असें कीं, अहंता ही व्यक्तित्वाहून भिन्न नाहीं. ती 'मनोगत' व 'आत्मगत' अशी दोन प्रकारची आहे. मनोगत अहंभाव असला कीं, त्या ठिकाणीं आत्मगत अहंभाव असत नाहीं. तो नाहींसा झाला कीं, आत्मगत अहंभाव उदय पावतो. म्हणून अपूर्ण व एकदेशी अहंचा

---

* "हृद्यहमित्यात्मतया नृत्यसि भोस्ते वदन्ति हृदयं नाम ॥"
—अरुणाचलपंचरत्नम् (२)

नाश झाला कीं त्या ठिकाणीं दुसरा शुद्ध व पूर्ण अहं स्फुरतो असें समजावें.

इदमहं पदाभिख्यमन्वहम् ।
अहमि लीनकेऽप्यलयसत्तया ॥२१॥

अर्थ--गौण [मनोगत] **'अहं' लीन झाला तरी मुख्य** [आत्मगत] **अहं हा कधींहि** [गाढ निद्रेंत सुद्धां] **लय पावत नसून सत्तारूपानें** [असणेपणानें] **सदैव स्फुरतच असतो म्हणून हा श्रेष्ठ आहे.**

खुलासा--जागृत अवस्थेमध्यें मी बोलतों, मी चालतों, मी खातों इत्यादिरूपानें जो 'अहं' वापरला जातो, तोच स्वप्नामध्येंहि असतो. परंतु गाढनिद्रेमध्यें हा [गौण] 'अहं' लीन झालेला असतो, तेव्हां मुख्य 'अहं' लीन होत नाहीं. कारण निद्रेंतून उठल्यानंतर 'मी सुखानें निजलों होतों' असा सुखाचा अनुभव तो सांगतो. अनुभव घेतल्यावांचून त्या सुखाची आठवण कशी होणार? याकरितां त्या सुखस्थितीचा अनुभव घेणारा अहं [आत्मा-आपण] हा नित्यस्फुरद्रूप आहे असें समजावें. गौण अहंकार नष्ट झाला तरी मुख्य अहंकार केव्हांहि नष्ट होत नाहीं. तो मी मी ह्मणून सदैव स्फुरतच असतो. तोच आत्मा म्ह. आपण होय हें निश्चित समजावें.

विग्रहेन्द्रियप्राणधीतमः ।
नाहमेकसत्तज्जडं ह्यसत् ॥ २२ ॥

अर्थ — आत्मा (आपण) हा, शरीर-इंद्रियें-प्राण-मन-बुद्धि इत्यादि (पंचकोश) रूपानें असणारें तम म्हणजे अज्ञान नव्हे. तो एकच सत्-सत्स्वरूप आहे आणि शरीरादि सर्व जड व असत् आहे.

खुलासा — आत्म्याचें म्हणजे आपलें अस्तित्व सिद्ध करायाला दुसऱ्या कोणत्याही प्रमाणाची अथवा इंद्रियें प्राण, मन, बुद्धि, सूर्य, चंद्र, दीप इत्यादि अन्य साधनांची गरज नाहीं. म्हणून त्याला ‘ स्वयंप्रकाश ’ म्हणतात. इतर वस्तूंचें अस्तित्व सिद्ध करण्याला मात्र आत्म्याची गरज आहे, म्हणून त्यांना ‘ जड ’ किंवा ‘ परप्रकाश्य ’ म्हणतात. जें जड तें ‘ चिद्रूप ’ आत्मा कसें होईल? तसेंच जें नाहीं (असत्) तें ‘ सद्रूप ’ आत्मा कसें होईल?

सत्वभासिका चित्क्ववेतरा ।
सत्तयाहि चिच्चित्तयाह्यहम् ॥२३॥

अर्थ—सद्वस्तूचें-आत्म्याचें ज्ञान करून देणारी चित् अशी दुसरी कोणती वस्तु आहे? जें सत् आहे, तेंच चित् आहे आणि जें चित् (चैतन्य) आहे तेंच अहं (आपण-आत्मा) होय.

खुलासा—ही सद्वस्तु कशाच्या योगानें भासते? सताला भासविणारी चित् दुसरी आहे काय? दुसरी असणें शक्य नाहीं. याचें कारण, सत्पणानेंच चित् होतें. अर्थात् जें सत् तेंच स्वभावतः चित् म्हणजे चिन्मय होय. आणि त्यामुळेंच चित् हेंच स्वभावतः अहं म्हणजे आपण—आत्मा होय. सत्—ता, चित्—ता व अहं—ता हीं सर्व एकरूप आहेत.

ईशजीवयोर्वेषधीभिदा ।
सत्स्वभावतो वस्तुकेवलम् ॥ २४ ॥

अर्थ—ईश्वर आणि जीव हे वेष (शरीर) आणि धी (बुद्धि) यांच्या भेदानें निराळे दिसतात. पण त्यांच्या सत्स्वभावाकडे—सत्तारूपी मूळ धर्माकडे पाहिलें असतां ते केवळ एकच वस्तु (सद्वस्तु) होत.

खुलासा—ईश्वर व जीव हें 'वेषतः' म्हणजे आकारभेदामुळें (ब्रम्हांडपिंडोपाधीमुळें) व 'बुद्धितः' म्हणजे सर्वज्ञत्व—अल्पज्ञत्व भेदामुळें भिन्न भासतात. तथापि ती वस्तु एकच आहे. हें कसें? तर सत्स्वभावामुळें म्हणजे दोघांमध्येंहि सत्तारूपधर्म समान आहे म्हणून जें कालत्रयीं असतें तेंच 'सत्' शब्दानें निर्देशिलें जातें.

वेषहानतः स्वात्मदर्शनम् ।
ईशदर्शनं स्वात्मरूपतः ॥२५॥

अर्थ—जीवानें वेषाचा (पिंडोपाधीचा) **त्याग केला म्हणजे त्याला स्वात्मदर्शन होतें व स्वात्मरूपानें ईशदर्शन होतें.**

खुलासा—पिंडोपाधि ह्मणजे देहभावना टाकिली असतां आत्मदर्शन होतें. हाच अपरोक्षानुभव. स्वात्मदर्शनानें हें ईशदर्शन कसें होऊं शकेल ? तर ईश्वरच आत्म्याचें रूप आहे म्हणून तेंच ईशदर्शन होय. शुद्ध स्वात्मदर्शनाहून ईशदर्शन निराळें नाहीं असें तात्पर्य. पिंडोपाधि सोडून दिल्यानंतर आत्मा अपरिच्छिन्न होतो. अपरिच्छिन्नत्वामुळें त्याचा (आत्म्याचा) अनुभव परिच्छिन्न (एकदेशी) होत नाहीं, तर तो पूर्णत्वाचाच होतो असें समजावें.

आत्मसंस्थितिः स्वात्मदर्शनम् ॥
आत्मनिर्द्वयादात्मनिष्ठता ॥२६॥

अर्थ—स्वात्मदर्शन म्हणजे आत्मसंस्थिति; आणि ही आत्मसंस्थिति (आत्मनिष्ठा) **सर्व द्वैतभाव निघून गेल्यावरच प्राप्त होते.**

खुलासा—पूर्व श्लोकांतील ' दर्शन ' या पदानें त्रिपुटीचा (दृश्य–द्रष्टा–दर्शन यांचा) संभव होतो अशी

शंका येईल; तिचें निरसन असें कीं, आत्मसंस्थिति म्हणजे आत्मनिष्ठाच–आत्मदर्शन होय. तेथें त्रिपुटीला वावच नाहीं. आत्मनिष्ठेमध्यें द्वैतसंपर्काचा लेशहि नसतो. जर द्वैत भासेल तर ती तन्मय निष्ठा कशी संभवेल? (आपलेपणाचें आपणाला जें भान आहे तें अद्वैतणानेंच आहे; इतर वस्तूंच्या भानाप्रमाणें त्रिपुटीयुक्त नाहीं.)

ज्ञानवर्जिताऽज्ञानहीनचित् ।
ज्ञानमस्ति किं ज्ञातुमन्तरम् ॥२७॥

अर्थ—ज्ञानवर्जित आणि अज्ञानरहित अशी जी 'चित्' (ज्ञप्ति) तेंच खरें ज्ञान होय. या ज्ञानांत जाणण्याचें असें दुसरें कांहीं असतें काय? मुळींच नाहीं.

खुलासा—ज्ञानवर्जित व अज्ञानरहित असें जें ज्ञान असें म्हटलें याचा अर्थ असा कीं, आपणाहून इतर वस्तूंचें जें ज्ञान किंवा इतर वस्तूंचें अज्ञान या दोन्हींला 'वृत्तिज्ञान' असें म्हणतात. हें वृत्तिज्ञान ज्या ज्ञानावर स्फुरतें तेंच खरें ज्ञान होय. या वृत्ति–अधिष्ठानरूप ज्ञानामध्यें अर्थात् ज्ञानाज्ञानविरहित ज्ञानामध्यें जाणण्याचें दुसरें असें कांहीं नसतेंच, असें तात्पर्य.

किं स्वरूपनित्यात्मदर्शने ।
अव्ययाऽभवाऽऽपूर्णचित्सुखम् ॥

अर्थ—आपलें स्वरूप कसें आहे याचा शोध लागला असतां तें स्व–रूप अव्यय व अभव (अकृत्रिम) आणि परिपूर्ण असें चित्सुखच आहे असें अनुभवास येतें.

खुलासा—मागें वर्णिल्याप्रमाणें स्वस्वरूपाचा शोध (मी कोण आहे असा विचार) करितां करितां स्वात्मदर्शन झालें–स्वरूपनिष्ठा सिद्ध झाली कीं, तें स्व–रूप अविनाशी सहज व अखंड (परिपूर्ण) असें चित्सुखच (सत्–चित्–आनंदरूपच) आहे असें अनुभवाला येतें. (चित्सुख म्हणजे शुद्ध वृत्तिगम्य सुखदुःखरहित केवळ सुख).

बन्धमुक्त्यतीतं परं सुखम् ।
विन्दतीह जीवस्तु दैविकः ॥२९॥

अर्थ—बंधमुक्तिअतीत असें परमसुख दैविक जीवाला प्राप्त होतें.

खुलासा—दैविक ह्मणजे देहात्मभावरहित आत्मनिष्ठ अशा पुरुषाला बंधमुक्तिअतीत परमसुखाचा लाभ होतो. बंधस्फूर्तीच्या अपेक्षेनें मोक्षस्फूर्ति असते. म्हणून अज्ञानी लोकांच्या दृष्टीनें त्या स्वरूपावस्थेला मुक्ति असें म्हटलें जातें. पण अनुभवी पुरुषाला बंधस्फूर्ति नसल्यामुळें मुक्तिस्फूर्तीहि नसते. त्याची ती अवस्था बंधमोक्षापलीकडील समजावी.

अहमपेतकं निजविभानकम् ।
महदिदं तपो रमणवागियम् ॥३०॥

अर्थ--अहंकाराचा निरास करणारें असें आत्मस्वरूपाचें जें भान, तेंच महत्तप होय. याप्रमाणें भगवान श्रीरमण महर्षींची वाणी उपदेश करीत आहे.

खुलासा—मनोगत गौण*अहंकाररहित निजस्वरूपाचें जें स्पष्ट भान अथवा स्फुरण हेंच परमतप§ होय. असा भगवान श्रीरमणमहर्षींच्या या उपदेशसाराचा सारांश आहे.

भगवान् श्रीरमणमहर्षींचा आणि त्यांच्या वाणीचा अखंड जयजयकार असो.

---

* " कां हृदयीं चिंतिता चित्स्वरूप । हें परम तप तपांमाजीं " ॥
" अहंममता समूळ तुटे । यांसचि नांव तप गोमटें " ॥

—श्रीएकनाथमहाराज

§ " योगतप याचि नांवें । गलित व्हावें अभिमानें " ॥

—श्रीतुकाराममहाराज

पुरवणी.

भगवान श्रीरमणमहर्षींनीं स्वतः संस्कृतांत एक श्लोक रचिलेला आहे. त्यांत त्यांनीं आपल्या शिकवणीचें सार थोडक्यांत सांगितलेलें आहे. तो श्लोक असाः—

देहं मृण्मयवज्जडात्मकमहंबुद्धिर्न तस्यास्त्यतो
नाहं तत्तदभावसुप्तिसमये सिद्धात्मसद्भावतः ।
कोऽहं भावयुतः कुतो वरधिया दृष्ट्वात्मनिष्ठात्मनां
सोऽहं स्फूर्तितयाऽरुणाचलशिवः पूर्णो विभाति स्वयम् ॥

अर्थ—देह मातीच्या ढेकळाप्रमाणें जड आहे. त्याला अहंबुद्धि (अहंभाव) नाहीं. म्हणून देह मी नव्हे. पुनः देह (देहभाव) अगदीं नसतो अशा गाढ निद्रेच्या समयीं आपण असतों हें सिद्धच आहे. अहंबुद्धि असलेला असा हा कोण आहे व तो कोठून आला असा शुद्ध मनानें–सूक्ष्म बुद्धीनें विचार करून ज्यांनीं आत्मदर्शन घेतलें म्हणजे जे आत्मनिष्ठ झाले त्यांच्या हृदयांत अरुणाचल शिवभगवान ‘सोऽहं’ (तो मी) या स्फूर्तीनें पूर्णपणें प्रकाशित असतो.

या श्लोकांतील चार चरणांतील पहिले शब्द म्हणजे **'देहं नाहं कोऽहं सोऽहं'** हे घेतले म्हणजे त्यांत श्रीभगवान रमणमहर्षींची सर्व शिकवण आलेली आहे. ती अशी:— देहं नाहं म्हणजे देह मी नव्हे, तर कोऽहं (मी कोण)? सोऽहं (तो परमात्मा मी आहे). देहात्मभावना सोडून उलट पहा—अंतर्मुख व्हा म्हणजे सोऽहंचा (जीव–शिव–ऐक्याचा) अनुभव येईल.*

---

* श्रीकृष्णभट्ट बांदकर यांचें याच अर्थाचें खालील पद पहावें:—

प्रभु अखंड सुखमय रामचि हा ॥ देहमीपण सांडुनि उलट पहा ॥ ध्रु० ॥ १ ॥ दिसतो जो तुज दृश्यपसारा । मिथ्या मृगजळ जाण, होशिल सुजाण, वधुनि शत्रूंसि सहा ॥ प्रभु० ॥ २ ॥ अंतरदृष्टी करुनि निरीक्षी । खेळे ज्यावरि प्राण, लक्षिं त्या आण, न कल्पित उगिच रहा ॥ प्रभु० ॥ ३ ॥ राम विष्णु कृष्ण जगन्नाथ– । स्मरणें करि कल्याण, सख्या तुझि आण, ज्यासि प्रिय भक्त महा ॥ प्रभु० ४ ॥

ॐ

श्रीरमणप्रस्थानत्रयी

भाग ३ रा.

श्री रमणगीता.

स्वरूपसंस्थितिस्स्याच्चेत् सहजा कुण्डिनर्षभ ।
सा मुक्तिः सा परा निष्ठा स साक्षात्कार ईरितः ॥

—रमणगीता अ. १५, श्लोक १४

श्रीरमणगीता-प्रस्तावना.

सर्व आध्यामिक ग्रंथांमध्यें उपनिषदें श्रेष्ठ आहेत, पण श्रीमद्भगवद्गीता हा ग्रंथ उपनिषदांचें सार असल्यामुळें त्याची योग्यता व उपयुक्तता उपनिषदांहून विशेष वाढली असें म्हणण्यास हरकत नाहीं. भ. गीतेवर जितक्या कांहीं टीका, भाष्यें व इतर उपग्रंथ अनेक भाषांत निर्माण झाले आहेत, तितके दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथावर झाले नाहींत. गोरखपूरच्या 'कल्याण' मासिकाच्या १९२९ च्या विशेषांकांत [गीतांकांत] शेवटीं गीताग्रंथसूचि दिलेली आहे. त्या ठिकाणीं स्वदेशी व विदेशी भाषांत गीतेवर लिहिलेल्या अजमासें सातशें ग्रंथांची यादी ग्रंथकारांच्या नांवगांवांसहित दिलेली आहे. त्यानंतर आतांपर्यंत म्हणजे दहा वर्षांत शेंदोनशें ग्रंथ गीतेवर लिहिले गेले असावेत असा अंदाज आहे. यावरून गीताग्रंथ हा फक्त हिंदूंचा किंवा आर्यांचा आहे असें म्हणण्यापेक्षां तो जगाचा किंवा विश्वाचा धार्मिक ग्रंथ आहे असें म्हणणें अधिक शोभेल.

याप्रमाणें गीताग्रंथ श्रेष्ठ व जगद्वंद्य ठरल्यावर त्या नमुन्याबरहुकुम दुसऱ्या अनेक गीता रचण्यांत आल्या व प्रसिद्धही झाल्या. त्या बहुतेकांना माहीत असल्यामुळें त्यांचीं

नांवें येथें देण्याचें कारण नाहीं. त्यानंतर अलीकडे १९२२ सालीं 'श्रीरमणगीता' म्हणून एक छोटासा ग्रंथ संस्कृत भाषेंत प्रसिद्ध झाला होता. त्याची सुधारलेली दुसरी आवृत्ति १९३७ सालीं प्रसिद्ध झालेली आमच्या पाहण्यांत आली, ती फार गोड वाटल्यामुळें तिचा अनुवाद आज महाराष्ट्र भाषेंत आम्ही प्रसिद्ध करीत आहों. या ग्रंथाविषयीं थोडीशी माहिती खालीं देण्यांत येत आहे.

'श्रीरमणगीता' ही हल्लीं विद्यमान असलेल्या व अलीकडे फार प्रसिद्धीस आलेल्या अरुणाचलवासी भगवान श्रीरमण-महर्षींचा उपदेशरूप ग्रंथ आहे. या ग्रंथांत कोणते विषय आलेले आहेत हें त्याची अनुक्रमणिका अथवा पुढील पानें चाळून पाहिल्याबरोबर रसिक व चाणाक्ष वाचकांना सहज कळून येणार असल्यामुळें त्याविषयीं कांहीं चर्चा करण्याचें कारण नाहीं. येथें इतकें सांगितलें म्हणजे पुरे कीं, हा महान् योगशास्त्राचा सूत्रप्राय ग्रंथ आहे. मंत्र, राज, ज्ञान व भक्ति इत्यादि योगांचीं रहस्यें यांत थोडक्यांत, मुद्देसूद रीतीनें आणि मोठ्या खुबीनें सांगितलेलीं आहेत.

श्रीमद्भगवद्गीतेमध्यें भगवान श्रीकृष्ण हे उपदेष्टे, अर्जुन प्रश्न करणारा आणि श्रीकृष्णद्वैपायन (व्यास) हे या गीतोपदेशाचे निबंधकार; त्याप्रमाणें या ग्रंथांत [श्रीरमण-गीतेंत] भगवान **श्रीरमण** हे उपदेष्टे, पण प्रश्न करणारा

अर्जुनाप्रमाणें एकटाच नसून येथें अनेकांनीं प्रश्न केलेले आहेत. त्यांचा नामनिर्देश ग्रंथांत त्या त्या ठिकाणीं आलेलाच आहे. या उपदेशाचा निबंधकार वासिष्ठ गणपतिमुनि हा असून तोहि प्रश्नकर्त्यांपैकीं एक आहे. श्रीमद्भगवद्गीता म्हणजे श्रीकृष्णार्जुनसंवाद हा 'ग्रंथाकार' करून श्रीव्यासांनीं 'विश्वासी थोर उपकार केला.' त्याप्रमाणें कांहीं अंशीं गणपतिमुनींनींही श्रीरमणगीता लिहून आम्हां सर्वांवर फार उपकार केला आहे यांत संशय नाहीं.

श्रीमद्भगवद्गीता ही कुरुक्षेत्रावर अर्जुनास युद्धाचे आरंभीं सांगण्यांत आली. त्याप्रमाणें ही रमणगीता एकाच वेळीं सांगितलेली नसून त्यांतील प्रश्नोत्तरें निरनिराळ्या वेळीं केव्हां झालीं हें बहुतेक अध्यायांत तारखेनिशीं सांगण्यांत आलें आहे. प्रश्नांच्या व उत्तरांच्या वेळीं निबंधकार गणपतिमुनि प्रत्यक्ष हजर होते व त्यांनीं हा संवाद त्यावेळीं श्लोकरूपानें तयार करून ठेवला होता असें दिसतें.

प्रश्नकर्त्यांचीं नांवें ग्रंथकारानें ठिकठिकाणीं दिलेलींच आहेत. त्यानें स्वतः केलेले प्रश्नही तेथें तेथें तसा उल्लेख करून मांडलेले आहेत. द्वितीय अध्यायांतील दुसरा अत्यंत महत्वाचा श्लोक ('हृदयकुहरमध्ये' हा) भगवान रमणमहर्षींनीं स्वयंस्फूर्तीनें स्वतःच रचिलेला आहे.

ग्रंथकारानें या श्लोकाचा विषयवार खुलासा या अध्यायांतील बाकीच्या श्लोकांत केलेला आहे. पांचव्या व सहाव्या अध्यायांत भगवानांचा स्वतंत्र उपदेश आहे. इतर अध्यायांत प्रश्नानुरूप भगवानांचीं उत्तरें आहेत.

भगवान व त्यांचे शिष्य निबंधकार यांविषयीं थोडी माहिती येथें देत आहों.

श्रीरमणभगवानांनीं कोणत्याहि शास्त्राचा प्रत्यक्ष अभ्यास केलेला नाहीं. तेव्हां ते जो कांहीं उपदेश करितात तो शास्त्रग्रंथ किंवा अनुमानादि प्रमाणें यांना अनुसरून करीत नाहींत. स्वतः जो कांहीं अनुभव त्यांना प्राप्त झालेला आहे किंवा त्यांच्या अंतर्दृष्टीला जें कांहीं दिसतें त्यांवरूनच ते उपदेश करीत असतात. द्वैत, विशिष्टाद्वैत व अद्वैत या तीन्ही मतांचे बहुतेक लोक त्यांना गुरुस्थानीं मानतात व भजतात. त्यांचे शिष्य त्यांना **गुह** म्हणजे **कार्तिकस्वामी** यांचा अवतार मानतात. तदनुसारच या ग्रंथांत व इतरत्र त्यांचे शिष्य व ग्रंथकार श्री. गणपतिमुनि यांनीं त्यांची स्तुति केलेली आहे.

ग्रंथकार गणपतिमुनि हे वासिष्ठ गोत्री असून त्यांचा जन्म आंध्र देशांत बोब्बिलीच्याजवळ कुसुदोपल (कलुवराय) गांवीं बहुधान्य संवत्सर, वृश्चिकमास, मघा नक्षत्रावर (इ. स. १८७८ सालीं) झाला. त्यांच्या

पित्याचें नांव नरसिंहशास्त्री. लहानपणापासून यांची विद्वत्ता चमकूं लागली. पुढें हे मोठे विद्वान् शास्त्री व पंडित म्हणून प्रसिद्ध झाले. यांना 'काव्यकंठ' अशी बहुमानाची पदवी मिळाली होती. यांना इतिहास, वेद, उपनिषदें व मंत्रशास्त्र यांचें चांगलें ज्ञान होतें. प्लवंग संवत्सरांत (१९०७ सालीं) यांचेवर श्रीरमण भगवानांचा अनुग्रह झाल्यावर यांनीं त्यांचें शिष्यत्व अंगीकारिलें आणि लगेच त्यांचेविषयीं 'श्रीरमणस्तोत्र' रचिलें. श्रीभगवानांचें पूर्वीचें नांव वेंकटरमण असें होतें. गणपतिमुनींनीं त्यांना स्तोत्रांत 'रमणभगवान' असें संबोधल्यावरून याच नांवानें सर्व लोक भगवानाला ओळखूं लागले. असो. असा हा महाविद्वान् ता. २५ माहे जुलई १९३६ रोजीं खरगपुर येथील निमपुर आश्रमांत समाधिस्थ झाला.

जिज्ञासु व साधक पुरुषांना या छोट्या ग्रंथाचा बराच फायदा होईल अशी आशा प्रदर्शित करून ही प्रस्तावना पुरी करितों.

ॐ तत्सद् ब्रह्मार्पणमस्तु ।

वासुदेवाश्रम, विजयनगर ठळकवाडी, बळगांव दीपावली, शक १८६१.	रमणगीताभक्त संतसेवक **नागेश वासुदेव गुणाजी**

श्रीरमणगीता.

प्रथमोऽध्यायः ।

(उपासनप्राधान्यनिरूपणम् ।)

महर्षिं रमणं नत्वा कार्तिकेयं नराकृतिम् ।
मतं तस्य प्रसन्नेन ग्रंथेनोपनिबध्यते ॥ १ ॥

नराकृति कार्तिकस्वामी अशा रमणमहर्षींना नमन करून त्यांच्या मताचा या प्रसन्न ग्रंथांत अनुवाद केला जात आहे.

ईशपुत्रशके राम—भूमिनन्दधरामिते ।
एकोनत्रिंशद्दिवसे द्वादशे मासि शीतले ॥ २ ॥

उपविष्टेषु सर्वेषु शिष्येषु नियतात्मसु ।
भगवन्तमृषिं सोऽहमपृच्छं निर्णयाप्तये ॥ ३ ॥

इ. स. १९१३ च्या शीतल अशा दिसेंबर महिन्याच्या २९ तारखेला सर्व संयमी शिष्य बसले असतांना (कांहीं प्रश्नांचा) निर्णय करून घेण्यासाठीं मीं (गणपति मुनीनें) भगवान् रमणमहर्षींना विचारलें:—

प्रथमः प्रश्नः । (प्रश्न १ ला)

सत्यासत्यविवेकेन मुच्यते केवलेन किम् ।
उताहो बन्धहानाय विद्यते साधनान्तरम् ॥ ४ ॥

केवल सत्यासत्यविवेकानें मोक्ष मिळतो काय ? किंवा बंधनाशाचें दुसरें कांहीं साधन आहे ?

द्वितीयः प्रश्नः । (प्रश्न २ रा)

किमलं शास्त्रचर्चैव जिज्ञासूनां विमुक्तये ।
यथा गुरूपदेशं किमुपासनमपेक्षते ॥ ५ ॥

जिज्ञासूंना केवल शास्त्रचर्चा ही मुक्तीसाठीं पुरी होते, कीं गुरूपदेशाप्रमाणें कांहीं उपासनेची अवश्यकता आहे ?

तृतीयः प्रश्नः । (प्रश्न ३ रा)

स्थितप्रज्ञः स्थितप्रज्ञमात्मानं किं समर्थयेत् ।
विदित्वा परिपूर्णत्वं ज्ञानस्योपरतेरुत ॥ ६ ॥

स्थितप्रज्ञ पुरुष हा स्थितप्रज्ञ आत्म्याला कसें जाणतो ? पूर्णत्वाचा अनुभव घेऊन कीं दृश्य ज्ञानाचा निरास करून ?

चतुर्थः प्रश्नः । (प्रश्न ४ था)

ज्ञानिनं केन लिंगेन ज्ञातुं शक्ष्यन्ति कोविदाः ।

पंचमः प्रश्नः । (प्रश्न ५ वा)

ज्ञानायैव समाधिः किं कामायाप्युत कल्पते ॥७॥

विद्वान लोक कोणत्या चिन्हानें ज्ञान्याला ओळखूं

शकतात? समाधीचा उपयोग फक्त ज्ञानाकरितांच, कीं ऐहिक कामनेकरितां सुद्धां होतो?

षष्ठः प्रश्नः। (प्रश्न ६ वा)

कामेन योगमभ्यस्य स्थितप्रज्ञो भवेद्यदि।
स कामोऽमुष्य साफल्यमधिगच्छति वा न वा ॥८॥

कामनेच्या निमित्तानें योगाचा अभ्यास करून कोणी स्थितप्रज्ञ (ज्ञानी) झाला तर त्या पुरुषाची ती कामना सफल होते किंवा नाहीं?

एवं मम गुरुः प्रश्नानाकर्ण्य करुणानिधिः।
अब्रवीत्संशयच्छेदी रमणो भगवानृषिः॥ ९ ॥

याप्रमाणें माझे प्रश्न ऐकून संशयांचें छेदन करणारे सद्गुरु भगवान् रमणमहर्षि म्हणाले:—

प्रथमप्रश्नस्योत्तरम्। (पहिल्या प्रश्नाचें उत्तर)

मोचयेत्सकलान्बन्धानात्मनिष्ठैव केवलम्।
सत्यासत्यविवेकं तु प्राहुर्वैराग्यसाधनम् ॥ १० ॥

केवल आत्मनिष्ठेनेंच सर्व बंधांचा नाश होतो. सत्यासत्यविवेक हें वैराग्याचें साधन म्हटलें जातें.

सदा तिष्ठति गंभीरो ज्ञानी केवलमात्मनि।
नासत्यं चिन्तयेद्विश्वं न वा स्वस्य तदन्यताम्॥

गंभीर (निष्ठावंत) ज्ञानी हा केवळ आत्मस्वरूपांतच निरंतर स्थित असतो. तो विश्वाला असत्य मानीत नाहीं

(सद्रूपानें मानितो) किंवा तें आपणाहून निराळेंहि समजत नाहीं.

द्वितीयप्रश्नस्योत्तरम्। (दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर)

न संसिद्धिर्विजिज्ञासोः केवलं शास्त्रचर्चया।
उपासनं विना सिद्धिर्नैव स्यादिति निर्णयः॥१२॥

केवळ शास्त्रचर्चेनें आत्मजिज्ञासूला मोक्ष मिळत नाहीं. उपासनेवांचून सिद्धि केव्हांच नाहीं हें निश्चित समजावें.

अभ्यासकाले सहजां स्थितिं प्राहुरुपासनम्।
सिद्धिं स्थिरां यदा गच्छेत्सैव ज्ञानं तदोच्यते १३

अभ्यासाचे वेळीं जी सहजस्थिति प्राप्त होते तिला 'उपासना' म्हणतात. ही सहजस्थिति (सिद्धि) स्थिर झाली म्हणजे तिलाच 'ज्ञान' म्हणतात.

विषयान् संपरित्यज्य स्वस्वभावेन संस्थितिः।
ज्ञानज्वालाकृतिः प्रोक्ता सहजा स्थितिरात्मनः॥

विषयांचा त्याग करून स्वस्वरूपानें स्थिर राहणेची जी स्थिति ती ज्ञानज्वालारूपच आहे, तिलाच आत्म्याची 'सहजस्थिति' म्हणतात.

तृतीयप्रश्नस्योत्तरम्। (तिसऱ्या प्रश्नाचें उत्तर)

निर्वासनेन मौनेन स्थिरायां सहजस्थितौ।
ज्ञानी ज्ञानिनमात्मानं निस्संदेहः समर्थयेत् १५

निर्वासन मौनानें सहजस्थिति स्थिरावली म्हणजे ज्ञानी आपल्या आत्मस्वरूपाला साक्षात् करून घेतो.

चतुर्थप्रश्नस्योत्तरम् । (चौथ्या प्रश्नाचें उत्तर)—

सर्वभूतसमत्वेन लिंगेन ज्ञानमूह्यताम् ।

सर्वभूतसमत्व या चिन्हानें ज्ञानी ओळखिला जातो.

पञ्चम प्रश्नस्योत्तरम् । (पांचव्या प्रश्नाचें उत्तर)—

कामारब्धस्समाधिस्तु कामं फलति निश्चितम् ॥

कामनेच्या निमित्तानें सुरू केलेल्या समाधींत कामनेचें फळ मिळतें हें निश्चित समजावें.

षष्ठप्रश्नस्योत्तरम् । (सहाव्या प्रश्नाचें उत्तर) —

कामेन योगमभ्यस्य स्थितप्रज्ञो भवेद्यदि ।
स कामोऽमुष्य साफल्यं गच्छन्नपि न हर्षयेत् ॥

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबन्धे
‘ उपासनप्राधान्यनिरूपणं ’ नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

कामनेसाठीं योगाचा अभ्यास करून कोणी स्थितप्रज्ञ झाला आणि त्याची कामना सफल झाली तरी त्यानें हर्ष मानतां कामा नये.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील रमणशिष्य वासिष्ठ गणपतिमुनीच्या अनुवादांतील उपासनप्राधान्यनिरूपणनामक पहिला अध्याय समाप्त.

द्वितीयोऽध्यायः ।

मार्गत्रयकथनम् ।

ईशपुत्रशके बाणभूमिनन्दधरामिते ।
चातुर्मास्ये जगौ सारं संगृह्य भगवानृषिः ॥१॥

इ. स. १९१५ च्या चातुर्मास्यांत भगवान रमण महर्षींनीं संक्षेपानें आपल्या शिकवणीचें सार सांगितलें.

हृदयकुहरमध्ये केवलं ब्रह्ममात्रं
ह्यहमहमिति साक्षादात्मरूपेण भाति ।
हृदि विश मनसा स्वं चिन्वता मज्जता वा
पवनचलनरोधादात्मनिष्ठो भव त्वम् ॥२॥

हृदयगुहेमध्यें प्रत्यक्ष ब्रह्म हेंच 'मी मी' म्हणून आत्मरूपानें स्फुरत असतें. एकाग्र मनानें त्या आपल्या आत्म्याचा शोध करीत, किंवा बुडी मारीत तूं हृदयांत प्रवेश कर; अथवा प्राणगतिरोधनानें आत्मनिष्ठ हो.

श्लोकं भगवतो वक्त्रान्महर्षेरिममुद्गतम् ।
श्रुत्यन्तसारं यो वेद संशयो नास्य जातुचित् ॥३॥

वरील (द्वितीय) श्लोक भगवानाच्या मुखांतून निघाला. हा वेदान्ताचा सारभूत असा श्लोक ज्याला समजला, त्याला आत्मज्ञानाबद्दलचा कसलाहि संशय उरणार नाहीं.

अत्र श्लोके भगवता पूर्वार्धे स्थानमीरितम्।
शारीरकस्य दृश्येऽस्मिञ्छरीरे पांचभौतिके ॥४॥

त्या श्लोकाच्या पूर्वार्धांत भगवानांनीं या पंचभूतात्मक दृश्य शरीरांत जीवात्म्याचें स्थान सांगितलें आहे.

तत्रैव लक्षणं चोक्तं द्वैतमीशा च वारितम्।
उक्तं चाप्यपरोक्षत्वं नानालिंगनिबर्हणम् ॥५॥

तसेंच तेथें त्याचें (आत्म्याचें) लक्षणहि सांगून त्यांनीं जीवशिवाच्या द्वैताचें निवारण केलें, आणि नाना तर्क-अनुमानादिकांची अपेक्षा न ठेवितां अपरोक्षत्व प्रतिपादिलें.

उपदेशो द्वितीयार्धे शिष्याभ्यासकृते कृतः।
त्रेधाभिन्नेन मार्गेण तत्त्वादैक्यं समीयुषा ॥६॥

श्लोकाच्या उत्तरार्धांत शिष्याच्या अभ्यासासाठीं वरून भिन्न दिसणाऱ्या पण वस्तुतः एकच (अभिन्न) असणाऱ्या तीन मार्गांचा उपदेश केला आहे. (ते तीन मार्ग कोणते हें पुढील श्लोकांत सांगितले आहेत.)—

उपायो मार्गणाभिख्यः प्रथमः संप्रकीर्तितः।
द्वितीयो मज्जनाभिख्यः प्राणरोधस्तृतीयकः ॥७॥

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबन्धे
'मार्गत्रयकथनं' नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

पहिला **‘मार्गण’** (विचार किंवा शोध) नांवाचा, दुसरा **‘मज्जन’** (बुडी मारणें अथवा लीन होणें) नांवाचा, आणि तिसरा **‘प्राणरोध’** नांवाचा उपाय सांगितला.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील
रमणशिष्य वासिष्ठ गणपतिमुनीच्या
अनुवादांतील मार्गत्रयकथननामक
दुसरा अध्याय समाप्त.

तृतीयोऽध्यायः ।

मुख्यकर्तव्यनिरूपणम् ।

दैवरातस्य संवादमाचार्यरमणस्य च ।
निबध्नीमस्तृतीयेऽस्मिन्नध्याये विदुषां मुदे ॥ १ ॥

दैवरात आणि आचार्य रमण यांचा संवाद विद्वानांच्या संतोषासाठीं या तिसऱ्या अध्यायांत देत आहोंत.

दैवरात उवाच— (दैवरात म्हणाला) —

किं कर्तव्यं मनुष्यस्य प्रधानमिह संसृतौ ।
एकं निर्धार्य भगवाँस्तन्मे व्याख्यातुमर्हति ॥२॥

या संसारांत मनुष्याचें प्रधान कर्तव्य कोणतें? त्या एका कर्तव्याचा निर्णय करून भगवानांनीं मला सांगावें.

भगवानुवाच— (भगवान् म्हणाले) —

स्वस्य स्वरूपं विज्ञेयं प्रधानं महदिच्छता ।
प्रतिष्ठा यत्र सर्वेषां फलानामुत कर्मणाम् ॥ ३ ॥

महत्प्रधानकर्तव्याची इच्छा करणाऱ्यानें आपलें स्वरूप जाणून घ्यावें. त्यांतच सर्व कर्मफळांची प्रतिष्ठा म्हणजे पर्यवसान आहे.

दैवरात उवाच— (दैवरात म्हणाला)—

स्वस्य स्वरूपविज्ञाने साधनं किं समासतः ।
सिध्येत्केन प्रयत्नेन प्रत्यग्दृष्टिर्महीयसी ॥४॥

आपलें स्वरूप जाणण्याचें थोडक्यांत म्हणजे सोपें साधन कोणतें? कोणत्या प्रयत्नानें श्रेष्ठ 'प्रत्यग्दृष्टि' (प्रत्यगात्मदर्शन) साध्य होईल?

भगवानुवाच— (भगवान् म्हणाले)—

विषयेभ्यः परावृत्य वृत्तीः सर्वाः प्रयत्नतः ।
विमर्शे केवलं तिष्ठेदचले निरुपाधिके ॥ ५ ॥

प्रयत्नानें सर्व वृत्ति विषयांपासून परावृत्त करून अचल व निरुपाधिक अशा आत्मस्वरूपविचारांत स्थिर रहावें.

स्वस्य स्वरूपविज्ञाने साधनं तत्समासतः ।
सिध्येत्तेनैव यत्नेन प्रत्यग्दृष्टिर्महीयसी ॥ ६ ॥

स्वस्वरूपसाक्षात्काराचें हेंच थोडक्यांत म्हणजे सर्वांत सोपें साधन आहे. याच यत्नानें म्हणजे अभ्यासानें श्रेष्ठ असें प्रत्यगात्मदर्शन होईल.

दैवरात उवाच— (दैवरात म्हणाला)—

यावत्सिद्धिर्भवेन्नृणां योगस्य मुनिकुंजर ।
तावन्तं नियमाः कालं किं यत्नमुपकुर्वते ॥ ७ ॥

हे मुनिश्रेष्ठा, साधकांना योगाची सिद्धि प्राप्त होईतों-पर्यंत नियमांची प्रयत्नाला मदत होते काय?

भगवानुवाच— (भगवान् म्हणाले)—

प्रयत्नमुपकुर्वन्ति नियमा युञ्जतां सताम् ।
सिद्धानां कृतकृत्यानां गलन्ति नियमास्स्वयम् ८

योगाचा अभ्यास करणाऱ्या सत्साधकांच्या प्रयत्नांला नियमांची नेहमीं मदत होत असते. कृतकृत्य झालेल्या सिद्धांचे नियम आपोआप गळून पडतात. (त्यांना नियमांची जरूरी रहात नाहीं.)

दैवरात उवाच— (दैवरात म्हणाला)—

केवलेन विमर्शेन स्थिरेण निरुपाधिना ।
यथा सिद्धिस्तथा मंत्रैर्जप्तैः सिद्धिर्भवेन्न वा ॥ ९ ॥

केवळ निरुपाधिक व स्थिर अशा विचारानें ('मार्गण'— अभ्यासानें) जशी सिद्धि होते, तशी मंत्रजपापासून होते कीं नाहीं ?

भगवानुवाच— (भगवान् म्हणाले)—

अचञ्चलेन मनसा मंत्रैर्जप्तैर्निरन्तरम् ।
सिद्धिः स्याच्छ्रद्धधनानां जप्तेन प्रणवेन वा ॥१०॥

अचंचल मनानें केलेल्या मंत्राच्या किंवा प्रणवाच्या निरन्तर जपानें श्रद्धावान लोकांना सिद्धि प्राप्त होते.

वृत्तिर्जपेन मंत्राणां शुद्धस्य प्रणवस्य वा ।
विषयेभ्यः परावृत्ता स्वस्वरूपात्मिका भवेत् ११

मंत्रांच्या किंवा शुद्ध प्रणवाच्या जपानें वृत्ति विषयां-
पासून परावृत्त होऊन स्वस्वरूपाकार होते.

ईशपुत्रशके शैलभूमिनन्दधरामिते।
सप्तमे सप्तमे सोऽयं संवादोऽभवदद्भुतः ॥ १२ ॥

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबंधे
'मुख्यकर्तव्यनिरूपणं' नाम
तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

हा अद्भुत संवाद ता. ७।७।१९१७ इसवी रोजीं झाला.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील
रमणशिष्य वासिष्ठगणपतिमुनीच्या
अनुवादांतील मुख्यकर्तव्यनिरूपण नामक
तृतीय अध्याय समाप्त.

चतुर्थोऽध्यायः ।

ज्ञानस्वरूपकथनम् ।

प्रथमः प्रश्नः । (पहिला प्रश्न)—

अहं ब्रह्मास्मीति वृत्तिः किं ज्ञानं मुनिकुंजर ।
उत ब्रह्माहमिति धीर्धीरहं सर्वमित्युत ॥ १ ॥

अथवा सकलं चैतद्ब्रह्मेति ज्ञानमुच्यते ।
अस्माद्वृत्तिचतुष्काद्वा किं तु ज्ञानं विलक्षणम् ॥२॥

हे मुनिश्रेष्ठा, ‘ अहंब्रह्मास्मि ’ (मी ब्रह्म आहे) ही वृत्ति म्हणजे ज्ञान काय ? किंवा ‘ ब्रह्माहमिति ’ (ब्रह्म मी आहे) ही वृत्ति अथवा ‘ अहं सर्वं ’ (मी सर्व आहे) ही वृत्ति म्हणजे ज्ञान ? अथवा ‘ सर्वं खल्विदं ब्रह्म ? ’ (हें सर्व कांहीं ब्रह्म आहे) या वृत्तीला ज्ञान म्हणतात ? किंवा या चार वृत्तींहून ज्ञान कांहीं निराळें आहे ?

अस्योत्तरम् । (याचें उत्तर)—

इमं मम गुरुः प्रश्नमन्तेवासिन आदरात् ।
आकर्ण्य रमणो वाक्यमुवाच भगवान्मुनिः ॥ ३ ॥

यांप्रमाणें शिष्याचा हा प्रश्न आदरानें ऐकून घेऊन माझे गुरु भगवान् रमणमुनि म्हणाले.—

वृत्तयो भावना एव सर्वा एता न संशयः ।
स्वरूपावस्थितिं शुद्धां ज्ञानमाहुर्मनीषिणः ॥ ४ ॥

सर्व वृत्ति ह्या निःसंशयपणें मनाच्या भावना होत आणि शुद्ध ‘ स्वरूपस्थिति ’ हीच पंडितांच्या मतें ज्ञान (अथवा साक्षात्कार) होय.

गुरोर्वचस्तदाकर्ण्य संशयच्छेदकारकम् ।
अपृच्छं पुनरेवाहमन्यं संशयमुद्गतम् ॥ ५ ॥

गुरूचें हें संशयच्छेदक वचन ऐकून माझ्या मनांत उठलेल्या दुसऱ्या एका संशयाबद्दल मी पुन्हां त्यांना विचारलें.

द्वितीयप्रश्नः । (दुसरा प्रश्न)—

वृत्तिव्याप्यं भवेद्ब्रह्म न वा नाथ तपस्विनाम् ।
इमं मे हृदि सञ्जातं संशयं छेत्तुमर्हसि ॥ ६ ॥
तमिमं प्रश्नमाकर्ण्य मित्रमंघ्रिजुषामृषिः ।
अभिषिच्य कटाक्षेण मामिदं वाक्यमब्रवीत् ॥ ७ ॥

हे तपस्वीनाथ, ब्रह्म हें वृत्तिव्याप्य आहे कीं नाहीं ? हा माझ्या हृदयांत उत्पन्न झालेला संशय आपण नाहींसा करावा. शरणागतांचा मित्र अशा त्या ऋषीनें हा प्रश्न ऐकून मजकडे कृपाकटाक्षानें न्याहाळून असें (पुढील) उत्तर दिलें.—

अस्योत्तरम् । (प्रश्नाचें उत्तर)—

स्वात्मभूतं यदि ब्रह्म ज्ञातुं वृत्तिः प्रवर्तते ।
स्वात्माकारा तदा भूत्वा न पृथक् प्रतितिष्ठति ॥८॥

अयं प्रागुक्त एवाब्दे सप्तमे त्वेकविंशके ।
अभवन्नौ मितग्रंथः संवादो रोमहर्षणः ॥ ९ ॥

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबंधे
' ज्ञानस्वरूपकथनं ' नाम
चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

स्वात्मभूत अशा ब्रम्हाला जाणण्यासाठीं जेव्हां वृत्ति प्रवृत्त होते, तेव्हां ती स्वात्माकार होऊन निराळेपणानें रहातच नाहीं. असा हा, रोमांच उत्पन्न करणारा आमचा छोटा संवाद ता० २१–७–१९१७ इसवी रोजीं झाला.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रम्हविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील
रमणशिष्य वासिष्ठगणपतिमुनीच्या अनुवादांतील
ज्ञानस्वरूपकथन नामक
चवथा अध्याय समाप्त.

पंचमोऽध्यायः ।

हृदयविद्या ।

प्रागुक्तेऽब्देऽष्टमे मासि नवमे दिवसे निशि ।
उपन्यसितवान् सम्यगुद्दिश्य हृदयं मुनिः ॥१॥

त्याच वर्षी (१९१७) आठव्या (आगष्ट) महिन्याच्या ९ तारखेस रात्रौ रमणमुनींनीं 'हृदया'संबंधीं चांगलें भाषण केलें.

निर्गच्छन्ति यतः सर्वा वृत्तयो देहधारिणाम् ।
हृदयं तत्समाख्यातं भावनाऽऽकृतिवर्णनम् ॥ २ ॥

मानवाच्या सर्व वृत्ति जेथून उगम पावतात, त्याला 'हृदय' असें म्हणतात. 'भावनारूप' (Symbolical) असें त्याचें सांकेतिक वर्णन करितां येईल.

अहंवृत्तिः समस्तानां वृत्तीनां मूलमुच्यते ।
निर्गच्छति यतोऽहंधीर्हृदयं तत्समासतः ॥३॥

अहंवृत्ति ही सकल वृत्तींचें मूळ आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ही अहंवृत्ति जेथून उठते तें 'हृदय' असें समजावें.

हृदयस्य यदि स्थानं भवेच्चक्रमनाहतम् ।
मूलाधारं समारभ्य योगस्योपक्रमो कुतः ॥४॥

अनाहतचक्र हें जर हृदयाचें स्थान असेल, तर मूलाधारचक्रापासून योगाचा उपक्रम मानतात, हें कसें?

अन्यदेव ततो रक्तपिंडाद्धृदयमुच्यते ।
अयं हृदिति वृत्त्या तदात्मनो रूपमीरितम् ॥५॥

हें (आध्यात्मिक) हृदय शारीरशास्त्रांतील रक्तपिंडात्मक हृदयाहून निराळें आहे. येथें 'हृदय' या शब्दानें आत्मरूप सांगितलें आहे असें समजावें.

तस्य दक्षिणतो धाम हृत्पीठे नैव वामतः ।
तस्मात्प्रवहति ज्योतिः सहस्रारं सुषुम्नया ॥६॥

त्याचें (आविर्भवन) स्थान छातीच्या उजव्या बाजूस आहे. डाव्या बाजूस (रक्तपिंड आहे तेथें) नाहीं. तेथूनच ज्योति सुषुम्ना मार्गानें मस्तकांतील सहस्रदलकमलाकडे जाते.

सर्वं देहं सहस्रारात्तदालोकानुभूतयः ।
ताः प्रपश्यन्विभेदेन संसारी मनुजो भवेत् ॥७॥

सहस्रदलकमलांतून ती ज्योत (असंख्य नाड्यांमधून) सर्व देहाप्रत जाते, तेव्हांच लोकांना (दृश्य सृष्टीचे) अनुभव येतात. हे दृश्य अनुभव, भेददृष्टीनें पाहिले म्हणजे मनुष्य संसारी बनतो.

आत्मस्थस्य सहस्रारं शुद्धं ज्योतिर्मयं भवेत् ।
तत्र जीवेन्न संकल्पो यदि सान्निध्यतः पतेत् ॥ ८ ॥

आत्मनिष्ठाचें सहस्रदलकमल शुद्ध ज्योतिर्मय बनतें. तेथें कदाचित् संकल्प उठला तर तो टिकत नाहीं.

विज्ञायमानविषयं सन्निकर्षेण यद्यपि ।
न भवेद्योगभंगाय भेदस्याग्रहणे मनः ॥ ९ ॥

भेदभावाचें ग्रहण केलें नसतां, विषयाचा निकटसंबंध आला तरी मनाचा योगभंग होत नाहीं.

गृह्णतोऽपि स्थिरैकाधीः सहजास्थितिरुच्यते ।
निर्विकल्पः समाधिस्तु विषयासन्निधौ भवेत् ॥१०॥

भेदग्रहणांत सुद्धां स्वस्वरूपापासून न ढळणाऱ्या स्थिर वृत्तीला ' सहजस्थिति ' म्हणतात. आणि निर्विषय (विषयांची सन्निधि म्हणजे भान नसलेल्या) स्थितींत ' निर्विकल्प समाधि ' होते.

अंडं वपुषि निःशेषं निःशेषं हृदये वपुः ।
तस्मादण्डस्य सर्वस्य हृदयं रूपसंग्रहः ॥११॥

अखिल ब्रह्मांड हें पिंडांत म्ह० शरीरांत संग्रहित आहे (' पिंडीं ते ब्रह्मांडीं '). सर्व शरीर हें हृदयांत संग्रहित आहे. म्हणून हृदय हें अखिल ब्रह्मांडाचा रूपसंग्रह असें समजावें.

भुवनं मनसो नान्यदन्यन्न हृदयान्मनः ।
अशेषा हृदये तस्मात्कथा परिसमाप्यते ॥१२॥

जग हें मनाहून निराळें नाहीं आणि मन हें हृदयाहून निराळें नाहीं. अर्थात् सर्व कांहीं हृदयांत पर्यवसित होतें असें समजावें.

कीर्त्यते हृदयं पिण्डे यथाण्डे भानुमण्डलम् ।
मनः सहस्रारगतं बिंबं चांद्रमसं यथा ॥१३॥

सूर्य जसा ब्रह्मांडांत, तसें हृदय हें पिंडांत म्ह० शरीरांत; आणि चंद्र जसा आकाशांत, तसें मन हें सहस्रदल कमलांत समजावें.

यथा ददाति तपनस्तेजः कैरवबंधवे ।
इदं वितरति ज्योतिर्हृदयं मनसे तथा ॥१४॥

सूर्य ज्याप्रमाणें चंद्राला प्रकाश देतो, त्याप्रमाणें हृदय हें मनाला प्रकाश देतें.

हृद्यसन्निहितो मर्त्यो मनः केवलमीक्षते ।
असन्निकर्षे सूर्यस्य रात्रौ चंद्रे यथा महः ॥१५॥

सूर्य नसला म्हणजे चंद्रप्रकाश दिसतो, त्याप्रमाणें हृदयाचें भान नसलें म्हणजे मनुष्य मनच पाहतो (मनांत गुरफटतो).

अपश्यंस्तेजसो मूलं स्वरूपं सत्यमात्मनः ।
मनसा च पृथक्पश्यन्भावान्भ्राम्यति पामरः ॥

प्रकाशाचें म्ह० ज्ञानाचें मूळ स्वस्वरूप आत्मा होय. त्याला न पाहतां मनानें भिन्न भाव कल्पिणारा मनुष्य भ्रमांत पडतो.

हृदि सन्निहितो ज्ञानी लीनं हृदयतेजसि ।
ईक्षते मानसं तेजो दिवा भानाविवैन्दवम् ॥१७॥

दिवसा सूर्यप्रकाशांत जसें चंद्रतेज लुप्त झालेलें दिसतें, त्याप्रमाणें हृदयांत स्थित झालेला ज्ञानी मनाचें तेज 'हृदय' तेजांत लीन झालेलें पाहतो.

प्रज्ञानस्य प्रवेत्तारो वाच्यमर्थं मनो विदुः ।
अर्थं तु लक्ष्यं हृदयं हृदयान्नापरः परः ॥१८॥

ज्ञाते लोक 'प्रज्ञान' याचा वाच्यार्थ मन समजतात आणि लक्ष्यार्थ हृदय समजतात. 'हृदया'हून श्रेष्ठ असा दुसरा कोणी नाहीं.

दृग्दृश्यभेदधीरेषा मनसि प्रतितिष्ठति ।
हृदये वर्तमानानां दृग्दृश्यं चैकतां व्रजेत् ॥१९॥

द्रष्टा व दृश्य यांचा (हीं निराळीं आहेत असा) भेद-भाव मनालाच भासतो. पण 'हृदयांत' स्थित झालेल्यांना द्रष्टा व दृश्य हे एकच होऊन जातात.

मूर्च्छा निद्रातिसंतोषशोकावेशभयादिभिः ।
निमित्तैराहता वृत्तिः स्वस्थानं हृदयं व्रजेत् ॥२०॥

मूर्च्छा, निद्रा, हर्षातिरेक, शोकावेश, भय इत्यादि निमि-

त्यांनीं पछाडलेली वृत्ति आपल्या मूलस्थानाला म्हणजे 'हृदयाला' जाऊन मिळते.

तदा न ज्ञायते प्राप्तिर्हृदयस्य शरीरिणा।
विज्ञायते समाधौ तु नामभेदो निमित्ततः ॥२१॥

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबंधे
'हृदयविद्या' नाम पंचमोऽध्यायः।

पण तेव्हां मनुष्याला 'हृदया'ची झालेली प्राप्ति कळत नसते, आणि समाधींत ती कळते. समाधि व निद्रा इत्यादि नामभेद हा त्या त्या विशिष्ट निमित्तांमुळें होत असतो. (निद्रा, मूर्च्छा इ० अवस्थांमध्यें वृत्ति अज्ञानांत लीन होते व समाधि-अवस्थेमध्यें वृत्ति ज्ञानांत समरसून जाते.)

याप्रमाणें रमणगीतेंतील ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील
रमणशिष्य वासिष्ठगणपतिमुनीच्या अनुवादांतील
'हृदयविद्या' नामक पांचवा अध्याय समाप्त.

षष्ठोऽध्यायः

मनोनिग्रहोपायः ।

निरूप्य हृदयस्यैवं तत्त्वं तत्त्वविदांवरः ।
मनसो निग्रहोपायमवदद्रमणो मुनिः ॥ १ ॥

तत्त्ववेत्त्यांमध्यें श्रेष्ठ अशा रमण महामुनींनीं याप्रमाणें (मागच्या अध्यायांत) 'हृदया' चें तत्त्व निरूपण केल्यावर त्यांनीं मनोनिग्रहाचा उपाय सांगितला.

नित्यवृत्तिमतां नृणां विषयासक्तचेतसाम् ।
वासनानां बलीयस्त्वान्मनो दुर्निग्रहं भवेत् २

नेहमीं वृत्तींत गुरफटलेले व विषयांत आसक्त झालेले अशा लोकांना बलवत्तर वासनांमुळें मनोनिग्रह करणें फार कठीण जातें.

चपलं तन्निगृह्णीयात्प्राणरोधेन मानवः ।
पाशबद्धो यथाजन्तुस्तथा चेतो न चेष्टते ॥ ३ ॥

मनुष्यानें त्या चंचल मनाचा प्राणरोधानेंच निग्रह करावा. तसें केल्यास पाशानें बांधलेल्या हरिणमर्कटादिकांप्रमाणें मन चेष्टा करूं शकत नाहीं.

प्राणरोधेन वृत्तीनां निरोधः साधितो भवेत् ।
वृत्तिरोधेन वृत्तीनां जन्मस्थाने स्थितो भवेत् ४

प्राणरोधानें वृत्तीचा निरोध साध्य होतो व वृत्तिरोधानें साधक वृत्तींच्या जन्मस्थानीं (आत्मस्वरूपीं) स्थित होतो.

प्राणरोधश्च मनसा प्राणस्य प्रत्यवेक्षणम् ।
कुंभकं सिध्यति ह्येवं सततं प्रत्यवेक्षणात् ॥ ५ ॥

प्राणरोध म्हणजे मनानें प्राणगतीचें (श्वासाचें) निरीक्षण करणें. याप्रमाणें सतत निरीक्षण करीत राहिल्यास कुंभक साध्य होतो.

येषां नैतेन विधिना शक्तिः कुंभकसाधने ।
हठयोगविधानेन तेषां कुंभकमिष्यते ॥ ६ ॥

ज्यांना या विधीनें कुंभक साध्य करणें शक्य वाटत नाहीं, त्यांनीं हठयोगांत सांगितल्याप्रमाणें (प्राणायामाचा) अभ्यास करून कुंभक साधून घ्यावा.

एकदा रेचकं कुर्यात्कुर्यात्पूरकमेकदा ।
कुंभकं तु चतुर्वारं नाडीशुद्धिर्भवेत्ततः ॥७॥

एकपट रेचक, तेवढाच पूरक आणि चौपट कुंभक याप्रमाणें अभ्यास करीत गेल्यास नाडीशुद्धि होते. *

प्राणो नाडीषु शुद्धासु निरुद्धः क्रमशो भवेत् ।
प्राणस्य सर्वधारोधः शुद्धं कुंभकमुच्यते ॥ ८ ॥

नाडीशुद्धि झाली कीं, क्रमशः प्राणरोध होतो. सर्वप्रकारें प्राणाच्या रोधाला शुद्ध कुंभक म्हणतात.

---

* हठयोगांत पूरक, कुंभक व रेचक यांचें प्रमाण १: ४: २ असें आहे. येथें सांगितलेलें प्रमाण १: ४: १ हा एक दुसरा प्रकार आहे.

आतां ज्ञान्याचा प्राणायाम सांगतातः--

त्यागं देहात्मभावस्य रेचकं ज्ञानिनः परे ।
पूरकं मार्गण स्वस्य, कुंभकं सहजस्थितिम् ९

श्रेष्ठज्ञानी हे देहात्मभावाच्या त्यागाला 'रेचक', आत्मान्वेषणाला ' पूरक ' आणि सहज स्थितीला ' कुंभक ' म्हणतात. *

जपेन वाऽथ मंत्राणां मनसो निग्रहो भवेत् ।
मानसेन तदा मंत्रप्राणयोरेकता भवेत् ॥ १० ॥

अथवा मंत्राच्या जपानें मनाचा निग्रह होतो. अशा एकाग्रतेच्या म्ह० मानस जपानें मंत्र, मन व प्राण एकरूप होऊन जातात.

मंत्राक्षराणां प्राणेन सायुज्यं ध्यानमुच्यते ।
सहजस्थितये ध्यानं दृढभूमिमकल्पते ॥ ११ ॥

मंत्राक्षरांचें प्राणाशीं झालेलें जें ऐक्य त्याला ' ध्यान ' म्हणतात. सहजस्थिति प्राप्त होण्याला ध्यान हीच दृढभूमि म्हणजे पाया होय.

---

* श्रीशंकराचार्यांच्या अपरोक्षानुभूतींतील खालील श्लोक पहा—

निषेधनं प्रपंचस्य रेचकाख्यः समीरणः ।
ब्रह्मैवाऽस्मीति या वृत्तिः पूरको वायुरीरितः ॥ ११९ ॥
ततस्तद्वृत्तिनैश्चल्यं कुंभकः प्राणसंयमः ।
अयं चापि प्रबुद्धानामज्ञानां घ्राणपीडनम् ॥ १२० ॥

सहवासेन महतां सतामारूढचेतसाम् ।
क्रियमाणेन वा नित्यं स्थाने लीनं मनो भवेत् १२

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबन्धे
'मनोनिग्रहोपायो' नाम षष्ठोऽध्यायः ॥ १२ ॥

अथवा योगारूढ अशा महात्म्यांचा नित्य सहवास करीत राहिल्यानें मन स्वस्थानांत लीन होतें.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील
रमणशिष्य वासिष्ठ गणपतिमुनीच्या
अनुवादांतील मनोनिग्रहोपाय नामक
सहावा अध्याय समाप्त.

सप्तमोऽध्यायः ॥

आत्मविचाराधिकारितदंगनिरूपणम्

भारद्वाजस्य वै कार्ष्णेराचार्यरमणस्य च ।
अध्याये कथ्यते श्रेष्ठः संवाद इह सप्तमे ॥ १ ॥

भारद्वाज गोत्री कार्ष्णि व आचार्य रमण यांचा श्रेष्ठ संवाद या सातव्या अध्यायांत सांगितला आहे.

कार्ष्णिरुवाच—कार्ष्णि म्हणाला—

रूपमात्मविचारस्य किं नु किंवा प्रयोजनम् ।
लभ्यादात्मविचारेण फलं भूयोऽन्यतोऽस्ति वा २

आत्मविचाराचें रूप काय व त्याचें प्रयोजन काय ? आत्मविचारानें जें फल मिळतें, त्याहून दुसरें कांहीं अधिक फळ आहे काय ?

भगवानुवाच—भगवान म्हणाले—

सर्वासामपि वृत्तीनां समष्टिर्या समीरता ।
अहंवृत्तेरमुष्यास्तु जन्मस्थानं विमृश्यताम् ॥३॥

एष आत्मविचारः स्यान्न शास्त्रपरिशीलनम् ।
अहंकारो विलीनः स्यान्मूलस्थानगवेषणे ॥४॥

सर्वहि वृत्तींचा समुदाय जिला म्हणतात अशा त्या अहं-वृत्तीचें जन्मस्थान शोधलें पाहिजे. हाच आत्मविचार होय, शास्त्रांचा अभ्यास (हा आत्मविचार) नव्हे. मूलस्थानाचा शोध केला असतां अहंकाराचा लय होतो.

आत्माभासस्त्वहंकारः स यदा संप्रलीयते।
आत्मा सत्योऽभितः पूर्णः केवलः परिशिष्यते ५

आत्म्याचा आभास तोच अहंकार. त्याचा नाश झाला असतां सर्वव्यापी, सत्य, पूर्ण व केवल असा आत्माच उरतो.

सर्वक्लेशनिवृत्तिः स्यात्फलमात्मविचारतः ।
फलानामवधिः सोयमस्ति नेतोऽधिकं फलम् ६

सर्व क्लेशांची निवृत्ति हेंच आत्मविचाराचें फल होय. तेंच सर्व फलांची सीमा होय. त्याहून श्रेष्ठ असें दुसरें फल नाहीं.

अद्भुताः सिद्धयः साध्या उपायान्तरतश्च याः।
ताः प्राप्तोपि भवत्यन्ते विचारेणैव निर्वृतः ॥७॥

दुसऱ्या उपायांनीं साध्य होणाऱ्या अद्भुत सिद्धि प्राप्त झाल्या असतांहि साधक शेवटीं आत्मविचारानेंच तृप्त होत असतो.

कार्ष्णिरुवाच—कार्ष्णि म्हणाला—

एतस्यात्मविचारस्य प्राहुः कमधिकारिणम् ।
अधिकारस्य संपत्तिः किं ज्ञातुं शक्यते स्वयम् ८

या आत्मविचाराचा अधिकारी कोणाला म्हणावें? आपली अधिकारसंपत्ति स्वतः आपण जाणणें शक्य आहे काय?

भगवानुवाच—भगवान म्हणाले—

उपासनादिभिः शुद्धं प्राग्जन्मसुकृतेन वा ।
दृष्टदोषं मनो यस्य शरीरे विषयेषु च ॥ ९ ॥
मनसा चरतो यस्य विषयेष्वरुचिर्भृशम् ।
देहे चानित्यता बुद्धिस्तं प्राहुरधिकारिणम् ॥१०॥

या जन्मींच्या उपासनादिकांनीं किंवा पूर्वजन्मींच्या सुकृतानें ज्याची चित्तशुद्धि झाली आहे, शरीर व विषय यांना ज्याचें मन दोषदृष्टीनें पहात आहे, विषयांत वावरत असूनहि त्याचेविषयीं ज्याला मनापासून अतिशय अरुचि आहे, व देहाच्या ठिकाणीं ज्याची अनित्य बुद्धि आहे त्यालाच अधिकारी म्हणावें.

देहे नश्वरताबुद्धेर्वैराग्याद्विषयेषु च ।
एताभ्यामेव लिंगाभ्यां ज्ञेया स्वस्याधिकारता ॥

देहाच्या ठिकाणीं नश्वरबुद्धि आणि विषयांविषयींचें वैराग्य या दोन लक्षणांवरून आपला अधिकार आपण ओळखावा.

कार्ष्णिरुवाच—कार्ष्णि म्हणाला—

स्नानं संध्या जपो होमः स्वाध्यायो देवपूजनम्
संकीर्तनं तीर्थयात्रा यज्ञो दानं व्रतानि च ॥१२॥

विचारे साधिकारस्य वैराग्याच्च विवेकतः ।
किंवा प्रयोजनाय स्युरुत कालविधूतये ॥१३॥

स्नान, संध्या, जप, होम, स्वाध्याय, देवपूजन, संकीर्तन, तीर्थयात्रा, यज्ञ, दान व व्रतें यांचा, वैराग्य व विवेक यांनीं युक्त असलेल्या अधिकारी पुरुषाच्या आत्मविचारांत कांहीं उपयोग होतो, किंवा हीं सर्व कालक्षेपासाठीं आहेत?

भगवानुवाच—भगवान म्हणाले—

आरंभिणां क्षीयमाणरागाणामधिकारिणाम् ।
कर्माण्येतानि सर्वाणि भूयस्यै चित्तशुद्धये १४

ज्यांची विषयांवरील प्रीति कमी होत चालली आहे अशा नवसाधक अधिकाऱ्यांची मोठी चित्तशुद्धि साधण्याला हीं सर्व कर्मे कारण होतात.

यत्कर्म सुकृतं प्रोक्तं मनोवाक्कायसंभवम् ।
तत्तु कर्मान्तरं हन्ति मनोवाक्कायसंभवम् ॥ १५

मन, वाणी व शरीर यांपासून होणारें सुकृत हें, मनवाणी शरीरांनीं मागें केलेल्या दुष्कृताचा नाश करून सोडतें.

अत्यन्तशुद्धमनसां पक्कानामधिकारिणाम् ।
इदं लोकोपकाराय कर्मजालं भविष्यति ॥१६॥

अत्यंत शुद्ध मनाच्या, पक्क अधिकाऱ्यांचीं सर्व कर्मे लोकोपकारासाठींच होत असतात.

परेषामुपदेशाय क्षेमाय च मनीषिणः ।
पक्वाश्च कर्म कुर्वन्ति भयान्नादेशशास्त्रतः ॥१७॥

पक्वज्ञानी पुरुष हे लोकांना उपदेश करण्यासाठीं किंवा त्यांच्या कल्याणासाठींच कर्में करीत असतात. भीतीनें किंवा शास्त्रांचा आदेश म्हणून करीत नाहींत.

विचारप्रतिकूलानि न पुण्यानि नरर्षभ ।
क्रियमाणान्यसंगेन भेदबुद्ध्युपमर्दिना ॥१८॥

हे नरश्रेष्ठा! संग (अहंकार) आणि भेदबुद्धि सोडून जीं कांहीं पुण्यकर्में केलीं जातात, तीं आत्मविचाराला प्रतिकूल नसतात.

न चाकृतानि पापाय पक्वस्यात्मविमर्शिनः ।
स्वविमर्शो महत्पुण्यं पावनानां हि पावनम् ॥१९

पक्व आत्मविचारी पुरुषांनीं कांहीं कर्में केलीं नाहींत, तरी त्यांना त्यामुळें पाप लागत नाहीं. आत्मविचार हें पावनांत पावन असें महत्पुण्य आहे.

दृश्यते द्विविधा निष्ठा पक्वानामधिकारिणाम् ।
त्याग एकान्तयोगाय पराथ च क्रियादरः ॥२०॥

पक्व अधिकाऱ्यांची दोन प्रकारची निष्ठा दिसून येते. एकांतिक योगासाठीं कर्मत्याग व परार्थासाठीं क्रियांचा आदर (कर्मयोग).

कार्ष्णिरुवाच —कार्ष्णि म्हणाला—

निर्वाणायास्ति चेदन्यो मार्ग आत्मविचारतः ।
एको वा विविधस्तं मे भगवान्वक्तुमर्हति २१

मोक्षासाठीं आत्मविचाराहून दुसरा कांहीं मार्ग— एक किंवा अनेक आहेत काय हें भगवानांनीं मला सांगावें.

भगवानुवाच—भगवान म्हणाले—

एकः प्राप्तुं प्रयतते परः प्राप्तारमृच्छति ।
चिराय प्रथमो गच्छत्प्राप्नोत्यात्मानमन्ततः २२

कोणी मोक्षप्राप्तीसाठीं प्रयत्न करितो, तर कोणी ज्याला प्राप्ति पाहिजे अशाचा म्ह० आत्म्याचा शोध करितो. पहिला फार वेळानें शेवटीं आत्म्याची प्राप्ति करून घेतो.

एकस्य ध्यानतश्चित्तमेकाकृति भविष्यति ।
एकाकृतित्वं चित्तस्य स्वरूपे स्थितये भवेत् २३

एकाचें ध्यानाच्या योगानें चित्त एकाग्र होतें व चित्ताची एकाग्रता झाली कीं स्वरूपस्थिति साधते.

अनिच्छयाप्यतो ध्यायन्विन्दत्यात्मनि संस्थितिम् ।
विचारकस्तु विज्ञाय भवेदात्मनि संस्थितः ॥२४॥

ध्यान करणारा अनिच्छेनेंहि (न कळत) स्वरूपामध्यें संस्थिति पावतो. विचारक (ज्ञानमार्गी) मात्र जाणून (कळत) आत्मस्थित होतो.

ध्यायतो देवतां मंत्रमन्यद्वा लक्ष्यमुत्तमम् ।
ध्येयमात्ममहाज्योतिष्यन्ततो लीनतां व्रजेत् ॥२५॥

देवता, मंत्र किंवा दुसरें कांहीं उत्तम लक्ष्य यांचें ध्यान करणाऱ्याचें ध्येय शेवटीं आत्ममहाज्योतींत–आत्मप्रकाशांतच–लीन होतें.

गतिरेवं द्वयोरेका ध्यातुश्चात्मविमर्शिनः ।
ध्यायन्नेकः प्रशान्तः स्यादन्यो विज्ञाय शाम्यति २६

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबन्धे 'आत्मविचाराधिकारितदंगनिरूपणं' नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

ध्यान करणारा व आत्मविचारी (ध्यानी व ज्ञानी) या दोघांना शेवटीं एकच गति मिळते. एकाला ध्यानानें तर दुसऱ्याला विचारानें (ज्ञानानें) शांति मिळते.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रम्हविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील रमणशिष्य वासिष्ठगणपतिमुनीच्या अनुवादांतील आत्मविचाराधिकारितदंगनिरूपण नामक सातवा अध्याय समाप्त.



अष्टमोऽध्यायः

आश्रमविचारः ।

कार्ष्णेरेवापरं प्रश्नं निशम्य भगवान्मुनिः ।
चातुराश्रम्यसंबद्धमधिकारं न्यरूपयत् ॥ १ ॥

कार्ष्णींचा दुसरा प्रश्न ऐकून भगवान रमणमुनींनींच चतुर्थाश्रमासंबंधीं अधिकार सांगितला.

ब्रह्मचारी गृही वापि वानप्रस्थोऽथवा यतिः ।
नारी वा वृषलो वापि पक्को ब्रह्म विचारयेत् ॥२॥

ब्रह्मचारी, गृहस्थाश्रमी, वानप्रस्थ, संन्यासी, किंवा नारी अगर शूद्र हे योग्य म्ह० अधिकारी असतील तर त्यांनीं ब्रह्माचा विचार करावा.

सोपानवत्परं प्राप्तु भविष्यत्याश्रमक्रमः ।
अत्यन्तपक्कचित्तस्य क्रमापेक्षा न विद्यते ॥३॥

परब्रह्माची प्राप्ति करून घेण्यासाठीं आश्रमक्रमाची योजना ही पायरीप्रमाणें केलेली आहे. अत्यंत पक्कचित्त झालेल्यांना क्रमाची अपेक्षा नसते.

गतये लोककार्याणामादिशंत्याश्रमक्रमम् ।
आश्रमत्रयधर्माणां न ज्ञानप्रतिकूलता ॥ ४ ॥

लोककार्याच्या सिद्धीसाठीं आश्रमक्रम सांगितलेला आहे. नहून पहिल्या तीन आश्रमांचा धर्म ज्ञानाला प्रतिकूल आहे असें समजूं नये.

संन्यासो निर्मलं ज्ञानं न काषायो न मुंडनम् ।
प्रतिबंधकबाहुल्यवारणायाश्रमो मतः ॥ ५ ॥

संन्यास म्हणजे निर्मल ज्ञान होय. काषायवस्त्रधारण किंवा मुंडन म्हणजे संन्यास नव्हे. आश्रम हा विघ्न-बाहुल्याचें निवारण करण्यासाठीं आहे इतकेंच समजावें.

ब्रह्मचर्याश्रमे यस्य शक्तिरुज्जृंभते व्रतैः ।
विद्यया ज्ञानवृद्ध्या च स पश्चात्प्रज्वलिष्यति ६

ब्रह्मचर्याश्रमामध्यें ज्याची शक्ति व्रतें, विद्या व ज्ञानवृद्धि यांच्या योगें विकास पावते तोच पुढें तेजस्वी व ओजस्वी होतो.

ब्रह्मचर्येण शुद्धेन गृहीत्वे निर्मलो भवेत् ।
सर्वेषामुपकाराय गृहस्थाश्रम उच्यते ॥ ७ ॥

शुद्ध ब्रह्मचर्याच्या योगें मनुष्य गृहस्थाश्रमांत निर्मलता व उज्वलता पावतो. गृहस्थाश्रम हा सर्वांच्या उपकारा-साठीं आहे. (सर्व भूतमात्र व इतर तीन्ही आश्रम गृहस्थाश्रमावर पोसले जातात.)

सर्वधा वीतसंगस्य गृहस्थस्यापि देहिनः ।
परं प्रस्फुरति ज्योतिस्तत्र नैवास्ति संशयः ८

सर्व प्रकारें विरक्त अशा गृहस्थाश्रमी मनुष्याच्याहि हृदयांत परं (आत्म) ज्योति निःसंशय प्रज्वलित होते.

तपसस्त्वाश्रमः प्रोक्तस्तृतीयः पंडितोत्तमैः ।
अभार्यो वा सभार्यो वा तृतीयाश्रमभाग्भवेत् ९

तृतीय म्ह. वानप्रस्थ हा तपाचाच आश्रम असें पंडित लोक म्हणतात. भार्येला बरोबर घेऊन किंवा न घेतां मनुष्याला तृतीयाश्रमवासी होतां येतें.

तपसा दग्धपापस्य पक्कचित्तस्य योगिनः ।
चतुर्थ आश्रमः काले स्वयमेव भविष्यति ॥१०॥

तपाच्या योगें पाप दग्ध झालेल्या व चित्त पक्क झालेल्या योग्याला योग्य काळीं आपोआप चतुर्थ आश्रम प्राप्त होतो.

एवं प्रागुक्त एवाब्देत्वष्टमे द्वादशे पुनः ।
उपदेशो भगवतस्सप्तमाष्टमयोरभूत् ॥ ११ ॥

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबंधे
‘ आ श्र म वि चा रो ’ ना म
अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

मागें सांगितलेल्या सालांत (१९१७) आगष्ट महिन्याच्या १२ तारखेस भगवानांनीं हा सातव्या व आठव्या अध्यायांतील उपदेश सांगितला.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील
रमणशिष्य वासिष्ठगणपतिमुनीच्या अनुवादांतील
' आश्रमविचार ' नामक आठवा
अध्याय समाप्त.



नवमोऽध्यायः ।

ग्रंथिभेदकथनम् ।

चतुर्दशेऽष्टमे रात्रौ महर्षिं पृष्टवानहम् ।
ग्रंथिभेदं समुद्दिश्य विदुषां यत्र संशयः ॥ १ ॥

आगष्ट महिन्याच्या १४ तारखेस रात्रौ मी श्रीरमणमहर्षींना ग्रंथिभेदासंबंधानें प्रश्न केला. कारण याविषयीं विद्वानांनाहि संशय येत असतो.

समाकर्ण्य मम प्रश्नं रमणो भगवानृषिः ।
ध्यात्वा दिव्येन भावेन किंचिदाह महामहाः ॥

महातेजस्वी रमणमुनींनीं माझा प्रश्न ऐकून घेऊन दिव्य भावें ध्यान करून थोडेंसें निरूपण केलें तें असें—

शरीरस्यात्मनश्चापि संबन्धो ग्रंथिरुच्यते ।
संबंधेनैव शारीरं भवति ज्ञानमात्मनः ॥ ३ ॥

शरीर व आत्मा यांच्या संयोगाला ' ग्रंथि ' म्हणतात. या ग्रंथीमुळेंच आत्म्याचें ज्ञान जीवभावाला प्राप्त होतें.

शरीरं जडमेतत्स्यादात्मा चैतन्यमिष्यते ।
उभयोरपि संबंधो विज्ञानेनानुमीयते ॥ ४ ॥

शरीर हें जड आहे व आत्मा चैतन्यस्वरूप आहे. उभयतांचा संबंध तर्कानें जाणला जातो.

चैतन्यच्छायया श्लिष्टं शरीरं तात चेष्टते ।
निद्रादौ ग्रहणाभावादूह्यते स्थानमात्मनः ॥५॥

बाबा रे, चैतन्याच्या आभासानें व्यापल्यामुळेंच शरीर हें चेष्टा (हालचाल) करूं शकतें. निद्रामूर्च्छादि समयीं विषयज्ञान नसतें, पण आत्मभान असतेंच. यावरून आत्म्याचें स्थान निराळ्या युक्तीनें शोधलें पाहिजे.

सूक्ष्माणां विद्युदादीनां स्थूले तंत्र्यादिके यथा ।
तथा कलेवरे नाड्यां चैतन्यज्योतिषो गतिः ॥६॥

विद्युत् वगैरेची सूक्ष्म गति स्थूल अशा तारा वगैरेंच्या मधून वाहते, त्याप्रमाणें चैतन्य ज्योतीची गति शरीरांतील नाड्यांमधून वहात असते.

स्थलमेकमुपाश्रित्य चैतन्यज्योतिरुज्ज्वलम् ।
सर्वं भासयते देहं भास्करो भुवनं यथा ॥ ७ ॥

सूर्य जसा एका ठिकाणीं राहून सर्व जग प्रकाशित करितो, तशी चैतन्याची उज्ज्वल ज्योति एका स्थलाचा आश्रय करून सर्व देहाला प्रकाशित करते.

व्याप्तेन तत्प्रकाशेन शरीरे त्वनुभूतयः ।
स्थलं तदेव हृदयं सूरयस्संप्रचक्षते ॥ ८ ॥

तो प्रकाश सर्व शरीरभर व्यापून राहिल्यामुळें शरीरामध्यें अनुभव येतात. विद्वान् लोक त्या स्थळालाच 'हृदय' म्हणतात.

नाडीशक्तिविलासेन चैतन्यांशुगतिर्मता ।
देहस्य शक्तयस्सर्वाः पृथङ्नाडीरुपाश्रिताः ९

नाडीशक्तीच्या विलासानें चैतन्यकिरणांना गति मिळते. देहाच्या सर्व शक्ति निरनिराळ्या नाडींच्या आश्रयानें राहतात.

चैतन्यं तु पृथङ्नाड्यां तां सुषुम्नां प्रचक्षते ।
आत्मनाडीं परामेके परेत्वमृतनाडिकाम् ॥१०॥

पण हें चैतन्य एका निराळ्या नाडींत असतें. तिला कोणी सुषुम्ना, कोणी आत्मनाडी तर कोणी परा किंवा अमृतनाडी म्हणतात.

सर्वं देहं प्रकाशेन व्याप्तो जीवोऽभिमानवान् ।
मन्यते देहमात्मानं तेन भिन्नं च विष्टपम् ॥११॥

याप्रमाणें सर्व देह चैतन्यप्रकाशानें व्याप्त असतो; पण अभिमानी जीव आपणाला देहच समजतो. आणि जग आपणाहून भिन्न मानतो.

अभिमानं परित्यज्य देहे चात्मधियं सुधीः ।
विचारयेच्चेदेकाग्रो नाडीनां मथनं भवेत् ॥१२॥

अभिमान व देहात्मबुद्धि टाकून देऊन, समंजस मनुष्य एकाग्र मनानें विचार (शोध) करील तर त्याच्या नाडींचें मंथन होईल.

नाडीनां मथनेनैवमात्मा ताभ्यः पृथक्कृतः ।
केवलाममृतां नाडीमाश्रित्य प्रज्वलिष्यति १३

याप्रमाणें नाडीच्या मंथनानें आत्मा त्या (इतर नाडी) पासून पृथक् होऊन केवल अमृतनाडीचाच आश्रय करून प्रज्वलित होईल.

आत्मनाड्यां यदा भाति चैतन्यज्योतिरुज्ज्वलम् ।
केवलायां तदा नान्यदात्मनस्संप्रभासते ।। १४ ।।

चैतन्याची उज्ज्वल ज्योति केवल आत्मनाडींतच जेव्हां स्फुरूं लागते, तेव्हां आत्म्याहून अन्य वस्तूचें भानच होत नाहीं.

सान्निध्याद्भासमानं वा न पृथक्प्रातितिष्ठति ।
जानाति स्पष्टमात्मानं सदेहमिव पामरः ॥१५॥

किंवा सान्निध्यामुळें भासणारी दुसरी वस्तुहि त्याला निराळी दिसत नाहीं. पामर जसा देहाला तसा तो (ज्ञानी) आत्म्याला स्पष्ट जाणतो.

आत्मैव भासते यस्य बहिरंतश्च सर्वतः ।
पामरस्येव रूपादि स भिन्नग्रंथिरुच्यते ॥१६॥

पामराला जसें नामरूपादि जग स्पष्ट भासतें, तसें ज्याला सर्व बाजूंनीं आंत बाहेर आत्माच दिसत असतो, त्याचा ग्रंथिभेद झाला असें समजावें.

नाडीबन्धोऽभिमानश्च द्वयं ग्रन्थिरुदीर्यते ।
नाडीबंधेन सूक्ष्मोऽपि स्थूलं सर्वं प्रपश्यति १७

नाडीबंध (चिज्जडग्रंथि) व अभिमान ह्या दोन ग्रंथि आहेत असें म्हणतात. आत्मा सूक्ष्म असला तरी नाडीबंधानें (नाडींना प्रेरणा देऊन त्या द्वारें) सर्व स्थूल जगत् पाहतो.

निवृत्तं सर्वनाडीभ्यो यदैकां नाडिकां श्रितम् ।
भिन्नग्रंथि तदा ज्योतिरात्मभावाय कल्पते १८

सर्व नाड्यांपासून मोकळी होऊन आत्मज्योति जेव्हां एका (सुषुम्ना) नाडीचा आश्रय करून राहते, तेव्हां ग्रंथिभेद होऊन आत्मभाव जागृत होतो.

अग्नितप्तमयो गोलं दृश्यतेऽग्निमयं यथा ।
स्वविचाराग्निसंतप्तं तथेदं स्वमयं भवेत् ॥ १९ ॥

अग्नीनें तापलेला लोखंडाचा गोळा अग्निमय दिसतो, तसा आत्मविचाररूपी अग्नीनें संतप्त झालेला देह आत्ममय (चिन्मय) होतो.

शरीरादिजुषां पूर्ववासनानां क्षयस्तदा ।
कर्तृत्वमशरीरत्वान्नैव तस्य भविष्यति ॥ २० ॥

तेव्हां शरीरादिकांचा आश्रय करून राहिलेल्या पूर्व वासनांचा क्षय होतो. विदेहत्वामुळें त्याला कर्तृत्व (व भोक्तृत्व) उरत नाहीं.

कर्तत्वाभावतः कर्मविनाशोऽस्य समीरितः ।
तस्य वस्त्वंतराभावात्संशयानामनुद्भवः ॥२१॥

कर्तृत्वाच्या अभावामुळें त्याच्या सर्व कर्मांचा नाश होतो. आपल्याहून अन्य अशी दुसरी कोणतीहि वस्तु न उरल्यामुळें त्याला कोणतेहि संशय उत्पन्न होत नाहींत. *

भविता न पुनर्बद्धो विभन्नग्रंथिरेकदा ।
सा स्थितिः परमाशक्तिस्सा शांति परमा मता २२

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबंधे
'ग्रंथिभेदकथनं' नाम नवमोऽध्यायः ॥९॥

एकदां ग्रंथिभेद झाला कीं, तो पुनः बद्ध होत नाहीं. या स्थितीला परम शक्ति किंवा परम शांति असें म्हणतात.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील
रमणशिष्य वासिष्ठ गणपतिमुनीच्या अनुवादांतील
' ग्रंथिभेदकथन ' नामक नववा अध्याय समाप्त.

---

* संशय ह्मणजे कोणते कोणते याविषयीं थोडासा खुलासा—

" आत्मा देहोऽन्यो वा, अन्योऽपि विभुरविभुर्वा, विभुरपि कर्ताऽकर्ता वा, अकर्ताप्येकोऽनेको वा एकोऽपि सगुणो निर्गुणो वा " इत्यादि.

— भगवद्गीता, ४।४२ नीलकंठी टीका.

दशमोऽध्यायः ।

संघविद्या ।

यतिनो योगनाथस्य महर्षिरमणस्य च ।
दशमेऽत्र निबध्नीमस्संवादं संघहर्षदम् ॥ १ ॥

योगनाथ यति व श्रीरमण महर्षि यांचा सर्वांना हर्ष-कारक संवाद या दहाव्या अध्यायांत सांगत आहों.

योगनाथ उवाच—योगनाथ म्हणाला—

सांघिकस्य च संघस्य कः संबंधो महामुने ।
संघस्य श्रेयसे नाथ तमेतं वक्तुमर्हसि ॥ २ ॥

हे महामुने, सांघिक व संघ यांचा संबंध कसा असतो, तें संघाच्या म्ह० सर्वांच्या कल्याणार्थ आपण सांगावें.

भगवानुवाच—भगवान म्हणाले—

ज्ञेयश्शरीरवत्संघस्तत्तदाचारशालिनाम् ।
अंगानीवात्र विज्ञेयाः सांघिकाः साधुसत्तम ॥३॥

हे साधुश्रेष्ठा, संघ किंवा समाज हा शरीराप्रमाणें समजावा. आणि सांघिक हे आपापलीं कामें करून शोभणाऱ्या अवयवाप्रमाणें समजावेत.

अंगं यथा शरीरस्य करोत्युपकृतिं यते ।
तथोपकारं संघस्य कुर्वन्जयति सांघिकः ॥ ४ ॥

हे यते, अवयव हा जसा शरीराला मदत करितो, तशी सांधिकानें संघाला मदत केली असतां तो विजयी होतो.

संघस्य वाङ्मनःकायैरुपकारो यथा भवेत् ।
स्वयं तथा चरन्नित्यं स्वकीयानपि बोधयेत् ॥५॥

सांघिकानें कायावाचामनानें संघाला मदत होईल अशा रीतीनें स्वतः वागून आपल्या बांधवांनाहि तसा बोध करावा.

आनुकूल्येन संघस्य स्थापयित्वा निजं कुलम् ।
संघस्यैव ततो भूत्यै कुर्याद्भूतियुतं कुलम् ॥६॥

संघाला अनुकूल होईल अशा रीतीनें आपल्या कुलाची स्थापना करून, संघाच्या कल्याणासाठींच आपल्या कुलाचें वैभव वाढवावें.

योगनाथ उवाच—योगनाथ म्हणाला—

शांतिं केचित्प्रशंसंति शक्तिं केचिन्मनीषिणः ।
अनयोः को गुणो ज्यायां संघक्षेमकृते विभो ॥७॥

हे प्रभो, कांहीं विद्वान शांतीची तर कांहीं शक्तीची

प्रशंसा करितात. या दोन गुणांपैकीं कोणता गुण संघाचा अधिक कल्याणकारक आहे?

भगवानुवाच—भगवान म्हणाले—

स्वमनःशुद्धये शांतिश्शक्तिस्संघस्य वृद्धये ।
शक्त्या संघं विधायोच्चैश्शांतिं संस्थापयेत्ततः ॥

शांति ही आपल्या मनाच्या शुद्धीसाठीं आहे आणि शक्ति ही संघाच्या वृद्धीसाठीं आहे. शक्तीनें संघाची उत्तमप्रकारें वाढ करून नंतर तेथें शांतीची स्थापना करावी.

योगनाथ उवाच—योगनाथ म्हणाला—

सर्वस्यापि च संघस्य नराणामृषिकुंजर ।
गंतव्यं समुदायेन किं परं धरणीतले ॥ ९ ॥

हे ऋषिश्रेष्ठा, संघांतील सर्व नरांचें या पृथ्वीतलावर श्रेष्ठ सामुदायिक ध्येय कोणतें?

भगवानुवाच—भगवान म्हणाले—

समुदायेन सर्वस्य संघस्य तनुधारिणाम् ।
सौभ्रात्रं समभावेन गंतव्यं परमुच्यते ॥ १० ॥

संघांतील सर्व नरांचें सामुदायिक ध्येय म्हणजे समभावानें सौभ्रात्र म्ह. बंधुभाव साधणें हें होय.

सौभ्रात्रेण परा शांतिरन्योन्यं देहधारिणाम् ॥
तदेयं शोभते सर्वा भूमिरेकं गृहं यथा ॥ ११ ॥

बंधुभावानें मनुष्यांमध्यें परस्पर शांति वाढते. तेव्हां ही सर्व भूमि (पृथ्वी) एका गृहाप्रमाणें शोभते ('वसुधैव कुटुंबकम्').

अभूत्पंचदशे घस्त्रे संवादस्सोयमष्टमे ।
योगनाथस्य यतिनो महर्षेश्च दयावतः ॥१२॥

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबन्धे
'संघविद्या' नाम दशमोऽध्यायः ॥ १० ॥

योगनाथ यति व दयावंत श्रीरमणमहर्षि यांचा हा संवाद १९१७ सालच्या आगष्ट महिन्याच्या पंधरा तारखेस झाला.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील
रमणशिष्य वासिष्ठ गणपतिमुनीच्या अनुवादांतील
संघविद्यानामक दहावा अध्याय समाप्त.



एकादशोऽध्यायः ।

ज्ञानसिद्धिसामरस्यकथनम् ।

षोडशे दिवसे रात्रौ विविक्ते मुनिसत्तमम् ।
गुरुं ब्रह्मविदां श्रेष्ठं नित्यमात्मनि संस्थितम् ॥१॥
उपगम्य महाभागं सोऽहं कैतवमानवम् ।
रमणं स्तुतवानस्मि दुर्लभज्ञानलब्धये ॥२॥

सोळा तारखेस रात्रौ एकान्तस्थळीं ब्रह्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ, नित्य आत्मरत, महाभाग, कपटमानवरूप अशा त्या श्रीगुरु रमणमुनीकडे जाऊन दुर्लभज्ञान मिळण्यासाठीं त्यांची मी स्तुति केली.

त्वय्येव परमा निष्ठा, त्वय्येव विशदा मतिः ।
अंभसामिव वाराशिर्विज्ञानानां त्वमास्पदम् ॥

आत्मनिष्ठा तुझ्या ठायींच आहे, विशदमतिहि तुझ्या ठायींच आहे. सर्व पाण्याचें स्थान जसा समुद्र, तसें सर्व विज्ञानांचें आश्रयस्थान तूं आहेस.

त्वं तु सप्तदशे वर्षे बाल्य एव महायशः ।
लब्धवानसि विज्ञानं योगिनामपि दुर्लभम् ॥

महायश असा तूं बाल्यपणीं सतरा वर्षांचा असतांनाच, योग्यांनाहि दुर्लभ असें विज्ञान मिळविलेंस.

हे भगवन्! पूर्वीं द्रविडदेशामध्यें जेव्हां जैनांनीं वैदिक धर्माला उपसर्ग दिला, तेव्हां तूं 'ज्ञानसंबंध' नामक अवतार घेऊन भक्तीची स्थापना केलीस.

अधुना त्वं महाभाग ब्रह्मज्ञानस्य गुप्तये ।
शास्त्रज्ञानेन संतृप्तैर्निरुद्धस्यागतो धराम् ॥१४॥

हे महाभागा, शास्त्रज्ञानांतच पूर्ण तृप्ति मानणाऱ्यांनीं स्वात्मज्ञानाची वाट रोधून टाकल्यामुळें त्या ज्ञानाचें संगोपन करण्यासाठीं तूं पृथ्वीतलावर अवतरला आहेस.

संदेहा बहवो नाथ शिष्याणां वारितास्त्वया
इमं च मम संदेहं निवारयितुमर्हसि ॥ १५ ॥

हे नाथ, शिष्यांचे पुष्कळ संशय तूं फेडून टाकिलेस. आतां माझाही एक संशय तूं कृपा करून दूर कर.

ज्ञानस्य चापि सिद्धीनां विरोधः किं परस्परम् ।
उताहो कोपि संबंधो वर्तते मुनिकुंजर ॥१६॥

हे मुनिश्रेष्ठा, ज्ञान आणि सिद्धि यांचा परस्पर विरोध आहे काय? किंवा दुसरा कांहीं संबंध आहे?

मयैवं भगवान्पृष्टो रमणो नुतिपूर्वकम् ।
गभीरया दृशावीक्ष्य मामिदं वाक्यमब्रवीत् १७

नमस्कारपूर्वक मी असा प्रश्न केला असतां भगवान श्रीरमणांनीं गंभीर दृष्टीनें माझेकडे पाहून उत्तर दिलें कीं—

सहजां स्थितिमारूढः स्वभावेन दिने दिने ।
तपश्चरति दुर्धर्षं नालस्यं सहजस्थितौ ॥ १८ ॥

सहजस्थितींत आरूढ होत्साता, साधक स्वभावतः सतत दुर्धर असें तप आचरीत असतो व सहजस्थितीमध्येंहि तो आळस करित नाहीं.

तपस्तदेव दुर्धर्षं या निष्ठा सहजात्मनि ।
तेन नित्येन तपसा भवेत्पाकः क्षणे क्षणे ॥१९॥

अशी जी सहज (आत्म) निष्ठा तेंच खरें दुर्धर तप होय. या नित्य तपानें क्षणोक्षणीं परिपक्वता होत असते.

परिपाकेन काले स्युः सिद्धयस्तात पश्यतः ।
प्रारब्धं यदि ताभिः स्याद्विहारो ज्ञानिनोऽपि च २०

बाबा रे, अशा परिपाकामुळें कालांतरानें सिद्धि प्राप्त झालेल्या दिसून येतात. प्रारब्धयोग तसा असेल तर, ज्ञान्यांची त्यांच्याबरोबर लीला होत असते.

यथा प्रपंचग्रहणे स्वरूपान्नेतरन्मुनेः ।
सिद्धयः क्रियमाणाश्च स्वरूपान्नेतरत्तथा ॥२१॥

ज्ञान्याला प्रपंच जसा स्वरूपाहून निराळा भासत नाहीं, तसे सिद्धीचे चमत्कार हेहि त्याला स्वरूपाहून निराळे दिसत नाहींत.

भवेन्न यस्य प्रारब्धं शक्तिपूर्णोऽप्ययं मुनिः ।
अंतरंग इवाम्भोधिर्न किंचिदपि चेष्टते ॥२२॥

प्रारब्ध तसें नसेल तर, शक्तिपूर्ण असूनहि तो ज्ञानी समुद्राच्या अंतरंगाप्रमाणें कांहीं न करितां स्वस्थ असतो.

नान्यं मृगयते मार्गं निसर्गादात्मनि स्थितः ।
सर्वासामपि शक्तीनां समष्टिः स्वात्मनि स्थितिः ॥२३

स्वभावतः आत्मस्थित झाला असतां तो दुसरा मार्ग शोधीत नाहीं. स्वात्मस्थिति ही सर्व शक्तींची समष्टि (समूह) होय.

अप्रयत्नेन तु तपः सहजा स्थितिरुच्यते ।
सहजायां स्थितौ पाकाच्छक्तीनामुद्भवो मतः ॥२४॥

प्रयत्न न करतां सहज जें तप होईल त्याला सहज-स्थिति म्हणतात. अशा सहजस्थितींत राहून परिपाक होत गेला म्हणजे शक्तींचा उद्भव होतो.

परिवृतोऽपि बहुभिर्नित्यमात्मनि संस्थितः ।
घोरं तपश्चरत्येव न तस्यैकान्तकामिता ॥२५॥

नित्य आत्मस्थित असा (ज्ञानी) पुष्कळांनीं वेष्टिलेला असला तरी तो घोर तप आचरीतच असतो. त्याला एकान्त-वासाची इच्छा किंवा अपेक्षा नसते.

ज्ञानं शक्तेरपेतं यो मन्यते नैव वेद सः ।
सर्वशक्तेऽभितः पूर्णे स्वस्वरूपे हि बोधवान् २६

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबंधे
'ज्ञानसिद्धिसामरस्यकथनं' नाम
एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

ज्ञान हें शक्तीहून निराळें आहे असें जो मानतो, तो कांहींच जाणत नाहीं. ज्याला पूर्ण स्वरूपावबोध झाला त्यालाच सर्व शक्ति प्राप्त असतात.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील
रमणशिष्य वासिष्ठगणपतिमुनीच्या अनुवादांतील
'ज्ञानसिद्धिसामरस्यकथन' नामक
अकरावा अध्याय समाप्त.



द्वादशोऽध्यायः ।

शक्तिविचारः ।

एकोनविंशे दिवसे भारद्वाजो महामनाः ।
कपाली कृतिषु ज्यायानपृच्छद्रमणं गुरुम् ॥१॥

एकोणीस तारखे रोजीं थोर मनाचा व विद्वच्छ्रेष्ठ असा भारद्वाज गोत्री कपाली यानें श्रीरमणगुरूंना प्रश्न केला.

कपाल्युवाच—कपाली म्हणाला.

विषयी विषयो वृत्तिरितीदं भगवंस्त्रिकं ।
ज्ञानिनां पामराणां च लोकयात्रासु दृश्यते ॥२॥

अथ केन विशेषेण ज्ञानी पामरतोऽधिकः ।
इमं मे नाथ संदेहं निवर्तयितुमर्हसि ॥ ३ ॥

हे भगवन्! विषयी (द्रष्टा), विषय (दृश्य) आणि वृत्ति (दर्शन) ही त्रिपुटी जगाच्या व्यवहारांत ज्ञानी व पामर या दोघांमध्येंहि दिसून येते. तर मग पामराहून ज्ञानी कोणत्या विशिष्ट कारणामुळें श्रेष्ठ आहे? हे नाथा, हा माझा संशय कृपा करून दूर करावा.

भगवानुवाच—भगवान म्हणाले.

अभिन्नो विषयी यस्य स्वरूपान्मनुजर्षभ ।
व्यापारविषयौ भातस्तस्याभिन्नौ स्वरूपतः ४

हे मानवश्रेष्ठा, ज्याला स्वरूपाहून विषयी (द्रष्टा) भिन्न वाटत नाहीं, त्याला विषय (दृश्य) व वृत्ति (दर्शन) ह्याहि स्वरूपाहून भिन्न भासत नाहींत.

विभिन्नो विषयी यस्य स्वरूपादभिमानिनः ।
व्यापारविषयौ भातस्तस्य भिन्नौ स्वरूपतः ॥५॥

उलट, ज्या अभिमानी जीवाला स्वरूपाहून विषयी भिन्न वाटतो, त्याला विषयवृत्ति ह्याहि स्वरूपाहून भिन्नच भासतात.

भेदाभासे विजानाति ज्ञान्यभेदं तु तात्त्विकम् ।
भेदाभासवशं गत्वा पामरस्तु विभिद्यते ॥६॥

पण ज्ञानी हा भेदाभासामध्येंहि तात्त्विक अभेदच पहातो. आणि पामर हा भेदाभासाला वश होऊन त्यांतच गुरफटतो.

कपाल्युवाच—कपाली म्हणाला.

नाथ यस्मिन्निमे भेदा भासंते त्रिपुटीमयाः ।
शक्तिमद्वा स्वरूपं तदुताहो शक्तिवर्जितम् ॥७॥

हे नाथ! हे त्रिपुटीमय भेद ज्याचेवर भासतात, तें स्वरूप शक्तियुक्त आहे कीं शक्तिरहित?

भगवानुवाच—भगवान म्हणाले.

वत्स यस्मिन्निमे भेदा भासंते त्रिपुटीमयाः ।
सर्वशक्तं स्वरूपं तदाहुर्वेदान्तवेदिनः ॥ ८ ॥

हे वत्सा, हे त्रिपुटीमय भेद ज्याचेवर भासतात, तें स्वरूप सर्व शक्तिमान आहे असें वेदान्तवेत्ते म्हणतात.

कपाल्युवाच—कपाली म्हणाला.

ईश्वरस्य तु या शक्तिर्गीता वेदान्तवेदिभिः ।
अस्ति वा चलनं तस्यामाहोस्विन्नाथ नास्ति वा ॥९॥

वेदान्तवेत्ते जी शक्ति ईश्वराची आहे असें म्हणतात, तिच्यामध्यें चलन असतें कीं नाहीं ?

भगवानुवाच—भगवान म्हणाले.

शक्तेस्संचलनादेव लोकानां तात संभवः ।
चलनस्याश्रयो वस्तु न संचलति कर्हिचित् १०

बाबा रे, शक्तीच्या संचलनामुळेंच हे लोक (सृष्टि) उत्पन्न होतात. पण चलनाची आश्रयभूत वस्तु केव्हांहि चलन पावत नाहीं.

अचलस्य तु यच्छक्तेश्चलनं लोककारणम् ।
तामेवाचक्षते मायामनिर्वाच्यां विपश्चितः ११

या अचल शक्तीचें सृष्टि उत्पन्न करणारें जें चलन, त्यालाच ज्ञानी हे अनिर्वाच्य माया असें म्हणतात.

चंचलत्वं विषयिणो यथार्थमिव भासते ।
चलनं न नरश्रेष्ठ स्वरूपस्य तु वस्तुतः ॥१२॥

हें द्रष्ट्याचें चंचलत्व खऱ्यासारखें भासतें. पण हे नर-श्रेष्ठा, स्वरूपाला वस्तुतः चलन नाहीं.

ईश्वरस्य च शक्तेश्च भेदो दृष्टिनिमित्तकः ।
मिथुनं त्विदमेकं स्याद्दृष्टिश्चेदुपसंहृता ॥१३॥

दृष्टिनिमित्तानें ईश्वर व शक्ति यांचा भेद भासतो. पण दृष्टि अंतर्मुख करून पाहिलें असतां हीं दोन्ही एकच होतात.

कपाल्युवाच—कपाली म्हणाला.

व्यापार ईश्वरस्यायं दृश्यब्रह्मांडकोटिकृत् ।
नित्यः किमथवाऽनित्यो भगवान्वक्तुमर्हति १४

हे भगवन्! दृश्य ब्रह्मांडकोटि निर्माण करणाऱ्या ईश्वराचा व्यापार नित्य आहे कीं अनित्य आहे हें कृपा करून सांगा.

भगवानुवाच—भगवान म्हणाले.

निजया परया शक्त्या चलन्नप्यचलः परः ।
केवलं मुनिसंवेद्यं रहस्यमिदमुत्तमम् ॥ १५ ॥

परमेश्वर आपल्या पराशक्तीनें चलन पावत असतो असा दिसला तरी तो अचल आहे. हें केवळ मुनींनाच समजणारें असें उत्तम रहस्य आहे.

चलत्वमेव व्यापारो व्यापारश्शक्तिरुच्यते ।
शक्त्या सर्वमिदं दृश्यं ससर्ज परमः पुमान् १६

चलन म्हणजेच व्यापार. व्यापारालाच ' शक्ति ' म्हणतात. हें सव दृश्य त्या परम पुरुषानें स्वशक्तीनेंच उत्पन्न केलें आहे.

व्यापारस्तु प्रवृत्तिश्च निवृत्तिरिति च द्विधा ।
निवृत्तिस्था यत्र सर्वमात्मैवाभूदिति श्रुतिः १७

व्यापार हा प्रवृत्ति व निवृत्ति असा दोन प्रकारचा आहे. " सर्वमात्मैवाभूत् " ही श्रुति निवृत्तीची द्योतक आहे.

नानात्वं द्वैतकालस्थं गम्यते सर्वमित्यतः ।
अभूदिति पदेनात्र व्यापारः कोऽपि गम्यते १८

आत्मैवेति विनिर्देशाद्विशेषाणां समंततः ।
आत्मन्येवोपसंहारस्तज्जातानां प्रकीर्तितः १९

'सर्व आत्मैव अभूत्' यांतील 'सर्व' हें पद द्वैतकालीन नानात्वाचें दर्शक आहे. व ' अभूत् ' हें कोणत्या तरी व्यापाराचें दर्शक आहे. आणि ' आत्मैव ' या पदाच्या निर्देशानें आत्म्यापासून सर्वत्र झालेले यच्चयावत् पदार्थ त्या आत्म्यांतच उपसंहार पावतात असें स्पष्ट होतें.

विनाशक्तिं नरश्रेष्ठ स्वरूपं न प्रतीयते ।
व्यापार आश्रयश्चेति द्विनामाशक्तिरुच्यते २०

हे नरश्रेष्ठा, शक्तीविना स्वरूपाची प्रतीति येत नाहीं. व्यापार व आश्रय हीं शक्तीचींच दोन नांवें आहेत.

व्यापारो विश्वसर्गादिकार्यमुक्तं मनीषिभिः ।
आश्रयो द्विपदां श्रेष्ठ स्वरूपान्नातिरिच्यते २१

' व्यापार ' म्हणजे विश्वोत्पत्ति इत्यादि कार्य असें ज्ञानी म्हणतात; व हे नरश्रेष्ठा, ' आश्रय ' हा स्वरूप म्हणजे आत्म्याहून निराळा नाहीं.

स्वरूपमन्यसापेक्षं नैव सर्वात्मकत्वतः ।
शक्तिं वृत्तिं स्वरूपं च य एवं वेदवेद सः २२

स्वरूप हें सर्वात्मक असल्यामुळें त्याला दुसऱ्याची अपेक्षा नाहीं. याप्रमाणें शक्ति, वृत्ति व स्वरूप यांना जो जाणतो तोच ज्ञानी होय.

वृत्तेरभावे तु सतो नानाभावो न सिध्यति ।
सत्ता शक्त्यतिरिक्ता चेद्वृत्तेर्नैव समुद्भवः ॥२३॥

वृत्तीच्या अभावीं नानात्वभाव सिद्ध होत नाहीं. सत्ता ही शक्तीहून निराळी असेल तर वृत्तीचा उद्भवच होणार नाहीं.

यदि कालेन भविता जगतः प्रलयो महान् ।
अभेदेन स्वरूपेऽयं व्यापारो लीनवद्भवेत् २४

कालांतरानें जगताचा महाप्रलय झाला तर हा सर्व

व्यापार (विश्व) स्वरूपांत अभेदपणें लीन झाल्यासारखा होईल.

सर्वोपि व्यवहारोऽयं न भवेच्छक्तिमन्तरा ।
न सृष्टिर्नापि विज्ञानं यदेतत् त्रिपुटीमयम् २५

शक्तीवांचून हा सर्व व्यवहार होणें शक्य नाहीं. व शक्ति नाहीं तर सृष्टि नाहीं किंवा त्रिपुटीमय ज्ञानहि नाहीं.

स्वरूपमाश्रयत्वेन व्यापारस्सर्गकर्मणा ।
नामभ्यामुच्यते द्वाभ्यां शक्तिरेका परात्परा २६

एकच परात्परशक्ति, स्वरूपाच्या आश्रयानें राहिलेली व सृष्ट्युत्पत्ति करणारी अशा दोन प्रकारांनीं वर्णिली जाते.

लक्षणं चलनं येषां शक्तेस्तेषां तदाश्रयः ।
यत्किंचित्परमं वस्तु वक्तव्यं स्यान्नरर्षभ २७

हे नरश्रेष्ठा, चलन हेंच शक्तीचें लक्षण आहे असें जे मानतात, त्यांना त्या शक्तीची आश्रयभूत असलेली परम वस्तु नजरेस आणणें योग्य आहे.

तदेकं परमं वस्तु शक्तिमेके प्रचक्षते ।
स्वरूपं केपि विद्वांसो ब्रह्मान्ये पुरुषं परे ॥२८॥

त्या एका परम वस्तूलाच कोणी शक्ति, तर कोणी स्वरूप, व इतर कोणी ब्रह्म किंवा परम पुरुष असें म्हणतात.

वत्स सत्यं द्विधा गम्यं लक्षणेन च वस्तुतः ।
लक्षणेनोच्यते सत्यं वस्तुतस्त्वनुभूयते ॥२९॥

हे वत्सा, सत्य हें दोन प्रकारांनीं जाणतां येतें. (१) लक्षणानें. (२) वस्तुतः (प्रत्यक्ष). सत्य वस्तु कशी आहे हें लक्षणांनीं सांगतां येतें किंवा त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतां येतो.

तस्मात्स्वरूपविज्ञानं व्यापारेण च वस्तुतः ।
ताटस्थ्येन च साक्षाच्च द्विविधं संप्रचक्षते ३०

म्हणून स्वरूपसाक्षात्कार दोन प्रकारांनीं म्हणजे व्यापारादि ‘ तटस्थ— ’ लक्षणांवरून व ‘ स्वरूप— ’ लक्षणावरून म्हणजे अनुभवानें करून घेतां येतो.

स्वरूपमाश्रयं प्राहुर्व्यापारं तात लक्षणम् ।
वृत्त्या विज्ञाय तन्मूलमाश्रये प्रतितिष्ठति ॥३१॥

बाबा रे, ‘ आश्रय ’ म्हणजे स्वरूप आणि ‘ व्यापार ’ हें त्याचें लक्षण. वृत्ति (ज्ञाना) नें त्या (व्यापारा) चें मूळ जाणलें असतां आश्रयांत प्रतिष्ठा (स्थिति) प्राप्त होते.

स्वरूपं लक्षणोपेतं लक्षणं च स्वरूपवत् ।
तादात्म्येनैव संबन्धस्त्वनयोस्संप्रकीर्तितः ३२

स्वरूप हें लक्षणांनीं युक्त आहे व लक्षण हें स्वरूपवत् आहे. त्या दोघांचा संबन्ध तादात्म्याचा म्ह. ऐक्याचा आहे असें समजावें.

तटस्थलक्षणेनैवं व्यापाराख्येन मारिष ।
यतो लक्ष्यं स्वरूपं स्यान्नित्यव्यापारवत्ततः ॥३३॥

हे आर्यवरा, ज्याअर्थीं व्यापाररूपी तटस्थ लक्षणानेंच स्वरूपाचें अनुमान करितां येतें, त्याअर्थी तें नित्य व्यापारवान आहे असें समजावें.

व्यापारो वस्तुनो नान्यो यदि पश्यासि तत्त्वतः ।
इदं तु भेदविज्ञानं सर्वं काल्पनिकं मतम् ॥३४॥

तत्त्वतः विचार करशील तर, वस्तूहून व्यापार भिन्न नाहीं. भेदज्ञान हें सर्व काल्पनिक आहे असें समजावें.

शक्त्युल्लासाह्वया सेयं सृष्टिः स्यादीशकल्पना ।
कल्पनेयमतीता चेत्स्वरूपमवशिष्यते ॥ ३५ ॥

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबंधे 'शक्तिविचारो' नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

शक्त्युल्लास नांवाची ही सृष्टि ईशकल्पना आहे. पण कल्पनेच्या पलीकडे तुम्हीं गेलांत कीं, स्वरूपच तेवढें शिल्लक राहतें.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील रमणशिष्य वासिष्ठ गणपतिमुनीच्या अनुवादांतील 'शक्तिविचार' नामक बारावा अध्याय समाप्त.

त्रयोदशोऽध्यायः।

संन्यासे स्त्रीपुरुषयोस्तुल्याधिकारनिरूपणम्।

अत्रीणामन्वयज्योत्स्ना वसिष्ठानां कुलस्नुषा।
महादेवस्य जननी धीरस्य ब्रह्मवेदिनः ॥ १ ॥
प्रतिमानं पुरंध्रीणां लोकसेवाव्रते स्थिता।
बिभ्राणा महतीं विद्यां ब्रह्मादिविबुधस्तुताम् ॥२॥
दक्षिणे विंध्यतश्शक्तेस्तारिण्या आदिमा गुरुः।
तपःसखी मे दयिता विशालाक्षी यशस्विनी॥३॥
प्रश्नद्वयेन रमणाह्वयं विश्वहितं मुनिम्।
अभ्यगच्छदद्दुष्टांगी निक्षिप्तेन मुखे मम ॥ ४ ॥

अत्रि वंशांतील ज्योत्स्ना (कन्या), वसिष्ठ कुलाची स्नुषा, बुद्धिमान् व ब्रह्मवेत्ता अशा महादेवाची माता, पतिपुत्रवती स्त्रियांचा आदर्श, लोकसेवेच्या व्रतांत राहणारी, ब्रह्मादि देवांनीं प्रशंसिलेली अशी महाविद्या धारण करणारी, विंध्यपर्वताच्या दक्षिणभागांत असलेल्या 'तारा' विद्येचा आद्यगुरुच जणूं, यशस्विनी व सुंदर अशी माझी तपरसखी व धर्मपत्नी देवी विशालाक्षी हिंनें विश्वोपकारी श्रीरमणमुनींना माझ्या द्वारें दोन प्रश्न विचारले, ते असेः—

आत्मस्थितानां नारीणामस्ति चेत्प्रतिबन्धकम् ।
गृहत्यागेन हंसीत्वं किमु स्याच्छास्त्रसंमतम् ॥ ५ ॥

घरीं राहणें हें प्रतिबंधक होत असेल तर आत्मस्थित नारींनीं गृहत्याग करून संन्यासिनी होणें हें शास्त्रसंमत आहे काय ?

जीवन्त्या एव मुक्ताया देहपातो भवेद्यदि ।
दहनं वा समाधिर्वा कार्यं युक्तमनन्तरम् ॥६॥

जीवन्मुक्त अशा स्त्रीचा देहपात झाल्यावर त्या देहाला दहन करावें कीं समाधि द्यावी (पुरावें) ?

प्रश्नद्वयमिदं श्रुत्वा भगवानृषिसत्तमः ।
अवोचन्निर्णयं तत्र सर्वशास्त्रार्थतत्त्ववित् ॥७॥

सर्व शास्त्रार्थाचें तत्त्व जाणणाऱ्या भगवान रमण महर्षींनीं हे दोन प्रश्न ऐकून त्यावर आपला निर्णय दिला. (तो असा कीं)—

स्वरूपे वर्तमानानां पक्वानां योषितामपि ।
निवृत्तत्वान्निषेधस्य हंसीत्वं नैव दुष्यति ॥ ८ ॥

शास्त्रांत तसा निषेध नसल्यामुळें स्वरूपस्थित परिपक्व स्त्रियांचा संन्यास दूषित नाहीं.

मुक्तत्वस्याऽविशिष्टत्वाद्बोधस्य च वधूरपि ।
जीवन्मुक्ता न दाह्या स्यात्तद्देहो हि सुरालयः ॥९॥

पुरुष व स्त्रिया यांचें मुक्तत्व व बोध यांमध्यें कांहीं भेद नसल्यामुळें जीवन्मुक्त अशा स्त्रीचा देह दहन करूं नये. कारण त्यांचा देहहि देवालयच आहे.

ये दोषा देहदहने पुंसो मुक्तस्य संस्मृताः ।
मुक्तायास्संति ते सर्वे देहदाहे च योषितः ॥१०॥

जीवन्मुक्त पुरुषाच्या देहदहनांत जे दोष सांगितलेले आहेत ते सर्व जीवन्मुक्त स्त्रीच्या देहदहनालाहि लागू आहेत.

एकविंशेह्नि गीतोऽभूदयमर्थो मनीषिणा ।
अधिकृत्य ज्ञानवतीं रमणेन महर्षिणा ॥११॥

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबन्धे ' संन्यासे स्त्रीपुरुषयोस्तुल्याधिकारनिरूपणं ' नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥

ज्ञानी स्त्रीसंबंधीचें हें तत्त्व, ज्ञानी अशा रमणमहर्षींनीं एकवीस तारखे रोजीं सांगितलें.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रम्हविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील रमणशिष्य वासिष्ठगणपतिमुनीच्या अनुवादांतील ' संन्यासविषयक स्त्रीपुरुषाधिकारतुल्यता ' नामक तेरावा अध्याय समाप्त.

चतुर्दशोऽध्यायः ।

जीवन्मुक्तिविचारः ।

निशायामेकविंशेह्नि भारद्वाजो विदांवरः ।
प्राज्ञश्शिवकुलोपाधिर्वैदर्भो वदतां वरः ॥ १ ॥
जीवन्मुक्तिं समुद्दिश्य महर्षिं परिपृष्टवान् ।
अथ सर्वेषु शृण्वत्सु महर्षिर्वाक्यमब्रवीत् ॥ २ ॥

तारीख २१ रोजीं रात्रीं, विद्वद्वर, प्राज्ञ व उत्तम वक्ता अशा भारद्वाजगोत्री शिवकुल वैदर्भ यांनीं जीवन्मुक्तीसंबंधीं भगवानाला प्रश्न केला. त्यास सर्व जण ऐकत असतां महर्षींनीं उत्तर दिलें.

शास्त्रीयैर्लौकिकैश्चापि प्रत्ययैरविचालिता ।
स्वरूपे सुदृढा निष्ठा जीवन्मुक्तिरुदाहृता ॥ ३ ॥

शास्त्रीय आणि लौकिक प्रत्ययांनीं न ढळणारी अशी दृढ स्वरूपनिष्ठा हिलाच ‘ जीवन्मुक्ति ’ म्हणतात.

मुक्तिरेकविधैव स्यात्प्रज्ञानस्याविशेषतः ।
शरीरस्थं मुक्तबन्धं जीवन्मुक्तं प्रचक्षते ॥ ४ ॥

प्रज्ञानांत कांहीं विशेष म्हणजे भेद नसल्यामुळें मुक्ति ही

एक प्रकारचीच असते. जिवंतपणींच ज्याचा बंध सुटला—ग्रंथिभेद झाला—त्याला ‘ जीवन्मुक्त ’ म्हणतात.

ब्रह्मलोकगतो मुक्तश्शूयते निगमेषु यः ।
अनुभूतौ न भेदोऽस्ति जीवन्मुक्तस्य तस्य च ॥५॥

ब्रह्मलोकाप्रत पावलेला मुक्त म्हणून वेदांत ज्याचें वर्णन केलेलें आहे, त्याच्या व जीवन्मुक्ताच्या अनुभवांत कांहीं भेद नाहीं.

प्राणास्समवलीयन्ते यस्यात्रैव महात्मनः ।
तस्याप्यनुभवो विद्वन्नेतयोरुभयोरिव ॥६॥

हे विद्वाना, येथेंच ज्या महात्म्याचे प्राण आत्म्यांत लीन झाले, त्याचाहि अनुभव वर सांगितलेल्या उभयतां-प्रमाणेंच असतो.

साम्यात्स्वरूपनिष्ठाया बंधहानेश्च साम्यतः ।
मुक्तिरेकविधैव स्याद्भेदस्तु परबुद्धिगः ॥७॥

स्वरूपनिष्ठा तशीच बंधहानिहि सर्वांची सारखीच असल्यामुळें मुक्तिहि एकविध म्ह० एकाच प्रकारची असते. भेद हा इतरांच्या बुद्धींतला भासतो.

मुक्तो भवति जीवन्यो महात्मात्मनि संस्थितः ।
प्राणास्समवलीयन्ते तस्यैवात्र नरर्षभ ॥८॥

हे नरश्रेष्ठा, जो महात्मा आत्मस्वरूपांत स्थित असतो

तो जीवंतपणींच मुक्त होतो. त्याचे प्राण येथेंच (आत्म्यांत) लीन होऊन जातात.*

जीवन्मुक्तस्य कालेन तपसः परिपाकतः ।
स्पर्शाभावोऽपि सिद्धस्स्याद्रूपे सत्यपि कुत्रचित् ॥९॥

कालांतरानें जीवन्मुक्ताच्या तपाचा परिपाक झाला म्हणजे 'रूपानें' तो डोळ्याला दिसत असला तरी 'स्पर्शाला' अगोचर असतो.

भूयश्च परिपाकेन रूपाभावोऽपि सिद्ध्यति ।
केवलं चिन्मयो भूत्वा स सिद्धो विहरिष्यति ॥१०॥

पुन्हां अधिक परिपाक झाला म्हणजे चर्मचक्षूला त्याचें रूपहि दिसत नाहींसें होतें. कारण तो सिद्ध केवळ चिन्मय होऊन विहार करीत असतो.

शरीरसंश्रयं सिद्ध्योर्द्वयमेतन्नरोत्तम ।
अल्पेनापि च कालेन देवतानुग्रहाद्भवेत् ॥११॥

हे नरोत्तमा, शरीरसंबंधींच्या ह्या दोन सिद्धि (स्पर्शन व दर्शन यांचा अभाव) देवतेचा अनुग्रह झाला असतां, अल्पकाळांतच प्राप्त होतात.

भेदमेतं पुरस्कृत्य तारतम्यं न संपदि ।
देहवानशरीरो वा मुक्त आत्मनि संस्थितः ॥१२॥

---

* "न तस्य प्राणा उत्क्रामन्ति ब्रह्मैव सन् ब्रह्माप्येति—"

बृहदारण्यकोपनिषद् ४. ४. ६।७.

नुसता आत्मसाक्षात्कारी ज्ञानी पुरुष आणि वर वर्णिलेल्या सिद्धि मिळविलेला आत्मसाक्षात्कारी ज्ञानी पुरुष यांच्यामध्यें वरपांगीं भेद असला तरी, त्यांच्या ज्ञानैश्वर्यामध्यें कमजास्तीपणाचा भेद नाहीं. देहानें स्पष्ट दिसणारा व अशरीरी म्हणजे देहानें न दिसणारा असे दोघेहि मुक्त पुरुष आत्मनिष्ठच असतात.

नाडीद्वारार्चिराद्येन मार्गेणोर्ध्वगतिर्नरः ।
तत्रोत्पन्नेन बोधेन सद्यो मुक्तो भविष्यति ॥ १३ ॥

नाडीद्वारा अर्चिरादिमार्गानें त्याला ऊर्ध्वगति मिळते. आणि तेथें प्राप्त झालेल्या ज्ञानानें तो तात्काळ मुक्त होतो. (पहिलीला ‘ क्रममुक्ति ’ व दुसरीला ‘ सद्योमुक्ति ’ म्हणतात).

उपासकस्य सुतरां पक्कचित्तस्य योगिनः ।
ईश्वरानुग्रहात्प्रोक्ता नाडीद्वारोत्तमा गतिः ॥१४॥

अत्यंत पक्कचित्त झालेल्या उपासक योग्यालाहि ईश्वराच्या अनुग्रहानें नाडीद्वारा उत्तम गति मिळते.

सर्वेषु कामचारोऽस्य लोकेषु परिकीर्तितः ।
इच्छयानेकदेहानां ग्रहणं चाप्यनुग्रहः ॥१५॥

तो कामचारी होऊन सर्व लोकांत फिरत असतो, किंवा स्वेच्छेनें अनेक देह धारण करून लोकांवर अनुग्रह करितो असें शास्त्रांत सांगितलेलें आहे.

कैलासं केऽपि मुक्तानां लोकमाहुर्मनीषिणः।
एके वदन्ति वैकुंठं परेत्वादित्यमंडलम् ॥ १६ ॥

कांहीं ज्ञानीजन, मुक्तांना प्राप्त होणारा लोक 'कैलास' म्हणतात, व कांहीं 'वैकुंठ' तर कांहीं 'आदित्यमंडळ' असें म्हणतात.

मुक्तलोकाश्च ते सर्वे विद्वन्भूम्यादिलोकवत् ।
चित्रवैभवया शक्त्या स्वरूपे परिकल्पिताः ॥१७॥

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबंधे
'जीवन्मुक्तिविचारो' नाम
चतुर्दशोऽध्यायः ॥ १४॥

हे विद्वाना, हे सर्व मुक्तांचे लोक या भूगोलप्रमाणेंच विलक्षण सामर्थ्य असलेल्या शक्तीनें स्वरूपाच्या ठिकाणीं कल्पिलेले (निर्माण केलेले) आहेत.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील
रमणशिष्य वासिष्ठगणपतिमुनीच्या अनुवादांतील
'जीवन्मुक्तिविचार' नामक
चौदावा अध्याय समाप्त.

पंचदशोऽध्यायः

श्रवणमनननिदिध्यासननिरूपणम् ।

श्रवण नाम किं नाथ मननं नाम किं मतम् ।
किंवा मुनिकुलश्रेष्ठ निदिध्यासनमुच्यते ॥१॥

हे नाथ ! श्रवण म्हणजे काय ? व मनन म्हणजे काय ? तसेंच हे मुनिकुलश्रेष्ठा, निदिध्यास कशाला म्हणतात ?

इत्येवं भगवान्पृष्टो मया ब्रह्मविदांवरः ।
द्वाविंशे दिवसे प्रातरब्रवीच्छिष्यसंसदि ॥ २ ॥

याप्रमाणें मी प्रश्न केला असतां ब्रह्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ असे भगवान बाविसाव्या तारखेस प्रातःकाळीं शिष्यांसमोर म्हणाले—

वेदशीर्षस्थवाक्यानामर्थव्याख्यानपूर्वकम् ।
आचार्याच्छ्रवणं केचिच्छ्रवणं परिचक्षते ॥३॥

उपनिषदांतील वाक्यार्थांचें व्याख्यान (स्पष्टीकरण) आचार्यांकडून ऐकणें यालाच कोणी ‘ श्रवण ’ म्हणतात.

अपरे श्रवणं प्राहुराचार्याद्विदितात्मनः ।
गिरां भाषामयीनां च स्वरूपं बोधयन्ति याः ॥४॥

दुसरे कोणी म्हणतात कीं, आत्मज्ञानी आचार्यांकडूनच स्वरूपावबोध करणारीं वचनें ऐकणें हेंच ‘ श्रवण ’ होय.

श्रुत्वा वेदान्तवाक्यानि निजवाक्यानि वा गुरोः ।
जन्मांतरीय पुण्येन ज्ञात्वा वोभयमन्तरा ॥५॥

अहंप्रत्ययमूलं त्वं शरीरादेर्विलक्षणः ।
इतीदं श्रवणं चित्ताच्छ्रवणं वस्तुतो भवेत् ॥६॥

वेदान्तवाक्यें किंवा गुरूच्या तोंडचीं अनुभविक वाक्यें ऐकून अथवा या दोन्हीशिवायहि जन्मांतरीच्या पुण्याईनें अहंप्रत्ययाचें मूळ असा जो आत्मा तो तूं शरीरादिकाहून विलक्षण म्हणजे निराळा आहेस असें अंतरांतून आपोआप समजणें हेंच ‘ खरें श्रवण ’ होय.

वदन्ति मननं केचिच्छास्त्रार्थस्य विचारणम् ।
वस्तुतो मननं तात स्वरूपस्य विचारणम् ॥७॥

शास्त्रार्थाचा विचार करणें याला कोणी मनन म्हणतात. पण बाबा रे, स्वरूपाचा विचार करणें हेंच ‘ खरें मनन ’ होय.

विपर्यासेन रहितं संशयेन च मानद ।
कैश्चिद्ब्रह्मात्मविज्ञानं निदिध्यासनमुच्यते ॥८॥

हे प्रियकरा, विपर्यास व संशय यांविरहित ब्रह्मात्मविज्ञानाला ‘ निदिध्यास ’ म्हणतात.

विपर्यासेन रहितं संशयेन च यद्यपि ।
शास्त्रीयमैक्यविज्ञानं केवलं नानुभूतये ॥९॥

पण विपर्यास व संशय यांविरहित असलें तरी नुसतें शास्त्रीय ब्रह्मात्मैक्यज्ञान अनुभवाला उपयोगी पडत नाहीं.

संशयश्च विपर्यासो निवार्येते उभावपि ।
अनुभूत्यैव वासिष्ठ न शास्त्रशतकैरपि ॥१०॥

हे वासिष्ठा, विपर्यास आणि संशय यांचें खरें निवारण स्वानुभवानेंच होतें, शेंकडों शास्त्रग्रंथांनीं होत नाहीं.

शास्त्रं श्रद्धावतो हन्यात्संशयं च विपर्ययम् ।
श्रद्धायाः किंचिदूनत्वे पुनरभ्युदयस्तयोः ॥११॥

श्रद्धावंताचे संशय व विपर्यास हें शास्त्रानें नाहींसे होतात; पण श्रद्धेचा जोर कमी झाला कीं, ते पुन्हा उद्भवतात.

मूलच्छेदस्तु वासिष्ठ स्वरूपानुभवे तयोः ।
स्वरूपे संस्थितिस्तस्मान्निदिध्यासनमुच्यते ॥१२॥

हे वासिष्ठा, स्वरूपानुभवानेंच त्यांचा समूळ नाश होतो. म्हणून स्वरूपस्थितीलाच ‘ निदिध्यास ’ म्हणतात.

बहिस्संचरतस्तात स्वरूपे संस्थितिं विना ।
अपरोक्षो भवेद्बोधो न शास्त्रशतचर्चया ॥१३॥

बहिर्मुख वृत्तीच्या साधकाला स्वरूपस्थितीशिवाय शेंकडो शास्त्रग्रंथांची चर्चा केली तरी अपरोक्षज्ञान होणें शक्य नाहीं.

स्वरूपसंस्थितिः स्याच्चेत्सहजा कुण्डिनर्षभ ।
सा मुक्तिस्सा परा निष्ठा स साक्षात्कार ईरितः ॥ १४ ॥

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबंधे
' श्रवणमननिदिध्यासननिरूपणं '
नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥

हे कुंडिनश्रेष्ठा, स्वरूपाच्या ठिकाणीं सहजस्थिति प्राप्त झाली कीं त्यालाच ' मुक्ति ' त्यालाच ' परानिष्ठा ' व त्यालाच ' साक्षात्कार ' म्हणतात.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील
रमणशिष्य वासिष्ठगणपतिमुनीच्या अनुवादांतील
' श्रवणमननिदिध्यासननिरूपणं ' नामक
पंधरावा अध्याय समाप्त.

षोडशोऽध्यायः

भक्तिविचारः ।

अथ भक्तिं समुद्दिश्य पृष्टः पुरुषसत्तमः ।
अभाषत महाभागो भगवान् रमणो मुनिः ।

भक्तीविषयीं प्रश्न केला असतां महाभाग पुरुषश्रेष्ठ भगवान रमणमुनि म्हणालेः—

आत्मा प्रियस्समस्तस्य प्रियं नेतरदात्मनः ।
अच्छिन्ना तैलधारावत्प्रीतिर्भक्तिरुदाहृता ॥२॥

सर्वांना आत्माच प्रिय असतो, त्याप्रमाणें त्याहून भिन्न असलेले दुसरें कांहींहि कोणास प्रिय नसतें. तैलधारेप्रमाणें अखंड असणाऱ्या प्रीतीला ' भक्ति ' म्हणतात.

अभिन्नं स्वात्मतः प्रीत्या विजानातीश्वरं कविः ।
जानन्नप्यपरो भिन्नं लीन आत्मनि तिष्ठति ॥३॥

ईश्वर आपल्याहून भिन्न नाहीं असें ज्ञानी प्रेमानें जाणतो, व आपल्याहून ईश्वर भिन्न आहे असें जाणणारा भक्तहि शेवटीं आत्म्यांतच लीन होतो.

वहन्ती तैलधारावद्या प्रीतिः परमेश्वरे।
अनिच्छतोऽपि सा बुद्धिं स्वरूपं नयति ध्रुवम् ४

तैलधारेप्रमाणें परमेश्वराकडे अखंड वहाणारी प्रीति ही साधकाच्या बुद्धीला त्याची इच्छा नसली तरी स्वरूपाप्रत नेते हें निश्चित समजावें.

परिच्छिन्नं यदात्मानं स्वल्पज्ञं चापि मन्यते।
भक्तो विषयिरूपेण तदा क्लेशनिवृत्तये ॥५॥
व्यापकं परमं वस्तु भजते देवता-धिया।
भजंश्च देवताबुद्ध्या तदेवान्ते समश्नुते ॥६॥

भक्त स्वतःला परिच्छिन्न व अल्पज्ञ मानून क्लेश-निवारण्यासाठीं व्यापक परमतत्त्वाला देवताबुद्धीनें भजतो. याप्रमाणें देवताबुद्धीनें भजणारा शेवटीं त्या तत्त्वालाच पोचतो.

देवताया नरश्रेष्ठ नामरूपप्रकल्पनात्।
ताभ्यां तु नामरूपाभ्यां नामरूपे विजेष्यति ७

हे नरश्रेष्ठा, देवतेची नामरूपकल्पनेनें भक्ति केली असतां त्या 'दिव्य' नामरूपाच्या योगानें जगाचीं नामरूपें जिंकिलीं जातात.

भक्तो तु परिपूर्णायामलं श्रवणमेकदा।
ज्ञानाय परिपूर्णाय तदा भक्तिः प्रकल्पते ॥८॥

भक्ति परिपूर्ण झाली असतां एकदां श्रवण झालें कीं पुरे, ती भक्ति ज्ञानाच्या पूर्णत्वाला नेऊन पोचविते.

धाराव्यपेता या भक्तिस्सा विच्छिन्नेति कीर्त्यते।
भक्तेः परस्यास्सा हेतुर्भवतीति विनिणय ॥९॥

तैलधारेसारखी अखंड प्रवाहित नसलेली भक्ति 'विच्छिन्न' (तुटकी) म्हटली जाते. तरी ती परा भक्तीलाच कारण होते हें निश्चित आहे.

कामाय भक्तिं कुर्वाणः कामं प्राप्याप्यनिर्वृतः।
शाश्वताय सुखायान्ते भजते पुनरीश्वरम् ॥१०॥

सकाम भक्ति करणारा पुरुष कामना पूर्ण झाली तरी अतृप्तच असतो. म्हणून तो शेवटीं शाश्वत सुखासाठीं पुन्हां ईश्वरालाच भजतो.

भक्तिः कामसमेतापि कामाप्तौ न निवर्तते।
श्रद्धा वृद्धा परे पुंसि भूय एवाभिवर्धते ॥११॥

भक्ति सकाम असली तरी कामाची प्राप्ति झाली असतांहि निवृत्त होत नाहीं. परमात्म्याचे ठिकाणीं वाढलेल्या श्रद्धेची भक्ति उत्तरोत्तर वाढतच जाते.

वर्धमाना च सा भक्तिः काले पूर्णा भविष्यति।
पूर्णया परया भक्त्या ज्ञानेनैव भवं तरेत् ॥१२॥

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबंधे
'भक्तिविचारो' नाम षोडशोऽध्यायः ॥१६॥

अशा तऱ्हेनें वाढत चाललेली भक्ति कालांतरानें पूर्ण होते, व अशा पूर्ण पराभक्तीनें म्हणजे ज्ञानानेंच भवसागर तरतां येतो.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील
रमणशिष्य वासिष्ठ गणपतिमुनीच्या अनुवादांतील
'भक्तिविचार' नामक सोळावा अध्याय समाप्त.

सप्तदशोऽध्यायः ।

ज्ञानप्राप्तिविचारः ।

पंचविंशे तु दिवसे वैदर्भो विदुषां वरः ।
प्रश्रयावनतो भूत्वा मुनिं भूयोऽपि पृष्टवान् ॥१॥

पंचवीस तारखेस विद्वच्छ्रेष्ठ वैदर्भानें विनयपूर्वक नमस्कार करून पुनः श्रीरमणमुनीला प्रश्न केला.

वैदर्भ उवाच—वैदर्भ म्हणाला.

क्रमेणायाति किं ज्ञानं किंचित्किंचिद्दिनेदिने ।
एकस्मिन्नेव काले किं पूर्णमाभाति भानुवत् ॥२॥

ज्ञान हें दिवसेंदिवस थोडेंथोडें असें क्रमानें होत जातें, कीं, सूर्यबिंबाप्रमाणें एकदम पूर्णपणें उदयास येतें ?

भगवानुवाच—भगवान म्हणाले.

क्रमेणायाति न ज्ञानं किंचित्किंचिद्दिनेदिने ।
अभ्यासपरिपाकेन भासते पूर्णमेकदा ॥३॥

ज्ञान हें दिवसेंदिवस थोडें थोडें अशा क्रमानें प्राप्त होत नाहीं. तर अभ्यासाचा परिपाक झाला म्हणजे तें एकदम उदयास येतें.

वैदर्भ उवाच—वैदर्भ म्हणाला.

अभ्यासकाले भगवन्वृत्तिरन्तर्बहिस्तथा ।
यातायातं प्रकुर्वाणा याते किं ज्ञानमुच्यते ॥४॥

हे भगवन्, अभ्यासकालीं वृत्ति आंत व बाहेर जात येत असते. यालाच ज्ञान म्हणतात काय ?*

भगवानुवाच—भगवान म्हणाले.

अन्तर्यातामतिर्विद्वन्बहिरायाति चेत्पुनः ।
अभ्यासमेव तामाहुर्ज्ञानं ह्यनुभवोऽच्युतः ॥ ५ ॥

[* वृत्तीचे मुख्य चार प्रकार मुकुंदराजांनीं विवेकसिंधूंत सांगितले आहेत ते येणेंप्रमाणें:—

" प्रथम जाण **विक्षेपता** । दुसरी ते **गतायाता** ।
तिसरी ते **संश्लिष्टता** । चौथी **सुलीनता** प्राप्तदशेची ॥
करितां ब्रह्माभ्यासू । चित्तासी होय स्वरूपीं सौरसू ॥
तें सांडूनि करी ह्व्यासू । संसारीक ॥
मग सावध होईजे । चित्तासी मागुती वळविजे ।
ब्रह्माभ्यास कीजे । ते **विक्षिप्ता** पैं ॥
गतायाता ते ऐसी । चित्त स्वरूपीं समरसी ।
तेथूनि उठे परी अपैसी । बैसे स्वरूपीं ॥
मन स्वरूपीं लाविजे । तेणें तेथेंचि असिजे ।
आनंदें फुंजों लागिजे । ते **संश्लिष्टता** पैं ॥
ब्रह्मीं चित्त निःशेष मुरे । केवळ ज्ञप्तीचि उरे ।
सुखाचा फुंज उतरे । ते **सुलीन** दशा ॥ "

हे विद्वाना, वृत्ति आंत जाते व पुनः बाहेर येते, याला 'अभ्यास' म्हणतात. आणि अच्युत–स्थिर अशा अनुभवालाच 'ज्ञान' असें म्हणतात.

वैदर्भ उवाच—वैदर्भ म्हणाला.

ज्ञानस्य मुनिशार्दूल भूमिकाः काश्चिदीरिताः ।
शास्त्रेषु विदुषां श्रेष्ठैः कथं तासां समन्वयः ॥६॥

हे मुनिश्रेष्ठा, शास्त्रांमध्यें विद्वानांनीं ज्ञानाच्या कांहीं भूमिका सांगितलेल्या आहेत; त्याचा ह्याशीं कसा मेळ घालावयाचा ?

भगवानुवाच—भगवान म्हणाले.

शास्त्रोक्ता भूमिकास्सर्वा भवन्ति परबुद्धिगाः ।
मुक्तिभेदा इव प्राज्ञ ज्ञानमेकं प्रजानताम् ॥७॥

हे प्राज्ञा, शास्त्रांत सांगितलेल्या ह्या सर्व भूमिका इतरांच्या बुद्धीनें कल्पिलेल्या आहेत. (मागें अध्याय १४ श्लोक ७ यांत सांगितल्याप्रमाणें) मुक्तिभेदासारखें ज्ञान हें एकविधच आहे असें जाणावें.

चर्यां देहेन्द्रियादीनां वीक्ष्यारब्धानुसारिणीम् ।
कल्पयन्ति परे भूमीस्तारतम्यं न वस्तुतः ॥८॥

ज्ञान्यांची प्रारब्धानुसार देहेंद्रियाची वागणूक पाहून त्या

भूमिका दुसऱ्यांनीं कल्पिलेल्या आहेत; वस्तुतः त्या खऱ्या नाहींत.

वैदर्भ उवाच—वैदर्भ म्हणाला.

प्रज्ञानमेकदा सिद्धं सर्वाज्ञाननिबर्हणम् ।
तिरोधत्ते किमज्ञानात्संगादंकुरितात्पुनः ॥९॥

सर्व अज्ञानाचा नाश करणार ज्ञान एकदा प्राप्त झालें कीं, पुनः व्यवहाराच्या संसर्गानें अज्ञान अंकुरित होऊन त्यायोगें तें ज्ञान नाहींसें होतें काय ?

भगवानुवाच—भगवान म्हणाले.

अज्ञानस्य प्रतिद्वंद्वि न पराभूयते पुनः ।
प्रज्ञानमेकदा सिद्धं भारद्वाजकुलोद्वह ॥१०॥

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबन्धे ' ज्ञानप्राप्तिविचारो ' नाम सप्तदशोऽध्यायः ॥१७॥

हे भारद्वाज कुलश्रेष्ठा, प्रज्ञान एकदां प्राप्त झालें म्हणजे तें अज्ञानाचें वैरी असल्यामुळें पुनः पराभूत होत नाहीं.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील रमणशिष्य वासिष्ठ गणपतिमुनीच्या अनुवादांतील 'ज्ञानप्राप्तिविचार' नामक सतरावा अध्याय समाप्त.

अष्टादशोऽध्यायः ।

सिद्धमहिमानुकीर्तनम् ।

वरपराशरगोत्रसमुद्भवं
वसुमतीसुरसंघयशस्करम् ।
विमलसुंदरपंडितनंदनं
कमलपत्रविशाललोचनम् ॥१॥

श्रेष्ठ अशा पराशर गोत्रांत उत्पन्न झालेला, भूदेव जे ब्राम्हण त्यांचें यश वाढविणारा, पवित्र अशा सुंदरनामक पंडिताचा पुत्र, कमळपत्राप्रमाणें विशाल नेत्र असणारा,

अरुणशैलगताश्रमवासिनं
परमहंसमनंजनमच्युतम् ।
करुणया दधतं व्यवहारितां
सततमात्मनि संस्थितमक्षरे ॥२॥

अरुणाचलावरील आश्रमांत राहणारा, परमहंस, निरंजन, अच्युत, करुणेमुळेंच व्यवहार करणारा, सदैव अविनाशी अशा आत्म्यांत स्थित असणारा,

अखिलसंशयवारणभाषणं
भ्रममदद्विरदांकुशवीक्षणम् ।

अविरतं परसौख्यधृतोद्यमं
निजतनूविषयेष्वलसालसम् ॥३॥

सर्व संशयांचें निवारण करणारें भाषण करणारा, भ्रमम-दरूपी हत्तीला अंकुशरूप दृष्टि असणारा, नेहमीं परसौख्य साधण्यासाठीं प्रयत्न करणारा, शरीरसौख्याबद्दल काळजी न करणारा,

परिणताम्रफलप्रभविग्रहं
चलतरेंद्रियनिग्रहसग्रहम् ।
अमृतचिद्घनवल्लिपरिग्रहं
मितवचोरचितागमसंग्रहम् ॥४॥

पक्व आम्रफलाप्रमाणें शरीराची कांति असणारा, चंचल इंद्रियांचा निग्रह करणारा, चिद्घनामृतवल्लीचा संग्रह करणारा, मित भाषणानें उपनिषदांचें सार सांगणारा,

अमलदीप्ततरात्ममरीचिभि-
र्निजकैरिव पंकजबांधवम् ।
पदजुषां जडभावमनेहसा
परिहरन्तमनंतगुणाकरम् ॥५॥

स्वच्छ व दैदीप्यमान आत्मकिरणांनीं कमळांना उल्ह-सित करणाऱ्या सूर्याप्रमाणें शरणागतांचा जडभाव काला-न्तरानें निवारण करणारा, अनंत गुणांचा निधि असणारा,

मृदुतमं वचने दृशि शीतलं
विकसितं वदने सरसीरुहे ।
मनसि शून्यमहश्शशिसन्निभे
हृदि लसन्तमनन्त इवारुणम् ॥६॥

वचनानें अत्यंत मृदु, दृष्टीनें शीतल, मुखानें प्रफुल्ल, मनानें दिवसाच्या चंद्राप्रमाणें शून्य, हृदयानें आकाशांतील सूर्याप्रमाणें तेजःपुंज,

अदयमात्मतनौ कठिनं व्रते
परुषचित्तमलं विषयव्रजे ।
ऋषिमरोषमपेतमनोरथं
धृतमदं घनचिल्लहरीवशात् ॥७॥

स्वतःच्या शरीराविषयीं निर्दय, व्रत पाळण्यांत कठोर, विषयांविषयीं पूर्ण निष्ठुर, क्रोधरहित व वासनाशून्य चिद्धनलहरींमुळें धुंद असा ऋषि,

विगतमोहमलोभमभावनं
शमितमत्सरमुत्सविनं सदा ।
भवमहोदधितारणकर्मणि
प्रतिफलेन विनैव सदोद्यतम् ॥८॥

मोहरहित, लोभरहित, आसक्तिरहित, सदा उत्साही, प्रतिफळाची इच्छा न बाळगतां भवसागरांतून लोकांना पार करण्यासाठीं सदैव तत्पर,

माता ममेति नगराजसुतोरुपीठं
नागानने भजति याहि पिता ममेति ।
अंकं हरस्य समवाप्य शिरस्यनेन
संचुम्बितस्य गिरिरन्ध्रकृतो विभूतिम् ९

'आई माझी' म्हणून गजानन पार्वतीच्या मांडीवर जाऊन बसला, तेव्हां 'बरं जा, बाबा माझे' असें म्हणून शिवाच्या मांडीवर जाऊन बसला असतां शिवानें ज्याचें शिरकमल हुंगलें अशा कार्तिकस्वामीचा जो अवतार,

वेदादिपाकदमनोत्तरकच्छपेशै—
र्युक्तैर्धराधरसुषुप्त्यमरेश्वरैश्च ।
सूक्ष्मामृतायुगमृतेन सहप्रणत्या
सम्पन्नशब्दपटलस्य रहस्यमर्थम् ॥१०॥

या श्लोकांत ज्या "ॐ वचद्भुवे नमः" मंत्राचा* उद्धार केला आहे, त्या मंत्राचे वाच्यभूत व अर्थबोधक असे जे रमण भगवान्,

दंडं विनैव यतिनं बत दंडपाणिं
दुःखाब्धितारकमरिं बत तारकस्य ।
त्यक्त्वा भवं भवमहो सततं भजन्तं
हंसं तथापि गतमानससंगरागम् ॥११॥

हातांत दंड धारण न करणारा यति, पण दंडपाणि

* (परिशिष्ट १ पहावें.)

(म्ह. कार्तिकेय), तारकाचा (तारकासुराचा) शत्रु पण दुःखसागरांतून तारक, भवाचा (संसाराचा) त्याग केलेला पण भवाला (शंकराला) नेहमीं भजणारा, हंस (परमहंस) पण मानससरोवराच्या संगाची हौस नसणारा,

धीरत्वसंपदि सुवर्णगिरेरनूनं
वारांनिधेरधिकमेव गभीरतायाम् ।
क्षान्तौ जयन्तमचलामखिलस्य धात्रीं
दान्तौ निदर्शनमशान्तिकथादविष्ठम् १२

धैर्यामध्यें सुमेरूपर्वताहून मोठा, गांभीर्यामध्यें समुद्रापेक्षां अधिक, क्षांती (सहनशीलते) मध्यें अखिल धात्री पृथ्वीलाहि जिंकणारा, दांती (इंद्रियनिग्रहा) मध्यें श्रेष्ठ व आदर्शरूप.

नीलारविंदसुहृदासदृशं प्रसादे
तुल्यं तथा महसि तोयजबांधवेन ।
ब्राम्ह्यां स्थितौ तु पितरं वटमूलवासं
संस्मारयन्तमचलन्तमनूदितं मे ॥१३॥

नील कमलमित्र चंद्राप्रमाणें आल्हाद देणारा, पंकजबांधव सूर्याप्रमाणें तेजस्वी, ब्राह्मीस्थितीमध्यें अचल असणाऱ्या पित्याची—वटमूलवासी दक्षिणामूर्तीची आठवण करून देणारा, (असें मी खात्रीनें सांगतों)

यस्याधुनापि रमणी रमणीयभावा
गीर्वाणलोकपृतना शुभवृत्तिरूपा
संशोभते शिरसि नापि मनोजगंध—
स्तत्तादृशं गृहिणमप्यधिपं यतीनाम् १४

अद्यापि देखील ज्याची देवसेनानामक पत्नी रमणीय-भावाच्या शुभवृत्तिरूपानें मस्तकावर शोभते, पण ज्या वृत्तींमध्यें कामाचा गंधहि नाहीं, अशा तऱ्हेचा गृहस्थाश्रमी, पण सर्व यतींमध्यें श्रेष्ठ असा,

वंदारुलोकवरदं नरदन्तिनोपि
मंत्रेश्वरस्य महतो गुरुतां वहन्तम् ।
मंदारवृक्षमिव सर्वजनस्य पाद-
च्छायां श्रितस्य परितापमपाहरन्तम् १५

सज्जन लोकांना वर देणारा, मंत्रशास्त्रामध्यें प्रवीण अशा गणपतिमुनीचा गुरु, आपल्या पादच्छायेच्या आश्रयासाठीं आलेल्या सर्व लोकांचा कल्पवृक्षाप्रमाणें परिताप हरण करणारा,

यस्तंत्रवार्तिकमनेकविचित्रयुक्ति-
संशोभितं निगमजीवनमाततान ।
भट्टस्य तस्य बुधसंहति संस्तुतस्य ।
वेषान्तरं तु निगमान्तवचो विचारि १६

ज्या भट्टपादानें (कुमारिलभट्टानें) अनेक विचित्र युक्ति-

वादानें सुशोभित असें तंत्रवार्तिक रचून वेदाचा (पूर्व-मीमांसेचा) पुरस्कार केला अशा त्या विद्वद्वंद्य भट्टपादाचा माझ्या मतें आतां वेदान्ताचा (उत्तर मीमांसेचा) विचार करणारा हा (श्रीरमणमुनि) दुसरा अवतारच,

वेदशीर्षचयसारसंग्रहं
पंचरत्नमरुणाचलस्य यः ।
गुप्तमल्पमपि सर्वतोमुखं
सूत्रभूतमतनोदिमं गुरुम् ॥१७॥

वेदान्ताचें सारसंग्रहरूप 'अरुणाचलपंचरत्न'* नामक गूढ व प्रसिद्ध—सर्वव्यापी सूत्रभूत ज्यानें रचिलें तो सद्गुरु,

देववाचि सुतरामशिक्षितं
काव्यगंधरहितं च यद्यपि ।
ग्रंथकर्मणि तथापि संस्फुर—
द्भाषितानुचरभावसंचयम् ॥१८॥

गीर्वाण भाषेचें अत्यंत अल्प अध्ययन, काव्याचा गंधहि ज्याला माहीत नाहीं, असें असूनहि ग्रंथरचनेंत परमतत्त्वाचा भाव स्वयंस्फूर्त खोल शब्दांनीं व्यक्त करणारा,

लोकमातृकुचदुग्धपायिन-
श्शंकरस्तवकृतो महाकवेः ।

* (परिशिष्ट २ पहा.)

द्राविडद्विजशिशोर्नटाद्रिरो
भूमिकान्तरमपारमेधसम् ॥१९॥

द्राविडद्विजाचा पुत्र, जगन्मातेच्या दुग्धानें पोसलेला, शिवस्तोत्र रचणारा, रोमांचकारी वाणीचा महाकवि व महाज्ञानी असा जो संत ' ज्ञानसंबंध '. त्याचा हा बुद्धिमान दुसरा अवतार,

भूतले त्विह तृतीयमुद्भवं
क्रौंचभूमिधररंध्रकारिणः ।
ब्रह्मनिष्ठितदशाप्रदर्शना—
द्युक्तिवादतिमिरस्य शांतये ॥ २० ॥

जिवंत ब्रह्मनिष्ठेची दशा दर्शवून तर्कवादरूप तिमिराचा नाश करणारा क्रौंच पर्वताला रंध्र पाडणाऱ्या कार्तिकस्वामीचा हा तिसरा अवतार,

कुंभयोनिमुखमौनिपूजिते
द्राविडे वचसि विश्रुतं कविम् ।
दृष्टवन्तमजरं परं महः
केवलं धिषणया गुरुं विना ॥ २१ ॥

अगस्त्य मुनीनें पूज्य मानलेल्या अशा द्राविड भाषेंतील श्रेष्ठ कवि, ज्यानें मानवी गुरूशिवाय आपल्या विशद बुद्धीनें अक्षर अशा परम प्रकाशाचा साक्षात्कार करून घेतला,

बालकेऽपि जडगोपकेऽपि वा
वानरेऽपि शुनि वा खलेऽपि वा
पंडितेऽपि पदसंश्रितेऽपि वा
पक्षपातरहितं समेक्षणम् ॥२२॥

बालक, जडमूढ गुराखी, वानर, कुत्रा, दुष्ट, पंडित किंवा शरणागत यांना पक्षपातरहित समदृष्टीनें पाहणारा,

शक्तिमन्तमपि शान्तिसंयुतं
भक्तिमन्तमपि भेदवर्जितम् ।
वीतरागमपि लोकवत्सलं
देवतांशमपि नम्रचेष्टितम् ॥२३॥

शक्तिमान पण शांत, भक्तिमान पण भेदवर्जित, विरक्त पण लोकवत्सल, देवतांश पण नम्रवर्तनी,

एष यामि पितुरन्तिकं ममा–
न्वेषणं तु न विधीयतामिति ।
संविलिख्य गृहतो विनिर्गतं
शोणशैलचरणं समागतम् ॥२४॥

'मी पित्याकडे जातों, माझा शोध करूं नये' अशी चिठी लिहून घर सोडून अरुणचलाप्रत आलेला,

ईदृशं गुणगणैरभिरामं
प्रश्रयेण रमणं भगवन्तम् ।

सिद्धलोकमहिमानमपारं
पृष्टवानमृतनाथ यतीन्द्रः ॥२५॥

याप्रमाणें गुणगणांनीं शोभणाऱ्या रमणभगवानाला अमृतनाथ यतींद्रानें सिद्धलोकाच्या अपार महिमेविषयीं विनयानें प्रश्न केला.

आह तं स भगवान्नगवासी
सिद्धलोकमहिमा तु दुरूहः ।
ते शिवेन सदृशाः शिवरूपाः
शक्नुवन्ति च वराण्यपि दातुम् ॥२६॥

इति श्रीरमणगीतासु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
रमणान्तेवासिनो वासिष्ठस्य गणपतेरुपनिबन्धे
'सिद्धमहिमानुकीर्तनं' नाम
अष्टादशोऽध्यायः ॥१८॥

अरुणाचलवासी भगवान त्याला म्हणाले कीं, सिद्धलोकमहिमा अवर्णनीय आहे. सिद्धलोक हे शिवासारखे शिवरूपच असून कसलेहि वर देण्यास समर्थ आहेत.

याप्रमाणें श्रीरमणगीतेंतील ब्रह्मविद्यान्तर्गत योगशास्त्रांतील
रमणशिष्य वासिष्ठ गणपतिमुनीच्या अनुवादांतील
'सिद्धलोकमहिमानुकीर्तन' नामक
अठरावा अध्याय समाप्त.

श्रीरमणगीता समाप्त.

ॐ तत्सत्.

परिशिष्ट १

अनुबंध

श्रीरमणगीता अध्याय १८ श्लोक १० संबंधीं खुलासा.

मंत्रोद्धारः ।

वेदादिः प्रणवः । पाकदमनादिन्द्रबीजाल्लकारादुत्तरो **व**कारः पाकदमनोत्तर उच्यते । कच्छपेशः कूर्मेशनामकरुद्रस्य बीजं **च**कारः । तैः, ओं वच इत्येतैरक्षरैः । धराधरः पर्वतबीजं **द**कारः । सुषुप्तिर्निद्रानामकशक्तेर्बीजं **भ**कारः । अमरेश्वरः अमरेश्वरनामकरुद्रस्य बीजं **उ**कारः । तैर्युक्तैः **द्भु**इत्येतेनाक्षरेणेति यावत् । सूक्ष्मामृता सूक्ष्मामृतानामक शक्तेर्बीजं **ए**कारः । तद्युक् तद्युक्तं तोयबीजं, तेन **वे** इत्यक्षरेण । प्रणत्या **नमः** इति पल्लवेन च सह मिलित्वा सम्पन्नशब्दपटलस्य, **ओं वचद्भुवेनमः** इति मंत्रस्य रहस्यं तत्त्ववेत्तृभिरेव ज्ञातुं शक्यम् अर्थ वाच्यभूतं । रमणं भगवन्तं अमृतनाथयतीन्द्रः पृष्टवानित्युत्तरेणान्वयः । एवं च भगवतो गुरोर्मंत्रः **ओं वचद्भुवेनमः** इति पर्यवस्यिति ।

—गुरुमंत्रभाष्यम् ।

परिशिष्ट २

श्रीभगवन्महर्षिरमणप्रणीतं

अरुणाचलपंचरत्नम् ।

करुणापूर्णसुधाब्धे
कवलितघनविश्वरूप किरणावल्या ।
अरुणाचल परमात्म—
न्नरुणो भव चित्तकंजसुविकासाय ॥१॥

हे करुणपूर्ण सुधासागरा, तुझ्या किरणांच्या पंक्तीनें हें घनदाट विश्वरूप ग्रासून टाकिलें आहे (हें विश्व नाहींसें होऊन त्या जागीं तूंच स्वतेजानें प्रकाशमान होत आहेस). हे अरुणाचल परमात्मन्, माझ्या चित्तकमलाचा चांगला विकास व्हावा म्हणून तूं अरुण (सूर्य) हो.

त्वय्यरुणाचल सर्वं
भूत्वा स्थित्वा प्रलीनमेतच्चित्रम् ।
हृद्यहमित्यात्मतया
नृत्यसि भो स्ते वदन्ति हृदयं नाम ॥२॥

हे अरुणाचला, तुझ्यामध्येंच हें सर्व (जगद्रूपी चित्र)

उत्पन्न होतें, राहतें आणि शेवटीं नाश पावतें हें खरोखर विचित्र (आश्चर्यकारक) आहे. तूं हृदयामध्यें 'मी मी' अशा आत्मभावानें– स्फुरणानें नृत्य करितोस. याकरितां तुला 'हृदय' असें अन्वर्थक नाम आहे.

अहमिति कुत आयाती–
त्यन्विष्यान्तः प्रविष्टयात्यमलधिया ।
अवगम्य स्वं रूपं
शाम्यत्यरुणाचल त्वयि नदीवाब्धौ॥३॥

हा मी किंवा अहंकार येतो कोठून याचा शुद्ध निर्विकारमनानें विचार केल्यास आपल्या स्वरूपाचें ज्ञान होतें आणि हे अरुणाचला, नदी जशी समुद्राला जाऊन मिळते तसा हा अहंकार तुझ्यामध्यें–मूळस्थानामध्यें विश्राम पावतो.

त्यक्त्वा विषयं बाह्यं
रुद्धप्राणेन रुद्धमनसान्तस्त्वाम् ।
ध्यायन्पश्यति योगी
दीधितिमरुणाचल त्वयि महीयन्ते॥४॥

हे अरुणाचला, बाह्यविषयांचा त्याग करून, प्राण आणि मन यांना आपल्या ताब्यांत ठेवून योगी तुझें ध्यान करीत असतां तुझें तेज पाहतो आणि आनंद पावतो. असा तुझा महिमा अगाध आहे.

'मी कोण' असा शोध करीत करीत मनुष्य आपल्या हृदयांत–आत्म्यांत बुडून जाईल तर त्याचे सर्व विचार–वृत्ति नाहींशा होतील.*

चेतसि हृदयं प्राप्ते
प्रत्यक्तत्त्वं समस्तभूतानाम् ।
स्वयमहमहमिति लसति
म्रियतेऽहन्ता स्फुरत्यथानंदः ॥ ३ ॥

जेव्हां मन हें हृदयाच्या ठिकाणीं पोचतें, तेव्हां सर्व भूतांचा प्रत्यगात्मा 'मी मी' म्हणून स्वतः स्फुरण पावूं लागतो. त्यायोगें अहंकार नाहींसा होतो आणि स्वानंदाचा उदय होतो.

सोऽयं सुलभो मार्गो
जनिमृतिसन्तानभेदने नृणाम् ।
चेतोवाग्वपुरीहा–
हानात्सद्यः स्वयं हि भात्यात्मा ॥ ४ ॥

मनुष्याची जन्ममरणपरंपरा नष्ट करण्याला हाच एक सुलभ मार्ग आहे. कारण मन, वाणी व शरीर यांचे व्यापार बंद करण्यानें आत्मा तात्काळ स्वयंप्रकाशानें प्रकाशित होतो.

---

* मी कोण ऐसा हेत । धरून पाहतां देहातीत । अवलोकितां नेमस्त । स्वरूपचि होय ॥

—दासबोध ५-६-२१].

शान्ते मनसि हृदन्तः
 कृपया देवस्य भक्तिसुलभस्य ।
अनुभूयते परं तत्
 चित्तादीनां प्रकाशकं व्योम ॥ ५ ॥

भक्तीनें सहज प्राप्त होणाऱ्या परमेश्वराच्या कृपेनें जेव्हां मन हृदयांत—आत्म्यांत लीन होतें, तेव्हांच मन (चित्त-व्योम—चित्ताकाश) व जगत् (भूतव्योम—भूताकाश) हीं ज्याच्या प्रकाशानें प्रकाशित होतात अशा चिद्व्योम—चिदा-काशाचा (परमात्म्याचा) अनुभव येतो.

भगवद्रमणप्रोक्तं
 द्राविडगीतार्थसारभूतोऽयम् ।
रचितस्तदीयशक्त्या
 प्रीत्यै भूयात्तदीय लोकस्य ॥ ६ ॥

भगवान रमण महर्षींनीं द्राविड भाषेंत गायिलेल्या ‘ आत्मविद्या ’ नामक गीताचा, त्यांच्या कृपेनें केलेला हा सारभूत अर्थ त्यांच्या सर्व भक्तांना आनंददायक होवो.



SRI RAMANASRAMAM BOOK DEPOT

TIRUVANNAMALAI, SOUTH INDIA.

संस्कृत

	रु.	आ.	पै.
उपदेशसारः—श्रीरमणमहर्षिभिः प्रणीतः	०	०	६
,, काव्यकण्ठगणपतिमुनिकृतभाष्यसहिता	०	१	०
सद्दर्शनम् सभाष्यम्—श्रीरमणमहर्षिकृत द्राविडभाषाग्रन्थस्य गणपतिमुनिकृतानुवादः सभाष्यः	०	१२	०
श्रीरमणगीता	०	४	०
श्रीरमणाष्टोत्तरम्	०	०	६
श्रीरमणाष्टोत्तरशतमणिमाला	०	१	०
श्रीरमणचत्वारिंशत्	०	१	०
गीतमाला—गणपतिमुनिविरचिता	०	४	०

हिन्दी

श्री रमण चरितामृत	१	१२	०
श्री महर्षि—११२ चित्रों के सहित	०	८	०

"I am very glad to state hereby that the massage treatment given to me by Mr. N. V. GUNAJI, B. A., LL. B. was very efficacious in restoring to me my habit of sleep. It not only gave a finishing stroke to the able treatment given to me by the doctors of Bombay, but helped me a great deal to get rid of the nervous depression and mental exhaustion. In short it has given tone to my nervous system. I have now regained my normal vigour and can easily walk a distarce of three miles. I can similarly do some mental work applying myself steadily to some serious reading.

Unfortunately the advantages of scientific massage based on anatomical knowledge are known to few of us. It is really a boon to our society that it can find an expert masseur in Mr. Gunaji."

Belgaum.
12th June 1938.

(Sd.) **H. V. Savnur,**
L. M. & S.

" I was under the treatment ot Mr. N. V. Gunaji for about a month last summer. The massage-treatment that he gave to me gave a tone to my nervous system. He has, it appears, good anotomical knowledge and I found it a pleasure to undergo the treatment. "

30-8-39,
Haveri,
(Dist. Dharwar).

(Sd.) **B. A. Chougule.**
2nd Class Subjudge.

" I am glad to say that Nagesh Vasudeo Gunaji has studied the art of massage in a scientific way and he is

useful in diseases where circulation is retarded. His massage did me good in my recent illness when I was bed-ridden."

28-10-39
Belgaum.

Sd. **Dr. G. V. Herekar,**
M. B. B. S.,
Opthalmic Surgeon.

"I took regularly for 2 months Mr. N. V. Gunaji's treatment regarding Breathing, Diet, Exercise and Massage and I feel very glad to state that I was much improved by his treatment. My high blood pressure has been appreciably reduced. My weight which was before the treatment 172 lbs. has gone down to 155 lbs.

2-12-39
Belgaum.

(Sd.) **V. S. Koimatur.**
Asst. Commissioner (S. D.)
